REFBK 0012210
REFBK-0012210

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ...३१२२१.... वि: ...भू-प्रवास...
क्रमांक .....२९६..... नों: दि: ९.१०.६४
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२१०
REFBK-0012210



# भारत दर्शन

• १ •

काका कालेलकर

मूल्य : दीड रुपया



कुमार साहित्य माला

.... ५१ ....

श्री : ३१० [ ६–६१ ]

© १९६१
काका कालेलकर

●

कुमार साहित्य माला : ५१

●

आवृत्ति पहिली
शके १८८३
सन १९६१

●

मूल्य : रु. १–५०



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

# भा र त - द र्श न

## पहिला खंड

## म हा रा ष्ट्र - भू मि

१. जुन्या महाराष्ट्राची पडकी राजधानी
२. गुरु गोविंदसिंहांचा गुरुद्वारा
३. पुण्य तारा-नगरी
४. पाषाण-हृदय
५. अजिंठा
६. घृष्णेश्वर
७. महाराष्ट्राची दिल्ली
८. सह्याद्रीचे घाट
९. आपला गोवा
१०. पंढरी
११. कृष्णेचीं संस्मरणें
१२. सह्याद्रीला श्रद्धांजलि
१३. मराठी कवींनीं द्यावें

कुमार साहित्य मालेचें हें एकावन्नावें पुष्प – पुस्तक.

गेल्या सुमारें साडेचार वर्षांच्या अवधींत आम्ही या मालेंतून कुमारांसाठीं एवढें साहित्य देऊं शकलों याबद्दल संतोष बाळगण्याची आमच्या मनाची तयारी नाहीं. उलटपक्षीं या अत्यंत निकडीची गरज असलेल्या क्षेत्रांत आमच्या हातून एवढेंच काम होऊं शकलें याविषयीं असमाधान मात्र वावरत आहे. आणि या कामांत असलेल्या अनेक अडचणी कशा पार करतां येतील याविषयीं चिंताहि आहे.

कुमार साहित्य मालेंतील वेगवेगळ्या प्रकारच्या पांच पुस्तकांना सरकारी पुरस्कार लाभून तीं पारितोषिकपात्र ठरलीं, हें नमूद करतांना आम्हांला थोडा अभिमान वाटला तर तो अनाठायीं ठरूं नये

कथा-कादंबरीपासून हिमालय-दक्षिण ध्रुवाच्या मोहिमांपर्यंत विविध विषय कुमार साहित्य मालेंत आजवर येऊन गेले आहेत. त्यांत उणीव असलेला एक विषय – आणि तोहि अत्यंत बहारदारपणें व अभिनव रीतीनें या पुस्तकानें मालेंत समाविष्ट झाला याचा आनंद वाटल्यावांचून रहात नाहीं. काकासाहेबांचें प्रस्तुत ( आणि अशीं तीन ) पुस्तक वास्तविक यापूर्वींच मालेंतून प्रसिद्ध झालें नाहीं याची मात्र रुखरुख वाटते.

इतकीं जिवंत, रसरशीत, समृद्ध आणि रसिकतेनें नटलेलीं प्रवासवर्णनें वाचूनहि ज्याच्या मनांत आपल्या मातृभूमीचें 'दर्शन' करावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न होणार नाहीं व ज्याच्या हातून तदनुसार कृति घडणार नाहीं असा कोणी उरेल अशी कल्पनाच आम्ही करूं शकत नाहीं.

– प्र का श क

# देशभक्तीची सांस्कृतिक दीक्षा

'**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।**' आपल्या लोकांना रजोगुणी देशाभिमानापेक्षां सत्त्वगुणी देशभक्ति अधिक आवडते आणि तीदेखील कौटुंबिक भावना व्यापक करून उत्पन्न करावी अशी त्यांची पद्धति दिसते.

मुलांना आई आवडते. जन्मदात्री आई स्वर्गाहून देखील श्रेष्ठ आहे हें आईच्या प्रेमांत वाढलेल्या मुलाला पटवावें लागत नाहीं. म्हणून तेथूनच प्रारंभ करून संस्कृति-संवर्धक कवि म्हणतो, "आपल्याला, आपल्या आईला आणि आपल्या सर्व आत्मीय जनांना जी मातेच्या ठिकाणीं आहे ती जन्मभूमी देखील स्वर्गाहून श्रेष्ठ आहे."

भगवान् श्रीकृष्णांनीं एके ठिकाणीं जन्मभूमि-वात्सल्याचे गोडवे गाइले आहेत. श्रीरामचंद्र जेव्हां विश्वामित्राचे शिष्य होऊन मखरक्षणार्थ निघाले तेव्हां विश्वामित्रांनीं वाटेंत ठिकठिकाणचा स्थानिक इतिहास सांगून रामचंद्राच्या मनांत जन्मभूमिविषयीं प्रेम .उत्पन्न केलें आणि तिचा उद्धार करण्याची दीक्षा राम-लक्ष्मणांना दिली.

द्यूतांत हारल्यानंतर पांचहि पांडव जंगलांत जाऊन राहिले. दिवसा शिकार करावयाची आणि सकाळ-संध्याकाळ पुराण श्रवण करावयाचें असा त्यांचा कार्यक्रम होता. इकडे श्रीकृष्णांनीं देशभर हिंडून पुढची सर्व तयारी केली. कृष्णाला सबंध देशाची माहिती चिरयात्री परशुरामाहून किंवा बळरामाहून कमी नव्हती. बारा वर्षें – निदान तीन वर्षें – हिंडून सगळा देश डोळ्यांनीं पहावा, स्थानिक लोकस्थितीचीहि माहिती करून घ्यावी आणि पवित्र संस्कृतिकेंद्रांमध्यें कांहीं काळ घालवून धर्मधुरीणांचा परिचय करून घ्यावा हें जुन्या काळीं शिक्षणाचें आवश्यक अंग असे. रामायण-महाभारतांत कोठेंहि प्रांतीय अभिमानाचा वास येत नाहीं. लक्षावधि श्लोकांच्या पुराणांमधें जेथें तेथें स्थानमाहात्म्यें वाचावयास मिळतात; पण कोठेंहि आपली देशभक्ति आसेतुहिमाचल भारतापेक्षां थोड्या प्रदेशाशीं निगडित नव्हती.

तरीहि देशाचा जो कोपरा किंवा भूमिभाग आपल्या वांट्याला आला असेल आणि जेथील लोकांशीं आपलें सर्वांगीण जीवन ओतप्रोत असेल तेथूनच आपल्या भारतभक्तीचा प्रारंभ व्हावयाचा. या न्यायानें प्रत्येक तरुण-

तरुणीनें देशाची सांस्कृतिक माहिती मिळवतांना आपल्या प्रदेशापासून प्रारंभ करणें स्वाभाविक आहे. पण यामुळें आपल्या लोकांनीं घरकोंबडे होऊं नये म्हणून दुहेरी व्यवस्था होती. तरुणांना शिक्षणासाठीं दूरच्या एखाद्या गुरुकुलांत पाठवीत. श्रीकृष्ण स्वतः मथुरा-वृंदावन सोडून दूर उज्जैनला सांदीपनींच्या आश्रमांत बळरामासह जाऊन राहिले होते. पाटलीपुत्राचे राजपुत्र पंजाब आणि काश्मीरच्या सरहद्दीवरील तक्षशिलेसारख्या विद्यापीठांत जाऊन शिकत आणि देशदेशान्तराचे तरुण नालंदा विश्वविद्यालयांत येऊन पोटभर अथवा अंगभर शिकत – हो, विद्या कांहीं डोक्यांत किंवा पोटांत कोंबावयाची नसून आंगवळणीं पाडून घ्यावयाची असते. आणि मुलीसाठीं स्थळ शोधायचें तें देखील दूरवरचें शोधीत असत. गुजरातचे महाजन लंकेंतील कन्येला घेऊन येत. दिल्लीचे राजपुत्र लग्नासाठीं कामरूपपर्यन्त नजर पोहोंचवीत. कुळ जेवढें मोठें तेवढी कन्या दूरची असली पाहिजे असा जणुं काय नियमच होता. दशरथानें कैकयी देखील अशीच भिन्न संस्कृतीची कन्या आणली होती. उदाहरणें वाढविण्याची आवश्यकता नसावी. अगदीं प्रथमपासून आपली संस्कृति अखिल भारतीय होती. आपले राजे प्रकृति-मातेपासून चारित्र्याचा बोध घेत तेव्हां त्यांना गांभीर्याची दीक्षा महासागरापासून मिळत असे आणि धैर्याची दीक्षा हिमालयापासून. '**समुद्र इव गांभीर्ये धैर्येण हिमवान् इव**' असें आपले कवि सहज बोलून जात.

आज आपल्या शिक्षण-क्रमांत भूगोलाचें ज्ञान असतें पण त्यांत राम कधींच सांपडायचा नाहीं ! देशभक्ति आणि संस्कृति यांचें जणु काय वावडें असलेले लोक भूगोल लिहायला बसतात. मुलांनीं हाडें चघळल्यानें त्यांचे दांत मजबूत होतील अशी त्यांची अपेक्षा असल्यास नकळे ! प्रत्यक्ष अनुभव म्हणतो कीं असल्या सुक्या भूगोलज्ञानानें मुलें हाडकुळीं होतात. आजकाल प्रत्येक प्रदेशाचें तापमान आणि पाऊसमान विद्यार्थ्यांना शिकावें लागतें खरें, पण त्यायोगें भक्ति उन्नवली जात नाहीं आणि संस्कृतीचें सिंचनहि होत नाहीं. आजकाल देशांत औद्योगिक केंद्रें कुठें आहेत हें शिकविलें जातें खरें पण जुन्या किंवा नव्या सांस्कृतिक केंद्रांविषयीं आस्था कुठेंच दिसून येत नाहीं. आपल्याला उद्योग आणि संस्कृति दोहोंची आवश्यकता आहे.

समृद्ध जीवनाला आवश्यक असलेली दृष्टि आणि माहिती प्रत्यक्ष प्रवासानें मिळत असते; आणि त्याच्या खालोखाल प्रवास करून आलेल्या संस्कृतिरसिक

देशसेवकांच्या तोंडून ती प्राप्त होते. पण असले संस्कृतिरसिक रिकामे कसे सांपडणार आणि एके ठिकाणीं तरी ते कसे रहाणार ? त्यांना त्यांच्या वडीलधाऱ्या लोकांनीं सांगून ठेवलेलें कीं, 'पानी बहता भला आणि साधु चलता भला.'

पूर्वी संध्याकाळीं एखाद्या देवळांत येऊन उतरलेल्या साधूच्या, पुराणिकाच्या किंवा अतिथि-अभ्यागताच्या तोंडून ज्या तुरळक गोष्टी ऐकावयास मिळत त्याची लोकांत कदर असे. लोक मुद्दाम अशांना घरीं बोलावून जेवूं घालीत आणि मग क्षुधातृप्तीनंतर मोकळी झालेली जीभ तऱ्हतऱ्हेची रसिक माहिती लोकांपुढें मांडी. तुम्ही आम्हांला अन्न दिलें, आम्ही तुम्हांला ज्ञान देऊं असा विनिमय व्हावा म्हणूनच तर देवानें रसनेकडे दोन्ही कामें सोंपवलीं आहेत.

पण आतां जिभेचें काम लेखणीकडे आलें आहे. बोलावें लेखणीनें आणि असें बोललेलें ऐकावें डोळ्यांनीं असा प्रकार सुरू झाला आहे. अक्षरज्ञान होतांच मनुष्य 'कर्णवीण नयनें ध्वनि घेतो.' आणि म्हणूनच प्रवासवर्णनाच्या पुस्तकांची, देश-दर्शनाच्या निबंधांची आज इतकी लोकप्रियता आहे.

प्रवासाचे श्रम पडूं नयेत आणि घरबसल्या सर्व रसिक माहिती मिळावी अशी सोय कधींहि कुणी करूं नये. पुस्तकांतून चटक लागेल इतकीच त्रोटक माहिती असावी. आणि प्रवासाचा कंटाळा असणाऱ्या उठवळ माणसांचे देखील पाय चालूं लागावेत अशा बेताचीं पुस्तकें लोकांपुढें ठेवलीं पाहिजेत. 'हिमालयाच्या प्रवासा'ची सफलता मापण्याची खरी कसोटी आजवर त्या पुस्तकाच्या किती आवृत्त्या निघाल्या आणि किती प्रति खपल्या ही नसून किती लोकांनीं ऐन तरुणपणीं आणि म्हातारपणीं देखील तें पुस्तक वाचून हिमालयाच्या यात्रेचा संकल्प केला ही आहे.

चार धामांची भारतयात्रा करण्याच्या संकल्पानें मी कधींच फिरलों नाहीं. जशी संधि सांपडली तसा हिंडून आलों. जें जें पाहिलें तें तें लिहून काढावेंच असाहि संकल्प नव्हता. कुणी लिहिणार भेटलेंच तर थोडें सांगावें. प्रकाशकांनीं मागितलें तर त्यांना तें पाठवून द्यावें. असा यदृच्छेचा प्रकार जन्मभर चालला आहे. त्यापैकींच मासल्याचीं म्हणून कांहीं प्रकरणें 'भारत-दर्शन' या सामान्य नांवाखालीं प्रकाशित करावीं, असें विद्यासेवक आणि संस्कृतिसेवक प्रकाशकांना वाटलें. जीं वर्णनें गुजरातींत, हिन्दींत आणि इतर दोन तीन भारतीय भाषांत लोकप्रिय झालीं तीं स्वतःच्या जन्मभाषेंत आलींच पाहिजेत असें मला वाटलें.

अनेक तरुणांनीं आपापल्या परी प्रेमानें मदत केली आणि अशा प्रकारें ही माला प्रकट होत आहे.

या मालेंत एक निबंध जर दुसऱ्या निबंधासारखा दिसून आला तर मला खरोखर त्याचें वाईट वाटेल. संस्कृतीची दृष्टि निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या रसांनीं पहाते. स्मृति देखील निरनिराळ्या प्रकारानें जबाब देते. कुठे इतिहासाला महत्त्व असेल, कुठे लोकरूढीला; कुठें निसर्गाच्या भव्यतेला तर कुठें धार्मिक परंपरेच्या गूढतेला. गोडी तृप्त करण्याचा उद्देश येथें नसून गोडी चाळवणें इतकेंच येथें इष्ट मानलें आहे. विविधता जागृत झाल्यावांचून समृद्धि पदरीं कशी पडणार? आणि संस्कृति अंगाला तरी कशी लागणार?

असो. लहानशा पुस्तकाला मोठी प्रस्तावना जोडणें म्हणजे मुलाच्या डोक्यावर आजोबांचें पागोटें ठेवण्यासारखें होईल. अशा संयोगाचा देखील आपण आनंद घेत नाहीं असें नाहीं. पण थोडक्यांत मजा हेंच खरें.

नवी दिल्ली,
२५–४–६१

काका कालेलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १२२१७...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# जुन्या महाराष्ट्राची पडकी राजधानी

१

: १ :

पैठण म्हणजे महाराष्ट्राची वाराणशी; एके काळचें संस्कृत विद्येचें माहेरघर ! स्वधर्मीय राजाचें जेव्हां कृपाछत्र असतें तेव्हां समाजवृक्ष फळांफुलांनीं कसा बहरून येतो ह्याचें प्रत्यंतर शोधावयाचें झाल्यास इतिहास-संशोधक अजूनहि जुन्या 'प्रतिष्ठान'चा इतिहास पहातात.

महाराष्ट्राच्या इतिहासाचा आरंभ शककर्ता शालीवाहन किंवा शातवाहन यापासून होतो. आज जसें गांधीजींविषयीं बोलतांना आम्ही म्हणतों कीं, गांधींनीं धुळींतून, मातींतून माणसें बनविलीं, प्रेतवत् पडलेल्या राष्ट्राचें संजीवन केलें, त्याचप्रमाणें शालीवाहनाविषयीं म्हणतात. त्याच्यासंबंधीं अशी वदंता आहे कीं, त्याच्याजवळ संजीवनी विद्याच होती. माती भिजवून तो घोडे आणि घोडेस्वार करीत असे आणि त्यांना एका जीवनवापीमध्यें बुडवून सजीव करीत असे. आणि मग हे खरेखुरे झालेले घोडेस्वार शत्रूशीं युद्ध करीत. पुतळे बनविण्याची कुंभाराची कला आणि त्यांच्यांत प्राण फुंकण्याची संजीवनी विद्या ही

शालीवाहनाला माहीत होती. त्यानें देशांत घुसलेली ग्रीकांची, यवनांची धाड परतविली आणि स्वातंत्र्याची पुनः प्रतिष्ठापना केली. या शालीवाहनाच्या नांवाचा शक महाराष्ट्रांत अजून प्रचलित आहे. रेवा नदीच्या उत्तर तीरापलीकडे विक्रम संवत् आणि नर्मदेच्या दक्षिण तीराला खालीं शालीवाहन शक ही जुनी व्यवस्था आजहि पाळली जात आहे. अशा या शालीवाहन राजाची राजधानी प्रतिष्ठानीं होती. हेंच आजचें पैठण. देश-विदेशच्या पुष्कळ लोकांनीं या शहराच्या वैभवाबद्दल लिहिलेलें आढळून येतें.

गोदावरीचा किनारा अगोदरच सुपीक आणि पवित्र मानला जातो आणि त्यांतच नदीचें चांगलें वळण पाहून उंचशा भागीं पैठण वसविलें गेलें आहे.

जें ठिकाण राजधानी म्हणून उत्कर्ष पावलें होतें, तेथें विणकर, सोनार, गवई आणि पंडित जमा होणारच. त्यामुळें पैठण संस्कृतीचें मोठें केंद्र बनलें आणि सोपारा, भृगुकच्छ इत्यादि पश्चिम किनाऱ्याच्या बंदरांतून त्याचा व्यापार चालूं लागला.

याच पैठण शहरी संन्याशाचीं मुलें निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई शुद्धिपत्र मिळविण्यासाठीं आणि मौंजीबंधनाचा अधिकार मिळविण्यासाठीं आलीं होतीं. याच ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या मुखांतून वेद वदविला होता. आणि रेड्यासारख्या दशग्रंथी ब्राह्मणांचा माज, गर्वज्वर उतरविला होता. ब्राह्मणांनीं चकित होऊन त्यांना लिहून दिलें होतें कीं, तुम्ही पवित्र आहांत, महान् आहांत, अलौकिक आहांत. परंतु मौंजीबंधनाचा आग्रह मात्र तुम्ही धरूं नका. नंतर त्या बहिणभावांनीं आचार आणि प्रचाराच्या मार्गांनीं धार्मिक जीवनाचा उद्धार केला, विस्तार केला आणि विकास देखील !

याच पैठण शहरीं धर्मात्मा एकनाथस्वामींनीं आपला लीलाविस्तार सार्थ करून दाखविला. त्यांचा नातू म्हणजे कविश्रेष्ठ मुक्तेश्वर. हे मराठीचे अद्वितीय असे कवि होऊन गेले. मराठी साहित्यांत सदाचाराचें सर्वोत्कृष्ट आणि सरस वर्णन वाचावयाचें असेल तर भागवताच्या एकादश स्कंदावरील एकनाथ महाराजांची टीका वाचावी. आणि मराठीच्या काव्यगुणांचा उत्कर्ष पहावयाचा असेल तर मुक्तेश्वराची कविता वाचावी. श्रीज्ञानदेवानंतर इतका मोठा कवि महाराष्ट्रांत झाला नाहीं असें म्हटल्यास हरकत नाहीं.

शिवदिन केसरीच्या कविताहि महाराष्ट्राच्या जिव्हाग्रीं आहेत. या शिवदिन केसरीचा मठहि पैठणींच आहे.

आणि यांपैकीं कांहीं जरी नसतें तरी गोदावरीच्या तटीं वसलेल्या प्रतिष्ठानची पवित्रता तर होतीच आणि आहेच. तथापि प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास शोधला तर महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणांपेक्षां पैठणचें स्थानमाहात्म्य कमी नाहीं.

: २ :

औरंगाबादेवरून पैठणला जाण्यासाठीं आम्ही मोटारनें निघालों. दुपारचे दोन वाजले असतील त्या वेळीं. ३० मैलांचा हा प्रवास आम्हीं दीड तासांत पुरा केला. स्टेशनवरून निघतांच एका लांबरुंद अशा पहाडानें आमच्याशीं गोष्टी सुरू केल्या. पुढचा रस्ता त्याच्या कडेनेंच होता. आणि म्हणून त्याच्या लांबीइतकीच त्याची रुंदीहि तितकीच मोठी आहे असें आमच्या ध्यानांत आलें. कदाचित् दोन पर्वतांचा हा समकोन झाला असेल. या बाजूची जमीन स्वभावतःच सुंदर आहे कीं पिकांचा मोसम असल्यामुळें सर्वदूर हिरवीगार आहे कोण जाणे ! आणि हें जाणण्याच्या भानगडींत तरी कशाला पडा ? जें दृष्टिसुख मिळेल तें घेऊन पुढें जाण्यांतच शहाणपण नाहीं काय ?

पैठणजवळ पोहोंचतांच शहराबाहेर उजव्या बाजूला नदीकांठीं असलेल्या एकनाथ महाराजांच्या समाधीचें दर्शन झालें. त्या दिवशीं एकादशी होती व म्हणून वारकरी मंडळींचा समुदाय भगवा झेंडा घेऊन तिथें जमला होता. आम्ही आंत गेलों. हृदयांत भक्ति घेऊन अंगणांत पाऊल घातलें. प्रवेश करतांना आम्हांला वाटलें कीं, हरिजनांचें दुःख पाहून विरघळून जाणाऱ्या आणि एका अस्पृश्य मुलाला वाळवंटांतील दुपारच्या तापलेल्या वाळूंतून उचलून त्याला घरीं पोहोंचविणाऱ्या स्वामी एकनाथांच्या समाधीचें दर्शन घेऊन आम्ही धन्य होऊं. पण आमचें दैवच उफराटें. तिथें अशी पाटी लिहिलेली होती कीं, हरिजन आणि म्लेंछ यांना आंत येण्याची मनाई आहे. आमच्या हृदयाला खूप यातना झाल्या. आंत प्रवेश न करतांच उलट्या पावलीं परत जावें असें वाटलें. पण मी संस्कृतीचा अभ्यासू ठरलों. भक्त या नात्यानें जरी नाहीं पण अभ्यासक म्हणून तरी मला सर्वत्र जायलाच हवें. मी आंत जो गेलों तो याच अभिनिवेशानें

माझा उत्साह पाहून तेथल्या पुजाऱ्यांना जरूर असें वाटलें असेल कीं, या भोळ्या भक्ताकडून कांहीं दक्षणा तर लाटूंच आणि दक्षणा जरी यानें दिली नाहीं तरी हा गद्गद् होऊन येथें लोटांगण तर घालीलच घालील. परंतु लोटांगण तर दूरच राहिलें, मीं नुसता नमस्कार पण केला नाहीं. मनोमन मात्र नुसती प्रार्थना गेली कीं, "नाथ महाराज! अस्पृश्यता निवारण्याच्या ज्या धर्माचे तुम्ही प्रवर्तक झालांत, त्याचाच द्रोह करून मी आंत आलेला तुम्हांस दिसतोंच आहें. जिथें हरिजनांना बंदी आहे तिथें मलाहि प्रवेश नाहीं. म्हणून अशा या धर्मद्रोही अवस्थेंत मी पूजनाचा अधिकारी नाहीं. येथें मी जो आलों तो या इथें जमलेल्या पुष्कळशा भोळ्या भक्तांच्या दर्शनासाठीं; तसेंच या देवस्थानचा कारभार कसा काय चालतो याची थोडी माहिती मिळविण्यासाठीं. कोर्टाच्या बेलिफाला किंवा शिपायाला जसें प्रत्येक ठिकाणीं जावें लागतें त्या भावनेनें मी इथें आलों आहें. मला क्षमा करा."

एकनाथांच्या द्वारी हरिजनांना मज्जाव करणें म्हणजे नाथांच्या हृदयावर घाव घालण्यासारखें आहे, हें या सनातन्यांना कळत कसें नाहीं!

आम्ही शहरांत गेलों. सर्वप्रथम नदीकिनारीं जाऊन गोदावरी मातेच्या शीतल जलांत पाय ठेवला आणि दाह शांत करून घेतला. घाटावर मांडी मारून गोदामाईचें ध्यान केलें. जीवनदर्शनाचें सुख अनुभवून आम्ही वर गेलों. एका बाजूला मातींत दबलेली जुनी वस्ती—आतां जी खणून काढली आहे ती—पाहून आलों. सिंधमध्यें "मूवन-जो-दडो" (मूवन=मृत, जो=चीं, दडो=टेकडी) चा शोध लागल्यावर, बिहार-पटन्याजवळ अशोकाचा पाटलीपुत्र येथील राजवाडा आणि काश्मीरची प्राचीन राजधानी जी अनंतपूर हीं जमिनीच्या पोटांतून बाहेर काढल्यानंतर आतां हें असलें उत्खनन लोकांना जरूरीचें वाटूं लागलें आहे. पृथ्वीच्या पोटांत गडप झालेलीं प्राचीन स्मारकें खणून काढण्याचे प्रयत्न होत आहेत. पैठणची जुनी वस्ती खोदून काढल्यानंतर ज्या वस्तु मिळाल्या त्या पुराणवस्तु संशोधन खात्यानें हैद्राबाद येथें नेलेल्या आहेत. त्यामुळें आम्हांला केवळ उत्खनन पाहूनच संतोष मानावा लागला.

पैठण शहरीं जुन्या काळच्या भव्य वाड्यांचे भग्नावशेष जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. त्या घरांची घडण, तिथलें लांकूडकाम, खोदकाम सगळें आकर्षक आणि अभ्यसनीय आहे. ऐश्वर्य म्हणजे काय आणि त्याचा विनाश झाल्यानंतर

तें भग्नदृश्य कसें दिसतें याची कल्पना येण्यासाठीं तरी एकदां पैठणला जायला पाहिजे. 'प्रतिष्ठान'हि शेवटीं 'प्रतिष्ठित' होऊं शकतें हें पाहूनच भगवान् बुद्धांनीं खालील उद्‌गार काढले असतील :

"अनिच्या वत संखारा उप्पादव्यय धम्मिनो"

जिथें जिथें मुसलमानांची राजवट अस्तित्वांत आली तिथें तिथें हिंदूंचीं मंदिरें आणि प्रासाद यांचा नाश दुर्दैवानें पहावाच लागतो. शालिवाहन तर वीस शतकांच्या आरंभींच होऊन गेलेला. त्याचा राजवाडा मुसलमानांच्या हातीं पडण्याच्या अगोदरच पडून गेला असल्यास कांहीं मोठें नवल नाहीं. आणि पुण्यापासून ५० मैलांवर असलेल्या शिवराजाच्या जन्मभूमीचा जीर्णोद्धार करण्याचेंहि पेशव्यांना जिथें सुचूं शकलें नाहीं, तिथें शालीवाहनाच्या स्मृतीला कोणीहि उजळा दिला नाहीं ह्याबद्दल गाऱ्हाणें तरी कसें करणार?

आम्ही शिवदिन केसरीची समाधि आणि कवि अमृतरायांचा मठ पाहून आलों. दोन्ही ठिकाणीं आमच्या पदरीं निराशाच पडली. शिवदिन केसरीच्या मठाचें उत्पन्न पुष्कळ आहे. परंतु या मठांत आम्हांला त्या कवीचे हस्तलिखित किंवा छापील ग्रंथ मुळींच आढळले नाहींत. तिथें प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या पोथ्या तरी आहेत किंवा नाहीं यासंबंधीं आम्हीं चौकशी केली तेव्हां आम्हांला समजलें कीं, कसली तरी एक पोथी कोणी भल्या माणसानें एका युरोपियन माणसाला तीन हजार रुपयांना विकली. पोथी कसली होती याबद्दल मात्र कोणाकडूनच कांहीं कळूं शकलें नाहीं. एका माणसानें कल्पना केली कीं, त्या पोथींत शस्त्रास्त्रांची माहितीच असेल. माझ्या सनातनी मनानें चटकन् असा निर्णय घेतला कीं, पोथी असेलच तर शालीवाहनाच्या वेळचीच असली पाहिजे. कांहीं का असेना तीन हजार रुपये देऊन कोण्या तरी जर्मन माणसानें ती पोथी लाटली खरी. जर्मन पंडितांनीं तिचें भाषांतर केलें व हिटलरला दिलें. त्यांत जी माहिती दिलेली आहे तिच्या जोरावरच आज हिटलर प्राणघातक बॉंब बनवितो. पॅराशूटमधून आपलें सैन्य शत्रूच्या मुलखांत उतरवितो. 'आर्योच्छिष्टं जगत् सर्वम्!'

ज्या प्रतिष्ठान शहरी चौदा विद्यांचें आणि चौसष्ट कलांचें अध्ययन चालत असे, दशग्रंथी घोष चालू असे त्या ठिकाणीं महत्त्वाचे ग्रंथ मिळायलाच हवेत. सर्वच ब्राह्मण तीन हजार रुपयांच्या लालचेनें पोथी विकणाऱ्यांपैकीं नसतात. कांही धर्मनिष्ठ ब्राह्मणांनीं विचार केला कीं, 'आतां कलीचा

संचार सुरू झाला आहे. धर्मभ्रष्ट लोकांच्या हातीं या पोथ्या पडल्यावांचून रहायच्या नाहींत. आमचें पवित्रतर धार्मिक साहित्य अनधिकारी लोकांच्या हातीं जाईल.' हें संकट टळावें म्हणून त्यांनीं अगदीं चांगल्या पोथ्या गोदावरींत बुडवून टाकल्या आणि बुडता धर्म वांचविला. धर्मनिष्ठा ह्याचेंच नांव आहे! प्राचीन ऋषींनीं जेव्हां –'बिभेति अल्पश्रुतात् वेदो मा अयं प्रहरिष्यति' हें वचन म्हटलें तेव्हां वरील प्रकारचा अर्थ – किंवा अनर्थ – त्यांच्या लक्षांत आला नसेल!

चौकशीअंती असें समजलें की, आतां पैठण शहरीं विद्येची प्रतिष्ठा असलेला एक देखील ब्राह्मण राहिला नाहीं. गीतेचा अर्थ समजून ती वाचूं शकणारा एक ब्राह्मण शोधतां शोधतां काय आटापिटा करावा लागला याचें वर्णन करून एका महाशयांनीं आमची खात्री करून दिली कीं, आतां या ठिकाणीं धर्माची 'रक्षा' करणारेच फक्त राहिले आहेत.

परंतु पैठण शहरीं सौजन्याहि राहिलें नाहीं असा मात्र ग्रह करून घेऊं नये. मी किती तरी ठिकाणीं फिरलों आहें. प्रत्येक ठिकाणीं स्थानिक लोक माझें आगत-स्वागत करतात. परंतु पैठणसारख्या तीर्थक्षेत्राच्या मंदिरांत बसून जेव्हां मीं प्रवचन केलें व अस्पृश्यता-निवारणाची अगदी स्पष्ट भाषेंत चर्चा केली तेव्हां माझी अटकळ अशी कीं, मला त्या ठिकाणीं मार जरी बसला नाहीं तरी कमींत कमी, सभेंत गोंधळ तरी होईल. परंतु असें कांहींच झालें नाहीं. उलट लोकांनीं अगदी शांतपणें आणि भलेपणानें माझें भाषण ऐकून घेतलें आणि सभा संपल्यावर प्रश्नोत्तरें करून याविषयीं विचार करण्यासारखे मुद्दे उपस्थित केले.

शहरांत ज्या ठिकाणीं एकनाथ महाराज रहात होते तेथें एक देऊळ आहे. देवस्थानच्या एका कोपऱ्यांत एक खोल विहीर आहे. वरून ती निरुंद असून आंत चांगली मोठी आहे. तिच्याबद्दल असें सांगतात कीं, नाथ महाराजांच्या पुण्यतिर्थाच्या आठ-पंधरा दिवस अगोदर लोक नदीचें पाणी घागरी-घागरींनीं आणून विहिरींत रिचवितात. कितीहि पाणी टाकलें तरी विहीर भरत नाहीं. पण नाथषष्ठीचा दिवस आला कीं, त्या दिवशीं मात्र एकदम विहीर भरून पाणी चमकूं लागतें आणि हजारों लोक जरी पाणी प्याले तरी पाणी कमी होत नाहीं.

याच देवळांत नाथ महाराजांच्या एका वंशजाची भेट झाली. त्यांच्याकडेच देवळाची मालकी असावी. त्यांचें धिप्पाड शरीर माझ्या डोळ्यांत भरलें. नाथांच्या समाधिस्थानीं अस्पृश्यांना प्रवेश नसल्यामुळें मला जें दुःख झालें होतें तें मीं त्यांना सांगितलें. त्यांनीं सर्वार्थसाधक मौनानेंच माझ्यापासून स्वतःची सुटका करून घेतली.

आणि मग मी पैठणचें विख्यात जरीचें काम पाह्यला गेलों. आठ तास खपल्यावर ६ इंच रुंद काठ फार तर एखाद्या इंचानेंच वाढतो. सोन्याचांदीच्या दोऱ्यांनीं वेलबुट्टी, पोपट, मोर यांचे काठ हे विणकर लोक विणतात. येथें एक म्हण प्रचलित आहे : ' बोटभर विणावें आणि पोटभर खावें. '

येथली ही कारागिरी पाहून ह्या कलावंताबद्दल आपल्या मनांत अभिमान व दया दोन्हीहि एकदम उत्पन्न होतात. हे विणकर किती कौशल्यानें आणि शांततेनें विणतात आणि एकाहून एक सरस आकृति मुळींच चूक न करतां सजीव करीत जातात. पण इतक्या मेहनतीचें फळ त्यांना काय मिळतें ? त्यांना बिचाऱ्यांना पैशाशीं काम. त्यांची ही कलाकुसर धुक्यासारख्या तलम आणि फुलासारख्या नाजूक साडीला काठ म्हणून लावली जाते. मग ती साडी आपलें निरर्थक जीवन सुखांत किंवा दुःखांत घालविणारी एखादी अंतःपुरवासिनी राजकन्या नेसते. राणिवशांतल्या तिच्या सख्या त्या पाताळाची प्रशंसा करतात आणि तिला जर बिचारीला सवत असली तर ती मत्सरानें जळूं लागते.

आज कलेची जाहिरात जास्त होते, पण कलाकृतीचा शोक मात्र समाजांत राहिला नाहीं. जर लोकांमध्यें कलेची कदर राहिली असती तर एकट्या गुजराथ-मध्यें दरवर्षी हजारों रुपयांचा माल येथून मागविला गेला असता. येथील कला अप्रतिम आहे याबद्दल शंकाच नाहीं; पण ती आतां कालविसदृश झालेली आहे. गुजराथचे कारागीर येथला नमुना सहज उचलूं शकतात. पण लोकांची अभिरुचि बदलली आहे त्याला काय करायचें ?

बाळपणापासून पैठणबद्दल किती अद्भुत कथा मी वाचीत आलों होतों. त्यांतील रस्त्यावरचीं किती दृश्यें वेगवेगळ्या अवस्थेंत मीं माझ्या कल्पनेनें उभ-विलीं होती. आणि आज अखेर ह्या वयांत पैठण पहाण्याचा योग आला. जुन्या वाड्यांचे भग्नावशेष आणि गोदावरीचा सजीव प्रवाह हें पाहिलें कीं, जीवन आणि मृत्यु यांच्या विरोधाची आठवण येते.

संचार सुरू झाला आहे. धर्मभ्रष्ट लोकांच्या हातीं या पोथ्या पडल्यावांचून रहायच्या नाहींत. आमचें पवित्रतर धार्मिक साहित्य अनधिकारी लोकांच्या हातीं जाईल.' हें संकट टळावें म्हणून त्यांनीं अगदीं चांगल्या पोथ्या गोदावरींत बुडवून टाकल्या आणि बुडता धर्म वांचविला. धर्मनिष्ठा ह्याचेंच नांव आहे! प्राचीन ऋषींनीं जेव्हां – 'बिभेति अल्पश्रुतात् वेदो मा अयं प्रहरिष्यति' हें वचन म्हटलें तेव्हां वरील प्रकारचा अर्थ – किंवा अनर्थ – त्यांच्या लक्षांत आला नसेल!

चौकशीअंतीं असें समजलें की, आतां पैठण शहरीं विद्येची प्रतिष्ठा असलेला एक देखील ब्राह्मण राहिला नाहीं. गीतेचा अर्थ समजून ती वाचूं शकणारा एक ब्राह्मण शोधतां शोधतां काय आटापिटा करावा लागला याचें वर्णन करून एका महाशयांनीं आमची खात्री करून दिली कीं, आतां या ठिकाणीं धर्माची 'रक्षा' करणारेच फक्त राहिले आहेत.

परंतु पैठण शहरीं सौजन्याहि राहिलें नाहीं असा मात्र ग्रह करून घेऊं नये. मी किती तरी ठिकाणीं फिरलों आहें. प्रत्येक ठिकाणीं स्थानिक लोक माझें आगत-स्वागत करतात. परंतु पैठणसारख्या तीर्थक्षेत्राच्या मंदिरांत बसून जेव्हां मीं प्रवचन केलें व अस्पृश्यता-निवारणाची अगदीं स्पष्ट भाषेंत चर्चा केली तेव्हां माझी अटकळ अशी कीं, मला त्या ठिकाणीं मार जरी बसला नाहीं तरी कमींत कमी, सभेंत गोंधळ तरी होईल. परंतु असें कांहींच झालें नाहीं. उलट लोकांनीं अगदीं शांतपणें आणि भलेपणानें माझें भाषण ऐकून घेतलें आणि सभा संपल्यावर प्रश्नोत्तरें करून याविषयीं विचार करण्यासारखे मुद्दे उपस्थित केले.

शहरांत ज्या ठिकाणीं एकनाथ महाराज रहात होते तेथें एक देऊळ आहे. देवस्थानच्या एका कोपऱ्यांत एक खोल विहीर आहे. वरून ती निरुंद असून आंत चांगली मोठी आहे. तिच्याबद्दल असें सांगतात कीं, नाथ महाराजांच्या पुण्यतिथीच्या आठ-पंधरा दिवस अगोदर लोक नदीचें पाणी घागरी-घागरींनीं आणून विहिरींत रिचवितात. कितीहि पाणी टाकलें तरी विहीर भरत नाहीं. पण नाथषष्ठीचा दिवस आला कीं, त्या दिवशीं मात्र एकदम विहीर भरून पाणी चमकूं लागतें आणि हजारों लोक जरी पाणी प्याले तरी पाणी कमी होत नाहीं.

याच देवळांत नाथ महाराजांच्या एका वंशजाची भेट झाली. त्यांच्याकडेच देवळाची मालकी असावी. त्यांचें धिप्पाड शरीर माझ्या डोळ्यांत भरलें. नाथांच्या समाधिस्थानीं अस्पृश्यांना प्रवेश नसल्यामुळें मला जें दुःख झालें होतें तें मीं त्यांना सांगितलें. त्यांनीं सर्वार्थसाधक मौनानेंच माझ्यापासून स्वतःची सुटका करून घेतली.

आणि मग मी पैठणचें विख्यात जरीचें काम पाहायला गेलों. आठ तास खपल्यावर ६ इंच रुंद काठ फार तर एखाद्या इंचानेंच वाढतो. सोन्याचांदीच्या दोऱ्यांनीं वेलबुट्टी, पोपट, मोर यांचे काठ हे विणकर लोक विणतात. येथें एक म्हण प्रचलित आहे : ‘ बोटभर विणावें आणि पोटभर खावें. ’

येथली ही कारागिरी पाहून ह्या कलावंताबद्दल आपल्या मनांत अभिमान व दया दोन्हीहि एकदम उत्पन्न होतात. हे विणकर किती कौशल्यानें आणि शांततेनें विणतात आणि एकाहून एक सरस आकृति मुळींच चूक न करतां सजीव करीत जातात. पण इतक्या मेहनतीचें फळ त्यांना काय मिळतें ? त्यांना बिचाऱ्यांना पैशाशीं काम. त्यांची ही कलाकुसर धुक्यासारख्या तलम आणि फुलासारख्या नाजूक साडीला काठ म्हणून लावली जाते. मग ती साडी आपलें निरर्थक जीवन सुखांत किंवा दुःखांत घालविणारी एखादी अंतःपुरवासिनी राजकन्या नेसते. राणीवशांतल्या तिच्या सख्या त्या पाताळाची प्रशंसा करतात आणि तिला जर बिचारीला सवत असली तर ती मत्सरानें जळूं लागते.

आज कलेची जाहिरात जास्त होते, पण कलाकृतीचा शोक मात्र समाजांत राहिला नाहीं. जर लोकांमध्यें कलेची कदर राहिली असती तर एकट्या गुजराथ-मध्यें दरवर्षी हजारों रुपयांचा माल येथून मागविला गेला असता. येथील कला अप्रतिम आहे याबद्दल शंकाच नाहीं; पण ती आतां कालविसदृश झालेली आहे. गुजराथचे कारागीर येथला नमुना सहज उचलूं शकतात. पण लोकांची अभिरुचि बदलली आहे त्याला काय करायचें ?

बाळपणापासून पैठणबद्दल किती अद्भुत कथा मी वाचीत आलों होतों. त्यांतील रस्त्यावरचीं किती दृश्यें वेगवेगळ्या अवस्थेंत मीं माझ्या कल्पनेनें उभ-विलीं होतीं. आणि आज अखेर ह्या वयांत पैठण पहाण्याचा योग आला. जुन्या वाड्यांचे भग्नावशेष आणि गोदावरीचा सजीव प्रवाह हें पाहिलें कीं, जीवन आणि मृत्यु यांच्या विरोधाची आठवण येते.

या नगरीच्या जुन्या ऐश्वर्यासंबंधीं एक गोष्ट इथें आमच्या ऐकण्यांत आली. एक जुनी आख्यायिका म्हणून ती ग्रथित करण्याजोगी आहे. एकदां पेशव्यांची छावणी पैठणजवळ पडली होती. पैठणच्या एका व्यापाऱ्याला असें वाटलें कीं, पेशव्यांच्या मुलीला हळद-कुंकवाला बोलवावें. त्यानें आपल्या लहान मुलाकरवीं पेशव्यांकडे आमंत्रण दिलें. पेशव्यांनीं विचार केला कीं, हा एक व्यापारी माझ्या मुलीला आपल्याकडे बोलावतो आणि स्वतः येऊन आमंत्रण न देतां आपल्या मुलाला पाठवितो. ह्याच्याजवळ अशी संपत्ति तरी किती असेल? तेव्हां पेशवे म्हणाले, "आमच्या ह्या छावणीपासून तुमच्या घरांपर्यंत रस्ताभर रुपयांनीं भरलेल्या पिशव्या जर आंथरणार असाल तर माझी मुलगी तुमच्याकडे येईल. तिचा पाय मात्र जमिनीला लागतां कामा नये. हें कबूल असेल तर आमंत्रण द्या."

मुलगा बापाला विचारावयास आला. बापाला मुलाचा फार राग आला आणि रागांतच तो म्हणाला, "येवढीशी गोष्ट विचारायला तूं परत कशाला आलास? तिथल्या तिथेंच तूं कबूल कां केलें नाहींस? बरें अजूनहि हरकत नाहीं. पुन्हां जाऊन सांग कीं, म्हणावें माझे वडील विचारतात कीं, वेग-वेगळ्या छापाच्या रुपयांच्या थैल्या हव्यात कीं एकाच टांकसळींतले सर्व रुपये हवेत? एकाच टांकसाळींतले रुपये हवे असतील तर मला जरा थैल्यांची निवड करावी लागेल."

पेशव्यांनीं ताडलें कीं, आसामी कांहीं सामान्य नव्हे. त्यांनीं आमंत्रणाचा स्वीकार केला.

ज्या थैल्या पेशव्यांच्या मुलीच्या पायाखालीं आंथरल्या गेल्या होत्या त्या घरांत आणल्या जाऊं नयेत म्हणून व्यापाऱ्यानें ते रुपये खर्च करून त्यांतून गोदावरीचा एक मोठा घाट बांधला आणि या प्रसंगाचें स्मारक केलें!

# गुरु गोविंदसिंहांचा गुरुद्वारा

२

मराठ्यांच्या निःपातासाठीं ज्या वेळेस औरंगजेब बादशहा दक्षिणेंत येऊन आपला डेरा ठोकून बसला होता, त्याच वेळेस शिखांचे शेवटचे गुरु गोविंदसिंह देखील महाराष्ट्रांतच औरंगाबादेजवळील नांदेडला एक गुरुद्वारा बनवून निवृत्तिपूर्ण आयुष्य व्यतीत करीत असावेत हा विलक्षण योगायोगच नव्हे का ? देवगिरी ( दौलताबाद ), प्रतिष्ठान ( पैठण ), नंदगिरी ( नांदेड )चा प्रदेश एके काळीं दक्षिणचा राजधानी मानली जात होती. शिवाजी महाराजांचे आजोबा याच प्रदेशांत वसलेल्या वेरूळें या गांवचे पाटील होते. त्यांचे चिरंजीव शहाजीराजे अहमदनगरच्या दरबारांत राजपालकाच्या पदावर होते. आणि युवराजांना आपल्या कडेवर घेऊन सिंहासनीं बसून ते कारभार चालवीत. त्यांनीं आपला जहागिरीचा मुलूख दूर पुणें व जुन्नरच्या बाजूला ठेवला होता. आणि तिथेंच शिवाजी राजांनीं स्वराज्याच्या साधनेचा श्रीगणेशा केला होता. वसुदेव आणि देवकी मथुरेच्या दरबारी असली तरी कृष्णाचें पालनपोषण वृंदावनींच व्हायचें आणि कंसवध झाल्यावर आपत्ति ओढविल्या तरी त्यांनीं आपलें वास्तव्य दूर काठेवाडच्या शिखरावर – ' Gate of India ' – द्वारका वसवून करावयाचें.

मोंगल साम्राज्याविरुद्ध डोकें काढूं शकणाऱ्या तीन शक्ति त्या काळीं होत्या – दक्षिणेंत मराठे, पंजाबच्या बाजूला शीख आणि या दोघांच्यामध्यें राणा प्रतापच्या नेतृत्वाखालीं आपल्या स्वातंत्र्यासाठीं झिजणारे रजपूत !

आरंभीं आरंभीं शीख संप्रदाय भक्तीचा संप्रदाय होता. परंतु मोंगल बादशहांनीं या गुरुभक्तांना मारून मारून वीर बनविलें. श्रीगुरु गोविंदसिंहांनीं या भक्तांमधून तळहातावर शिर घेऊन लढणारी एक खालसा फौज घडविली आणि निरुपद्रवी, अज्ञानी, पंजाबी जनतेला नरशार्दूल करून सोडलें.

पण यांत नवल तें कसलें ? औरंगजेबानें गुरु तेगबहादूरचा शिरच्छेद केला. गुरु गोविंदसिंहांच्या मुलांना मारविलें आणि अशाच रीतीनें शिखांना क्षात्रधर्माची दीक्षा दिली.

एका गोष्टीचें मात्र आश्चर्य वाटतें. गुरु गोविंदसिंहांचे पंजाबी शिष्य व समर्थ रामदासांचे महाराष्ट्रीय अनुयायी एक कसे होऊं शकले नाहींत ? महाराष्ट्रांत येऊन रहाण्याचें गुरु गोविंदसिंहांना काय प्रयोजन ?

शिवाजीनें रजपुतांबरोबर संघटन करण्याचा प्रयत्न केला, याचा पुरावा सांपडतो. बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजानें शिवाजीचा सल्ला घेतला होता, पेशव्यांपासून कुमक घेतली होती याचाहि उल्लेख आहे. पण या साहाय्याच्या मोबदल्यांत पहिल्या बाजीरावानें लागलीच वृद्ध छत्रसालाशीं बापलेकाचें नातें जोडून बुंदेलखंडाचें $\frac{1}{3}$ राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. त्या काळीं कुणी कुणाला निःस्वार्थभावानें मदत करीतच नसत. देण्याघेण्याचाच क्रम होता. महामति रामचंद्रपंत अमात्यासारखे प्रज्ञ देखील जहागिरीच्या लालसेपासून मुक्त नव्हते.

गुरु गोविंदसिंह दक्षिणदेशीं कां रहायला आले ? मोंगल बादशहाशीं त्यांचे संबंध कसे राहिले होते ? मराठ्यांशीं कसे होते ? याचीं उत्तरें शोधण्याचा यत्न केला जाणें जरूर आहे.

गुरु गोविंदसिंहांकडून लढाईंत एखादा अफगाण ठार झाला असावा, त्या अफगाणाच्या मुलानें सूड घेण्याचा डाव मांडला. तो मुलगा गुरु गोविंदसिंहांजवळ आला आणि त्यानें त्यांची सेवाचाकरी आरंभिली. बाप युद्धांत मारला गेला, यांत कांहीं वैयक्तिक द्वेषबुद्धि किंवा वैर असण्याचें कारण नाहीं. त्याच्या मुलाला जवळ करण्यांत काय हरकत आहे, असें गुरु गोविंदसिंहांनीं मनाशीं ठरविलें असावें आणि म्हणून त्यांनीं त्या मुलाला आपल्याजवळ राहूं दिलें. मुलानें संधि साधली व निजलेल्या गोविंदसिंहांच्या पोटांत सुरा भोसकून सर्व गोष्टींचा निकाल लावला.

गुरु गोविंदसिंहांनीं क्षमेचा त्याग करून युद्धधर्माची दीक्षा घेतली होती. सबब घायाळ झाल्यावरहि त्यांनीं एकदम उठून त्या खुनी मुलाला लोळविलें व मग आपला देह टाकला.

आज नांदेड हें अखिल भारतांतील शिखांचें तीर्थस्थान झालें आहे. शीख येथील गुरुद्वाराजवळ आपल्या दानाचें नि भक्तीचें प्रदर्शन करतात.

सायंकाळच्या सभेनंतर आम्ही हा नांदेडचा गुरुद्वारा पहावयास गेलों. उशीर झाल्यामुळें आंतील दरवाजे बंद होऊन गेले होते. आमची फार निराशा झाली. रात्रौ दोन वाजतां नांदेडहून परतावयाचें होतें. इतक्या दूर आलों, पण देवळाचें दर्शन कांहीं झालें नाहीं. 'तथापि देवळाच्या परकोटाच्या आंतली परिक्रमाच करून मग बाहेरची करावी व दिसेल तें बघावें' असा विचार करून आम्ही पुढें होणार इतक्यांत अचानक विजेचा प्रवाह बंद पडला व चांदण्या रात्रींहि देवळाच्या आंतील भागीं अमावास्या झाली. आमची अंतरप्रदक्षिणा अशाच स्थितींत आटोपली.

'दहापंधरा मिनिटें थांबाल तर रात्रींच्या शेवटच्या प्रार्थनेसाठीं दारें उघडतील व तुम्हांला दर्शन घडूं शकेल'—असें कुणी तरी म्हणालें. आमची आंतली व बाहेरची प्रदक्षिणा संपली होती. गुरुद्वाराच्या स्थापत्यकलेचें आम्हीं निरीक्षण केलें आणि दारें उघडतांच आंत शिरलों.

पट तर उघडले पण आंत काय दिसणार ! कांहीं तरी आहे व त्यावर आमची दृष्टि स्थिर झालेली आहे एवढ्यावरच संतोष मानावा लागला. पण आम्ही निघणार तोंच विजेची आमच्यावर मेहेरनजर झाली व ती प्रगट झाली.

आतां आंतील दर्शन होण्यास कांहींच प्रत्यवाय नव्हता. गुरुद्वाराच्या गाभाऱ्यांत मुख्य पुजारीच काय तो जाऊं शकतो. नियमान्वयें हा बाल-ब्रह्मचारी असतो. चोवीस तासांत त्याला किती तरी वेळां पूजा करावी लागते. मध्यरात्रीनंतर सबंध मंदिर धुवावें लागतें. आंत जें जुन्या शस्त्रांचें आगर आहे त्याचीहि झाडपूस करावी लागते. इतर भक्तमंडळी गाभाऱ्याच्या समोर असलेल्या मंडपापर्यंत जाऊं शकतात; आणि आमच्यासारखे 'इतरेजन' मंडपाच्या कडेस उभे राहून दर्शन घेऊं शकतात.

तेथून विजेच्या प्रवाहानें आंतील सर्व कांहीं दिसत होतें. समाधीवर दोहों बाजूंस अनेक तलवारी ठेवल्या आहेत. खालीं समाधीला टेकून गुरु गोविंदसिंहांचें छायाचित्र ठेवलें आहे. त्यांत गुरु गोविंदसिंह राजवस्त्रें परिधान करून शस्त्रोद्यत असे अश्वारूढ झालेले दिसतात.

दर्शनाच्या वेळीं मनांत कोणकोणते भाव जागृत झाले हें सांगणें कठीण आहे. बिहारला गेलों होतों तेव्हां तेथें गुरु गोविंदसिंहांच्या जन्मस्थानीं असलेला गुरुद्वारा पाहिला होता. राजगृह-नालंदा येथें गेलों होतों त्या वेळींहि एक इतिहासप्रसिद्ध गुरुद्वारा बघितला होता. लाहोर येथें पांचवे बादशाह अर्जुनदेव यांचाहि गुरुद्वारा व त्या गुरुद्वारांची इंग्रजांनी केलेली डागडुजी पहावयास मिळाली होती. अमृतसरचें प्रसिद्ध सुवर्णमंदिर तर शिखांची काशी किंवा मक्का आहे. त्याचें दर्शन दोनदां घडलें. फक्त नांदेडचा हा गुरुद्वारा पहावयाचा राहून गेला होता. या वेळेस तोहि पाहून कृतार्थ झालों. नानकाना येथें जो गुरूंचा बाग आहे आणि ज्याचें नांव सत्याग्रही शिखांनीं अजरामर करून ठेवलें आहे तो अजून पहावयाचा राहिला आहे.

नानक, अंगद, अर्जुनदेव, रामदास आदि शीख गुरूंनीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या प्राचीन भक्तिमार्गाचा उद्धार करून त्याला उज्ज्वल रूप दिलें. आणि जड व अज्ञ जनतेला उज्ज्वल धर्ममार्गाचे यात्रेकरू बनविलें. त्यांचा ग्रंथसाहेब म्हणजे हिंदुस्थानांत निर्माण झालेलें संतवाङ्मय आणि भक्तिवाङ्मय यांचें विशिष्ट रीतीनें काढलेलें सार आहे. धर्म आणि कर्मकांडाच्या जंजाळांतून लोकांना वांचवून शुद्ध आचार व शुद्ध विचार यांच्या द्वारें ईश्वरपरायण बनविण्याची प्रवृत्ति म्हणजे शीखधर्म !

ईश्वरपरायण लोक रिकामटेकडे बनूं नयेत म्हणून शिखांच्या शेवटच्या गुरूनें त्यांना जीवाचें मोल देऊन आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याची दीक्षा दिली. त्यांच्या वेळेस जें जें करण्यासारखें होतें तें तें गुरु गोविंदसिंहांनीं केलें.

गुरुपरंपरा ही कोण्या एका कुळाची गादी नसून ती एक आध्यात्मिक परंपरा आहे. त्या परंपरेनें मानवस्वातंत्र्य संभाळलें गेलें पाहिजे. पण ही परंपरा कदाचित् एक बंधनच न बनो, ही गोष्ट विचारांत घेऊन त्यांनीं देह ठेवण्याच्या वेळीं असें जाहीर केलें कीं, ‘ग्रंथसाहेबच शिखांना गुरुस्थानीं आहे. यापुढें कोणत्याहि व्यक्तीला गुरु समजण्याची परवानगी नाहीं.’

मला असें प्रामाणिकपणें वाटतें कीं, आध्यात्मिक क्षेत्रांत गुरु गोविंदसिंहांनीं घातलेला हा पायंडा अपूर्व आणि अभिनंदनीय आहे. शुद्ध आध्यात्मिक वृत्तीवांचून असें पाऊल टाकण्याची कुणाचीहि हिम्मत झाली नसती.

# पुण्य-तारा-नगरी

३

दा. क्र. १२२१०

पुण्याहून सिंहगड पहाण्यांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं. दक्षिणेकडे एक विशाल पर्वत व त्याच्या उजवीकडे कांहींसें सपाट असें त्याचें उंच शिखर, एवढीच सिंहगडाची कल्पना येते. किल्ल्याच्या डावीकडचा म्हणजे पूर्वेकडचा भाग दबलेला व त्याची एक पायरी बनलेली. त्याच्या समोरच एका शिखरावर बटाट्यासारखा एक दगड आहे. फारच कल्पना चालविली तर म्हणतां येईल कीं, महादेवासमोर ज्याप्रमाणें नंदी बसलेला असतो त्याप्रमाणें सिंहगडासमोर तो दगड बसलेला आहे.

परंतु सिंहगडावरून दिसणारें 'पुण्याचें' दृश्य अनेक रीतींनीं आकर्षक आहे. 'मुठा' नदी उत्तरेकडलें सबंध खोरें धूत धूत पुढें जात असते. 'खडकवासल्या'च्या धरणामुळें तिचें कांहींच नुकसान झालेलें नाहीं. समृद्धशाली सरोवराप्रमाणें प्रसन्न चित्तानें ती चोहोंकडे संचार करते व तितक्याच सौम्यपणें आगेकूच करते. मूल घेतलेल्या एखाद्या मातेप्रमाणें पुण्याला कडेवर घेऊन 'मुळा' नदीला भेटायला तिला जायचें आहे. परंतु मीलनाची तिला घाई मुळींच नाहीं. संगमापाशीं 'मुळा-मुठा' भेटतात. कसलाच संभ्रम किंवा उन्माद दिसून येत नाहीं तेथें !

सिंहगडावरून पुणें सहज दिसूं शकतें. आणि दुर्बिणींतून तर अगदींच स्पष्ट दिसतें. पुणें शहर किती लांब-रुंद आहे याची चांगली कल्पना इतक्या उंचीवरूनच होऊं शकते. 'पर्वती' आणि 'पर्णकुटी', 'एंजिनियरिंग कॉलेज' व 'शेतकी कॉलेज' – सगळें अगदीं स्पष्ट दिसतें. शपथेसाठीं म्हणून तेथें ज्या एक-दोन गिरण्या आहेत त्याहि अरसिकांसारख्या आपलें अस्तित्व भासवितात.

परंतु पुण्याचें खरें खरें दर्शन रात्रींच्या वेळीं घडतें. आकाश स्वच्छ असलें आणि चांदणें नसलें म्हणजे विजेचे असंख्य तारे एका टोंकापासून दुसऱ्या

टोंकापर्यंत चमचम चमकत असतात. मध्यरात्रीं उठून पाहिलें तरी 'पुण्याचे' ते तारे झोंपत नाहींत. पहाटे उठून पहा, तीच स्थिति. पूर्वेकडे जेव्हां हंसत हंसत उषेचें आगमन होतें तेव्हांच ते दिवे पुण्याला तिच्या हातांत सोपवून विसावा घेतात. तोंपर्यंत ते ' अविचल मंगल नत नयने अनिमेषे ' प्रकाश देतच असतात.

सिंहगडावरून पुण्याचें तारानगर जेव्हां पहातों तेव्हां तें किती शांत, प्रसन्न आणि पवित्र वाटतें. आवाज नाहीं, उत्पात नाहीं, धांदल नाहीं. फक्त विजेचे अगणित दिवे आपला सौम्य, मंगल प्रकाश अनंत आकाशांत फेकत असतात. मेजावरील फुलदाणींत एकत्र झालेलीं फुलें जशीं सारखीं हंसतच असतात तसें विशाल अंधकारांत हें दिव्यांचें संमेलन चमकत असतें. हे लक्षावधि प्रकाशबिंदु एकत्र होऊनहि रात्रीचा अंधकार आणि रात्रीची शांति नष्ट करूं शकत नाहींत. निर्वात प्रदेशांत वाऱ्याची एखादी झुळूक आसमंतांतील शांति जशी अधिक निर्भीड बनविते तसे हे दीपवृंद रात्रीच्या निवृत्तिलाच अधिक उत्कट करीत असतात.

पुण्याच्या रस्त्यावर जेव्हां आपण भटकतों तेव्हां हेच विजेचे दिवे आपल्या निर्लज्ज आत्मश्लाघेमुळें किती हास्यास्पद वाटतात ! तथापि इतक्या अंतरावरून हे दिवे मंदिरांतील दीपमालेप्रमाणें सौम्य आणि पवित्र भासतात. चहूंकडे पसरलेल्या ध्वान्त सागरांत एक भलें मोठें जहाज नांगर टाकून पडलें आहे आणि वाटेल त्या क्षणीं पर्यटनाला निघण्याच्या तयारींत आहे असें दिसतें तें दृश्य !

त्यांतहि सगळे दिवे सारखे नाहींत. पुण्यांत ज्या प्रमाणांत संपत्ति उधळली आहे त्याच प्रमाणांत हे दिवेहि कमीअधिक प्रकाश पाडतात असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

स्टॉकलेच्या ज्योतिर्विषयक पुस्तकांत एक छायाचित्र आहे. त्यांत जगांतील सगळ्यांत मोठ्या वेधशाळेतून 'पसादेना' ( Pasadena ) शहरांतील दिवे कसे दिसतात हें दाखविलें आहे. त्याचेंहि पुण्याचे दिवे पाहिल्यावर स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

ह्या शांत प्रकाशाखालीं काय काय चालत असेल असा प्रश्न मनांत उठला आणि चित्त व्याकुळ झालें. पुण्यासारखी विराट नगरी. तेथें मौज-शौक असणारच. हजार खटपटी असणार. एखाद्या ठिकाणीं खूनहि होत असेल;

सट्टेबाज जुगार खेळत असतील; रेस्टॉरंटमध्यें दारूच्या बाटल्या उडत असतील; विलासी लोक सिनेमांत 'धर्मात्मा' पाहून आपणहि स्वतः धर्मनिष्ठ आहोंत असें मानून घेण्याचा प्रयत्न करीत असतील; आणि किती तरी विद्यार्थी झोंपेचें खोबरें करून अरसिक चोपड्यांतल्या काव्याच्या व्याख्या घोकत बसले असतील.

लाखाच्या वस्तींत एखादा धर्मात्मा नसेलच असें कसें म्हणावें ? तो बिचाऱ्या गीतेंतल्या 'तस्यां जागर्ति संयमी' प्रमाणें जागत राहून परमेश्वराचें ध्यान करीत असेल किंवा कळवळून प्रार्थना करीत असेल कीं, 'दयाघन प्रभो! मानव जातीचा इतका अधःपात शांतपणें तुला कसा पहावतो ? मनुष्याचा उद्धार करणें हें तुला कठीण कार्य वाटतें काय ? इतके सगळे दिवे तुझी कृपा जाहीर करीत असतां त्यांतला एकहि किरण लोकांच्या हृदयापर्यंत कां बरें पोहोंचूं नये ?'

आणि यानंतर जेव्हां त्या दिव्यांकडे माझें लक्ष गेलें तेव्हां असेंच वाटूं लागलें कीं, हा किरणांचा प्रकाश नसून त्या मानवप्रेमी भक्ताची प्रार्थनाच अंधारांत हृदयाला भेटण्याचा प्रयत्न करीत आहे.

गांधीजींनीं मला एकदां लिहिलें होतें कीं, 'आकाशांतले असंख्य तारे असह्य रीतीनें धगधगत असोत परंतु इतक्या अंतरावर ते आपणांस अपार शांतीच देत असतात.'

तेव्हां हेंच खरें कीं, जगांतल्या प्रत्येक वस्तूचा विविध रीतीनें उपयोग होत असतो. सबंध पृथ्वीला वितळून टाकील इतकी गरम व लाखों मैल लांब अशी ज्वाला आकाशांत फेकणारा सूर्य चंद्राकरवीं आपले किरण सौम्य बनवून पुष्करणींतल्या कुमुदांना हंसवितो. जी वस्तु भयानक दिसते तिच्यांतूनहि सौम्य आणि कल्याणदायी परिणाम होऊं शकत असतील तर !

एके ठिकाणीं अनुभव आला कीं, तसलाच पूर्वी आलेला अनुभव ताजा करणें आणि त्यांतील सादृश्य शोधणें हा मनाचा स्वभावच आहे. पुण्याच्या ह्या रजनीदर्शनानें मुंबईच्या असल्याच एका दर्शनाची आठवण झाली. श्री. हिरालाल शाहबरोबर रात्रीचा मलबार हिलवर गेलों होतों. पितळेच्या पत्र्यावर खोदलेलें मुंबईचें चित्र जेथें आहे तेथून आम्हीं मुंबईचे दिवे पाहिले. तें दृश्य अद्भुत, भव्य आणि वैभवयुक्त वाटलें — पण काव्यमय वाटलें नाहीं. त्या विलासासमोर आपण अगदीं दबून गेलों आहोंत, उंच गेलों असलों तरी अपमानित झालों

आहोंत असेंच वाटतें. मुंबईचा प्रकाश आकाशालाच निस्तेज करतो. बिचाऱ्या कावळ्यांनाहि अशी शंका वाटूं लागते कीं, ही रात्र कीं दिवस ! एखादा कावळा दिवस आहे असें समजून आपला आलाप काढायला लागतो. परंतु त्यांतून आत्मविश्वासाचा निश्चित सूर निघत नाहीं. मुंबईत जिथून तिथून प्रकाशाचे स्रोतच निघत असतात. आणि लहानपणीं आग लागल्याचीं जीं दृश्यें पाहिलीं होतीं त्यांचें स्मरण होऊन कसेंसेंच वाटतें. त्यापेक्षां म्हैसूरच्या 'चामुंडा' टेकडीची अखंड दिवाळी पुरवते ! 'चामुंडे'ची चमकती किनार पाहून मनांत केवळ भक्तिभावच निर्माण होतो. त्या उत्सवांत आपण सामील झाल्यासं भगवती कल्याणलक्ष्मी आपलें भलें करील ह्या श्रद्धेनें चित्त प्रसन्न होतें.

एके रात्रीं आम्हीं चामुंडा टेकडीवर जाऊन मातेचें दर्शन घेतलें. वाटलें कीं इतके सगळे तारे कां बरें फेकून दिले आहेत ? कोहिनूरचा वंशवृक्ष कौटुंबिक संमेलन उजविण्यासाठीं येथें जागला आहे काय ? टेकडीच्या दोहों बाजूंचें तमः-प्रकाशाचें तें सौंदर्य न्याहाळून व स्वतःला धन्य समजून आम्हीं परतलों. जीन्स-च्या पुस्तकांत आकाशांत दूर दूर वसणाऱ्या ताऱ्यांचें वर्णन वाचलें होतें. आणि अनंत कोटि ब्रह्माण्डनायकाला उद्देशून आपल्या कवींनीं रचलेलीं स्तोत्रें लहान-पणापासून तोंडपाठ केलीं होतीं. त्यामुळें ह्या सौंदर्याचा आनंद अनंतपट वाढला होता. दुर्बिणींतून पाहिलेली वस्तु हजारपटींनी मोठी दिसते त्याप्रमाणें शास्त्रज्ञ आणि कवींच्या मदतीनें पाहिलेलीं दृश्यें अनुभवगंभीर, कल्पनादृढ आणि विशाल बनतात.

'चिकबल्लापूर' आणि 'दाड्डबल्लापूर' ह्या दोन खेड्यांत नवीनच प्रवे-शिलेली वीज कशी चमकते तें नदीच्या टेकडीवरून पहाण्यासाठीं मी तासन् तास बसत असें. तेथलें दर्शन निराळें आणि पुण्याचें निराळें. सिंहगड नदीपेक्षां अधिक उंच आहे ही गोष्ट खरी. पण सिंहगडावरून पुणें खूप दूर असल्यामुळें आपण अगदीं डोक्यावर उभें राहून पहात आहोंत असें वाटत नाहीं.

सिंहगडावर शिवाजी महाराज आणि राजाराम रहात असतांनाच जर विजेनें पुण्यांत एकाएकीं प्रवेश केला असता तर त्यांना काय वाटलें असतें ? आपल्या राजधानीला आग लागली आहे, आतां ती कशी विझवावयाची ह्या विचारानें त्यांना धास्ती पडली असती का ?

पुष्कळ वेळां असाहि एक विचार मनांत येतो कीं, आपण इतकी वीज उत्पन्न करून वर्षभर दिवाळी साजरी करतों, त्याचा वातावरणावर, वनस्पति-सृष्टीवर, मनुष्याच्या आरोग्यावर आणि त्याच्या स्वभावावर कांहीं भयंकर परिणाम होत नसावा का ? आतषबाजीनें आणि तोफा डागल्यानें जर पाऊस पडूं शकतो; सूर्यावर डाग असल्यानें पीक नासून दुष्काळ पडूं शकतो; तर इतक्या मोठ्या प्रमाणावर वीज निर्माण झाल्यामुळें जगावर परिणाम हा घडत असलाच पाहिजे. त्यामुळें माणसामाणसांना एकमेकांची भीति वाटत असावी आणि त्यांतूनच युद्धें निर्माण होत असावींत.

पुण्यासारखीं किती तरी शहरें रात्रभर सारखीं चमकत असतात, तीं जगांत मोठी क्रांति निर्माण करतात. मनुष्यस्वभावांत दिवसेंदिवस फरक पडत चालला आहे त्याचें कारण जितकें आर्थिक परिस्थिति हें आहे तितकेंच किंवा त्याहूनहि अधिक अद्याप संशोधित न झालेलीं भौतिक कारणेंहि असूं शकतील.

ह्या विचारमालिकेंत मी जो गर्क होऊन गेलों आहें त्याचें कारण पुण्याचे हे दिवेच आहेत.

# पाषाणहृदय

४

: १ :

" बौद्ध, शैव आणि जैन या तीन पंथांत कांहीं साम्य आहे काय ? " प्रश्नाचें उत्तर आपण एखाद्या तत्त्वज्ञान्याकडून मागत नाहीं, तर महाराष्ट्राच्या हृदयस्थानावर बसलेल्या एलापूरच्या पाषाणांना विचारतों; आणि ते उत्तर देतात, " साम्यच काय पण हे तिन्ही पंथ एकाच परंपरेच्या तीन पिढ्या आहेत. याविषयीं जर शंका वाटत असेल तर या, येथें आम्हीं आपलें हृदय उघडून ठेवलें आहे त्याचें दर्शन घेऊन जा ! "

एलापूर, एल्लूर अथवा वेरूळ – ज्याला इंग्रजींत एलोरा म्हणूं लागले आहेत – हें आज एक लहानसें गांव आहे. जुन्या काळीं येथें चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे राजवंश राज्य करीत होते. एकमेकांशीं लढणारे व परस्परांवर विजय मिळवून त्याचा डांगोरा पिटण्यासाठीं मोठमोठे विजयस्तंभ उभारणारे राजे दुनियेंत सर्वत्र आढळतात; परंतु या ठिकाणीं मात्र आपली धर्मश्रद्धा सेवेच्या व भक्तीच्या रूपानें व्यक्त करण्यांत महाराष्ट्रांतील प्राचीन राजांमध्यें चढाओढ लागली असावी असें वाटतें. जगाची जिज्ञासावृत्ति तृप्त करावयाची आणि भारतीय संस्कृतीची थोडी दिशा दाखवावयाची एवढेंच केवळ या लेण्यांचें आज काम उरलें आहे ! तथापि एके काळीं हीं लेणीं एका मोठ्या विद्यापीठास आश्रय देत असत. देशोदेशींचे श्रमण, जंगम व साधु येऊन या लेण्यांतून रहात; आसपासच्या गांवांतील लोक जें कांहीं अन्नवस्त्र पुरवतील त्यावर संतुष्ट असत; धर्माची चर्चा व चिंतन करीत आणि हिंदुस्थानांतील जनतेला कल्याणाचा मार्ग दाखवीत असत. एखाद्या सरोवरांतून पुष्कळसे कालवे काढून लोक आसपासची जमीन जशी सुपीक बनवितात त्याचप्रमाणें या लेण्यांतून रहाणारी साधुमंडळी धर्मांत नवेनवे शोध लावून त्या धर्मामृताच्या पाणपोया गांवोगांवीं

घालीत, अथवा त्याची कावड भरभरून लोकांच्या घरोघरीं पोहोंचवीत. आणि त्याकाळचे राजे जसें आपलें वैभव या साधुवृंदांच्या चरणीं अर्पण करीत त्याचप्रमाणें देशांतील मूर्तिकार व चित्रकार या लेण्यांना सजविण्यांत आपल्या कलेची सार्थकता मानीत.

सारांश, लेण्यांची ही मालिका आमच्या पूर्वजांच्या राजकीय व प्रजाकीय आकांक्षांची प्रतिनिधि आहे. एका काळच्या एका बादशहानें आपल्या दिवंगत प्रेमाला कलेचें रूप देण्यासाठीं बनविलेला हा कांहीं 'ताज' नव्हे; तर हिंदुस्थानांतील महाजातींच्या हृदयींचे भाव या लेण्यांमधून अमर करून ठेवले गेले आहेत. आणि म्हणूनच ज्या भक्तिभावानें आपण वेद, उपनिषदें, रामायण व महाभारत वाचतों त्याच भक्तिभावानें या लेण्यांचें दर्शन आपण घेतलें पाहिजे.

येथें आपल्याला लांकूड, माती, मेण किंवा धातु यांचें कोरीव काम दिसणार नाहीं. अथवा संगमरवरासारख्या गुळगुळीत दगडांची कलाकुसरहि येथें आढळायची नाहीं. येथें महात्म्यांच्या चारित्र्याप्रमाणें कठीण असणाऱ्या दगडांवर त्यांच्याच कारुण्याप्रमाणें कोमल असणारीं फुलें, वेलबुट्टी आणि मूर्ति खोदलेल्या दिसतील. 'वज्रादपि कठोर' पाषाण निवडून त्यावर 'कुसुमादपि मृदु' अशा मूर्ति उठविण्याची हिंमत करणाऱ्या कारागिरांची पूजा करून त्यांच्याकडून कलेची दीक्षा घ्यायला स्वर्गातून साक्षात् ब्रह्मदेव आले असले तरी कांहीं आश्चर्य नाहीं. या कृति पाहून देशोदेशींचे कलाप्रेमी आश्चर्यचकित झाले तर त्यांत नवल कसलें ? या लेण्यांविषयीं एका ताम्रपटावर लिहिलें आहे कीं, 'देव जेव्हां आपापल्या विमानांत बसून स्वच्छंद विहार करीत असतांना या ठिकाणीं आले, तेव्हां या स्थापत्याचें सौंदर्य पाहून ते ध्यानमग्न झाले.' विशेषतः कैलास-मंदिराची शोभा पाहून ते उद्गारले, 'हें मंदिर मनुष्यनिर्मित असणें शक्यच नाहीं. महादेवाप्रमाणेंच हें स्वयंभू असलें पाहिजे!' ब्रह्मा आणि विश्वकर्मा यांच्या तोलाचा जो स्थपति या लेण्यांचा कर्ता होता तो देखील स्वतः म्हणूं लागला, 'ही कृति अत्यंत अद्‌भुत आहे! मीं ही कशी निर्मिली हें माझें मलाच माहीत नाहीं. अशीच दुसरी एखादी कलाकृति तयार करण्यास जर पुनः कोणीं मला सांगितलें तर तसें करण्याची माझी हिंमत व्हावयाची नाहीं ? हें जें कांहीं निर्माण झालें तें झालें !'

तेव्हां अशा या कृतीला जर आपण अपौरुषेय म्हटलें तर काय हरकत आहे ? ती बनविणाऱ्या स्थपतीलाहि जर ती वस्तु कशी बनली हें माहीत नाहीं तर ती मानवकृति आहे असें आपण म्हणूं कसें शकतों ?

कालिदासानें जेव्हां रघुवंश रचला तेव्हां सरस्वतीनें त्याला वरदान दिलें होतेंच पण जेव्हां त्यानें चौथा किंवा पांचवा सर्ग सुरू केला तेव्हां तर सरस्वतीनें त्याच्या हातून लेखणी हिसकावून घेतली आणि स्वतःच तो सर्ग लिहून टाकला ! तात्पर्य, या सर्गांत सुंदर शब्दांची इतकी कलाकुसर आणि भावनांचा इतका अद्‌भुत विलास आहे. येथेंहि साक्षात् स्थापत्यकलेनें जातीनें या स्थपतीच्या हृदयांत, हातांवर, डोळ्यांत आणि बोटांवर आपलें आसन ठोकलें असेल आणि मग समाधिस्थितींतच स्थपतीनें हें सर्व खोदकाम करून टाकलें असेल !

कोणा एका मूर्तिकाराचें सलग असें हें काम नव्हे. शेंकडों मूर्तिकार येथें एकत्र आले असतील; परंतु काम सुरू करण्यापूर्वींच त्यांचा जो पुढारी स्थापत्याचार्य असेल त्यानें आपल्या प्रत्येक सहायकाच्या छातीला स्पर्श करून असा संकल्प केला असेल कीं,

**ॐ मम व्रते हृदयं ते ददामि ।**
**मम चित्तमनुचित्तं तेऽस्तु ॥**

आणि मग सर्व डोकीं, सगळीं हृदयें आणि सारीं बोटें जणुं तीं एकाच माणसाचीं असावींत अशा प्रकारें काम करूं लागलीं असतील.

: २ :

आम्ही नागपूर कॉंग्रेसला गेलों होतों तेव्हांच वेरूळचीं लेणीं पहाण्यास पहिल्याप्रथम गेलों. कोणत्या रस्त्यानें जायला हवें याचीहि आम्हांला माहिती नव्हती. बहुतकरून पाचोऱ्यास उतरून आम्ही अजिंठ्यास गेलों असूं. दौलताबादच्या स्टेशनावर उतरून तेथील किल्ला पाहिल्यानंतर एक भाड्याची गाडी करून आम्ही वेरुळास गेलों होतों. श्री. नरहरिभाई परीख यांच्याव्यतिरिक्त आमच्याबरोबर आणखी कोणकोण होते हें मला आतां नीट आठवत नाहीं. वाटेंत खुलदाबाद लागलें असावें असें अंधुक स्मरतें. त्या वेळीं आरंभापासून अखेरपर्यंत मी गाडींतच बसून राहिलों नव्हतों. अधिकांश रस्ता मीं पायींच

आक्रमिला होता. दुपारचें ऊन इतकें कडक होतें कीं, इकडून तिकडून मोठमोठीं हिरवींगार पानें आणून मी तीं आपल्या डोक्यावर ठेवी आणि त्यावर गांधी टोपी घाली. पानें सुकून गरम होत तेव्हां मी तीं बदली. त्या वेळीं मला जो आनंद झाला होता तो कांहीं औरच होता. त्या वेळीं म्हणजे एकोणतीस वर्षांपूर्वीं माझी दृष्टि तरुण होती; माझी देहयष्टि तरुण होती आणि मी भारतीय संस्कृतीचे स्वरूप जाणून घेण्यासाठीं अधीर झालों होतों. कैलासाचें मंदिर, जैन लोकांची इंद्रसभा, महारवाडा – धेडवाडा या नांवानें ओळखलीं जाणारीं बौद्ध-लेणीं वगैरे सर्व कांहीं मीं नव्या डोळ्यांनीं पाहिलें होतें. त्याचें स्मरण अद्यापिहि आहे.

एखादी गोष्ट दुसऱ्यांदां पाहिली कीं, तिच्या पहिल्या वेळच्या आठवणी आपोआप बुजतात व नवीन चित्र जुन्या चित्राची जागा घेतें असा सर्व-साधारण समज आहे व तो निःसंशय खराहि आहे. परंतु वेरूळच्या लेण्यांच्या बाबतींत मात्र मला असा अनुभव आला नाहीं. जुनीं चित्रेंहि मजजवळ आहेत अन् नवीनहि! या दोन्ही चित्रांचा एकमेकांवर प्रभाव पडलेला आहे ही गोष्ट मी नाकारीत नाहीं. पण जुन्या चित्रांचें वैशिष्ट्य अजून नाहींसें झालेलें नाहीं.

पहिल्या खेपेप्रमाणें या खेपेसहि आम्ही सर्वांत आधीं कैलासचेंच लेणें पाहिलें. ही गुंफा म्हणजे येथील चौतीस लेण्यांची राणी! ज्याच्याजवळ पुरेसा वेळ नसेल त्यानें तर प्रथम हेंच लेणें पाहिलें पाहिजे. परंतु जर कोणी असें म्हणेल कीं, कैलास लेणें पाहिल्यानें वेरूळच्या सर्व लेण्यांची कल्पना येईल तर तें मात्र चूक होईल. सोळा नंबरचें हें कैलास लेणें, एकूणतीस नंबरची 'सीतान्हाणी', तेहतीस किंवा चौतीस नंबरची इंद्रसभा – निदान इतकीं लेणीं तरी पहायलाच हवींत आणि बौद्ध लेण्यांत जे विहार व चैत्य आहेत त्यांपैकीं निदान एक एक नमुना तरी बघितलाच पाहिजे. विशेषतः दहा नंबरच्या लेण्यांत जें लाकडाचें अनुकरण केलें गेलें आहे तें पाहिल्यावांचून कार्लें व अजिंठा यांच्याशीं याचें किती साम्य आहे याची पूर्ण कल्पना येणें शक्यच नाही. चौदावें लेणें म्हणजे श्रीगजाननाच्या मातांचें संमेलनच आहे जणुं; हें लेणें न पाहून भागणार नाहीं. पंधराव्या लेण्याच्या बाबतींत हें लेणें आहे कीं नंतरची बनावट आहे याविषयीं हटकून संदेह निर्माण होतो. पुरेसा

वेळ असेल तर यांपैकीं एकहि लेणें सोडतां येण्यासारखें नाहीं. ज्याला पुरेशी फुरसत असेल त्यानें निदान दोन-तीन वेळां तरी हीं लेणीं पहाण्यास गेलेंच पाहिजे. आम्ही या खेपेस सप्टेंबर महिना निवडला होता. हें अनेक दृष्टींनीं योग्यच झालें. कारण पावसाळ्याचा उत्तरार्ध असल्यामुळें सगळीकडे हिरवेंगार होतें आणि आकाशांतील ढगहि अगदींच विरक्त झालेले नव्हते.

या लेण्यांविषयीं मी लिहूं तरी कसें हेंच मला समजत नाहीं. एक एक लेणें घेऊन त्यावर एक एक स्वतंत्र लेख लिहिला तरी संतोष होणार नाहीं. कारण प्रत्येक लेण्यांत कित्येक लहानमोठ्या मूर्ति असतील, अनेक प्रसंग कोरलेले असतील, अनेक पशु त्यांच्या स्वाभाविक स्थितींत चित्रित केले गेले असतील. ज्याप्रमाणें आम्ही प्रत्येक गोष्ट एकाग्र होऊन पहात होतों त्याचप्रमाणें प्रत्येक मूर्ति किंवा प्रसंग याविषयीं स्वतंत्र लेख लिहिले पाहिजेत; तेव्हां कुठें संतोष होणार आणि जर तसें होऊं शकणारं नसेल तर एकेका लेण्यावर एकेक लेख लिहिण्यांत तरी काय अर्थ आहे ?

कैलास लेण्यांत अनेक ठिकाणीं रावण. आपल्या वीस हातांवर कैलास उचलीत आहे आणि वर शिव-पार्वती व नंदी विराजमान आहेत असे प्रसंग कोरलेले आहेत. हें सगळें मंदिर, त्याच्या आजूबाजूच्या ओसऱ्या आणि त्याच्या आंत एका बाजूस कोरलेलें दुसरें मंदिर, हें सर्व पाहून शिल्पकाराच्या कल्पनाशक्तीच्या साहसानें मन दंग होऊन जातें. मंदिराच्या दोहों बाजूंस दोन हत्ती आणि दोन विजयस्तंभ आहेत. हत्तींची अगदीं दुर्दशा होऊन गेली आहे. आजहि जर एखादा मूर्तींचा 'सर्जन' खटपट करील तर या हत्तींचे तुकडे एकत्र करून एक कामचलाऊ हत्तीसारखा हत्ती अवश्य बनवूं शकेल. असें सांगतात कीं, औरंगजेबानें या लेण्यांचाहि बराच नाश केला आहे. त्यानें घृष्णेश्वराचें मंदिर पाडविलें हें कोणीहि समजूं शकेल. जर त्यानें मनांत आणलें असतें तर त्या मंदिरांत एकहि मूर्ति राहूं शकली नसती. परंतु मूर्तिविनाशक लोक मूर्तींचा चुरा करून टाकीत नाहींत, त्यांना भग्न करून टाकतात. कुणाचें नाक कापलें, कुणाचा कान उडवून दिला, कुणाचे हात किंवा पाय नाहींसे केले ! असें करून मूर्तिगणिक कांहीं तरी वैगुण्य उत्पन्न केलें कीं झालें. कारण मग त्यांची पूजा कुणी करणार नाहींच !

एक कट्टर मुसलमान चित्रांचा शोकीन होता. त्यानें आपला धर्म आणि चित्रें दोन्ही सांभाळण्याचा एक मध्यम मार्ग शोधून काढला. त्यानें चित्रांचें एक अल्बम विकत आणलें आणि काळ्या शाईंत बोटें बुडवून सर्व चित्रांच्या चेहऱ्यावर एक एक डाग पाडला. असें केल्यानें त्याच्या मनांत असा विश्वास उत्पन्न झाला कीं, सजीव वस्तूच्या प्रतिकृति बनविण्यानें ईश्वराचा जो अपमान होतो त्याचें परिमार्जन झालें. आतां हीं चित्रें पहाण्यास कांहीच हरकत नाहीं. अशा प्रकारच्या सोयी नसत्या तर जितक्या कलाकृति उरल्या आहेत तितक्याहि उरूं शकल्या नसत्या.

हें मंदिर जेव्हां कोरलें गेलें त्या वेळीं मूळ कल्पना त्यावर गिलावा करून त्या गिलाव्यावर चित्रें काढण्याची होती कीं नाहीं हें आज आपल्याला कसें समजणार ? मला असें वाटतें कीं, कोरतांना दगडांतच सारें सौंदर्य आणण्यांत कांहीं कसर ठेवली गेली नाहीं. तरीहि त्यावर पातळ गिलावा करून अत्यंत सुंदर रंगांचीं चित्रें काढण्याचा संकल्प प्रारंभापासून असावा. अजिंठ्याच्या भिंतीवरील चित्रकारी अद्यापिहि थोडीबहुत टिकून राहिली आहे. या मंदिरावरहि कोठें कोठें किंचित् रंगांचा आभास दृष्टीस पडतो. मंदिराच्या गच्चीवर एके ठिकाणीं छतामध्यें थेट अजिंठ्याच्या कारागिरीच्या अवशेषासारखा थोडासा भाग उरलेला आहे. यांतील एका ठिकाणचा एक मोर उडून गेला आहे. पण तसबिरीची कला नष्ट झालेली नाहीं. एके ठिकाणीं एका रमणीचें डोकें आणि कमलाच्या पाकळ्यासारखे तिचे डोळे एवढेंच काय तें शिल्लक राहिलें आहे. या चित्राचा रंग, नाजूकपणा आणि ढब हीं अजिंठ्यापेक्षां किंचिदपि कमी नाहींत.

सर्व मंदिराचें ओझें उचलून धरणारे लहान लहान हत्ती विहार करीत असलेले दाखविले आहेत. कोणी आपल्या सोंडेनें दुसऱ्याचा पाय पकडीत आहेत. दुसरे दोन हत्ती आपआपल्या सोंडी एकमेकांच्या सोंडींना लावीत आहेत. कांहीं हत्ती सोंडेनें गंडस्थळावरील माशा उडवीत आहेत आणि कांहीं मोठें धारिष्ट करून वाघाच्या मागें लागले आहेत. मंदिराच्या आसपास एक सुंदर आंगण आहे आणि त्यानंतर तिन्हि बाजूंस खालीं ओसऱ्या आहेत त्यांत विशाल मूर्ति कोरलेल्या आहेत. या मूर्ति शक्ति व भावना व्यक्त करण्याच्या बाबतींत भारतीय मूर्तिकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. एकेक मूर्ति पहातांच

हृदय कसें दडपलें जातें! आणि अशा बलवती मूर्तींची कल्पना करणारे आमचे पूर्वज कसे संकल्पवीर असतील, कसे समर्थ कल्पनावीर असतील याचें अनुमान होऊन आपल्या क्षुद्रतेबद्दल तिरस्कार वाटूं लागतो.

कैलास लेणें पाहून आम्ही सरळ जैनांची इंद्रसभा पाहण्यास गेलों. येथील अंगणांत एका बाजूस एकच हत्ती आहे आणि बाजूनें जो एकच विजय-स्तंभ होता त्याचे तीन तुकडे होऊन तो जमिनीवर पडला आहे. हें लेणें म्हणजे कैलासाचीच एक छोटीशी आवृत्ति आहे. यांत याचें स्वतःचें असें पुष्कळ वैशिष्ट्य आहे. तथापि कैलास पाहिल्यानंतर याचें महत्त्व आपोआप कमी होतें. नव्या प्रेक्षकांना आमची अशी शिफारस आहे कीं, त्यांनीं प्रथम डावीकडे वळून शेवटची इंद्रसभा पहावी आणि मग कैलासाकडे यावें.

महावीराच्या या लेण्यास इंद्रसभा कां म्हणतात हें कोणालाहि माहीत नाहीं. पण इतक्या आकर्षक लेण्यास एखादें नांव तर हवेंच ना? 'इंद्रसभा' हें नांव चालत आलें आहे, तेंच राहिलें तर हरकत काय?

यानंतर पहात पहात आपण परत आलों कीं एकोणीस नंबरचें लेणें आपलें ध्यान आकर्षित करून घेतें. भव्यतेच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि लेण्याहून हें लेणें कमी नाहीं. हें लेणें पहातांच मुंबईजवळील घारापुरी ऊर्फ 'एलिफंटा केव्हज्'ची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. सिंहाच्या मूर्ति असाधारण उंच आणि मोठ्या आहेत, पण एकहि मूर्ति प्रमाणबाह्य नाहीं. याच्याच एका बाजूनें वेळगंगेचा धबधबा अथवा 'सीतान्हाणी'कडे जाण्याचा रस्ता आहे.

आरंभीं साधूंना रहाण्यासाठीं म्हणून हें लेणें कोरलें गेलें असेल, परंतु तें इतकें भव्य, सुंदर आणि उदात्त झालें कीं त्यांत जास्त दिवस रहाण्याची कुणाची हिंमतच होईना, असें तर झालें नसेल ना? अशा या लेण्यांत राहूनहि अस्वस्थ न होण्याइतका स्वतःला मोठा कोण बरें मानून घेईल?

शेवटचीं जैन लेणीं, मधलीं शैव लेणीं आणि उजव्या बाजूस शेवटीं बनलेलीं बौद्ध लेणीं वगैरे सर्व मिळून इतका विस्तार आहे कीं मनुष्य थकून जातो. आणि प्रत्येक लेणें आंत इतकें खोल आहे कीं, बाहेरून बरोबर कल्पनाहि येत नाहीं. शहरांत जागेची कमतरता असते, म्हणून उंच उंच घरें बनविलीं जातात. येथें तीन तीन मजली लेणीं बनविण्याचें कारण एवढेंच कीं, येथील

दगड विशाल आहेत. आडवे-तिडवे, उंच-सखल, वाटेल तितकें दूरवर खोदण्याची शक्यता आहे.

या लेण्यांचे चौकोनी खांबहि शोभेच्या बाबतींत येथील प्रचंड मूर्तींहून यत्किंचितदेखील कमी नाहींत. अगदीं थकून गेल्यामुळें मी एका लेण्याच्या आंत न जाण्याचा विचार करीत होतों. पण मनांत विचार आला, 'एवढेंसेंच सोडलें असें व्हायला नको. थोडा त्रास होईल खरा, पण आंत जाऊन आलें पाहिजे.' आंत जाऊन पाहिलें तों काय! दोन अगडबंब खांबांच्या मध्यावर त्यांना एक दुसऱ्याशीं जोडणाऱ्या गणितांतील 'धनुष्य-कंसा'च्या आकाराच्या कमानी होत्या. या कमानींची जाडी पाहून मी तर थक्क होऊन गेलों. ही मनुष्याची कला असणें शक्यच नाहीं. किंवा ही दैवी आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. हिचा आकार किंवा प्रमाण हें आसुरी किंवा राक्षसीच म्हटलें पाहिजे.

सगळीं लेणीं घाईघाईत पाहून घेतलीं. ज्याप्रमाणें माकडें भराभर खाऊन आपल्या गालांतील थैल्या भरून घेतात आणि मग फावल्या वेळीं, आरामांत त्यावर ताव मारतात, अथवा ज्याप्रमाणें जनावरें आधीं भराभर खाऊन घेतात आणि मग रवंथ करतात त्याचप्रमाणें मीं वेळेचें अवधान बाळगून घाईघाईनें सारें पाहून घेतलें आणि आतां कित्येक वर्षेंपर्यंत त्या संस्कारांचें स्मरण कर-करून रवंथ करीत राहीन. ही लेखमाला म्हणजे सुद्धां या 'रोमन्थक्रिये'चाच एक प्रकार आहे असें समजा. यांतहि खरी मजा नाहीं. कारण ही तर रवंथाची सुरुवात आहे.

ज्यांनीं या धर्मालयाचें दर्शन घेतलें ते माझे हे डोळे धन्य होत! ज्यांना असें हें दिव्य पोषण दोन वेळां मिळालें ते हे माझे नेत्र धन्य आहेत! आणि ज्यांनीं मला प्रेमानें निमंत्रण देऊन एवढी मोठी मेजवानी दिली ते माझे स्नेहीहि धन्य होत! आणि जर माझ्या वाचकांना हीं स्थानें पहाण्याची उत्कंठा झाली तर तेहि धन्य होत! कारण भारतवासी असूनहि हीं स्थानें न पहाण्यासारखी जीवनाची विफलता दुसरी कोणती असणार?

या स्थानांहूनहि ज्या महात्म्यांची जीवन-विभूति अधिक भव्य आहे ते असलीं स्थानें पहाण्यास न जाईनात का! आपण तर या पाषाणांचें हृदयदर्शन करून कृतार्थ झालों आहोंत.

# अजिंठा

५

सतरा वर्षांपूर्वीं नागपूर कॉंग्रेस संपल्यावर आम्हीं अजिंठ्याचीं लेणीं पाहायला गेलों होतों. त्या वेळीं मनांत आलेला एक विचार मीं जुगतरामभाईपाशीं बोलून दाखविला होता. एखादा विचार लिहून काढला किंवा कोणास सांगून टाकला की तो माझ्या डोक्यांतून निघून जातो. ह्या विचाराच्या बाबतींतहि तसेंच झालें होतें. परंतु अजिंठ्याला जातांच पुनः नेमका तोच विचार त्याच ठिकाणीं चिंचेवरच्या भुतासारखा 'हाऊ' म्हणून समोर येऊन उभा ठाकला.

बौद्ध साधूंना हीच जागा कशी सुचली, हीच कशी रुचली ?

अजिंठ्याचा रस्ता म्हणजे जणुं ध्यानाचा विशुद्धिमार्गच. निरनिराळीं वळणें घेऊन, आंत खोल खोल जाऊन अखेर त्याचें रहस्य काय तें शोधायचें. गाई राखणाऱ्या गुराख्यांना, मेंढ्या पाळणाऱ्या धनगरांना त्याचप्रमाणें इंद्रियांचें दमन करणाऱ्या वानप्रस्थांना आणि अखंड भटकणाऱ्या परिव्राजकांना देखील ह्या दरींतून येणारा जीवनप्रवाह, हा चैतन्यप्रवाह येतो तरी कोठून हें समजून घेण्याची उत्कंठा व्हावयाचीच ! या 'वाघोरी' नदीचा उगम कोठें आहे, तेथलें वातावरण कसें असेल हा प्रश्न ज्या उत्कटतेनें गोवाऱ्यांना पडला असेल त्याच उत्कटतेनें हे भिन्न भिन्न संकल्प विकल्प हृदयांत कसे उठतात, कोठून उसळ्या मारतात, अगदीं सुकून गेलेले असले तरी आशेची थोडीशी वृष्टि मिळतांच त्यांना पूर कसा येतो हें शोधल्यावांचून गत्यंतर नाहीं असें कित्येक साधनवीरांना वाटलें असेल. ते एकान्त शोधीत निघाले, त्यांनीं घर सोडलें, दार सोडलें, मायाममता सगळें कांहीं सोडलें. त्यांची धनदौलत, जातपात, सामाजिक प्रतिष्ठा आणि गौरव हीं तर गेलींच होतीं; पण त्यांनीं आपले प्रिय विषय, आपला विनोद आणि आपली रसिकता सुद्धां मन कठीण करून त्यागली होती. साहित्य, संगीत आणि कला हीं आतां त्यांना आंबट, तुरट आणि

खारट लागूं लागलीं होतीं. तोंडांत माती किंवा राख पडली असतां आपण थू थू करून ती थुंकून टाकतों तशी पंचेंद्रियांच्या विषयांसंबंधीं त्यांना विरक्ति वाटूं लागली होती. त्यांनीं साधनवीर व्हावयाचा निर्धार केला होता. 'अरतिर्जन-संसदि' असें जपत जपत ते शहरी 'समाज' सोडून खेड्यांत गेले. तेथेंहि कंटाळले म्हणून जंगलांत गेले. स्वयं निम्नगा नदी त्यांना उत्तेजन देतच होती — 'अजून पुढें चला, अजून आंत चला, आंत आंत प्रवेश करा, मुक्कामावर पोहोंचल्याशिवाय थांबू नका.' आणि आपले हे नदीशिष्य संपूर्ण जीवनाच्या उत्साहानें गिरि-गव्हरांत प्रवेश करूं लागले. अखेर दोहोंकडच्या टेकड्या एकदम समोर येऊन भिंतीप्रमाणें उभ्या ठाकल्या. बिचाऱ्या नदीला अडचण पडूं नये असा विचार करून त्यांनीं थोडीशी मोकळी जागा आपणांमध्यें ठेवली. आपली ही भयंकर उंची पहाणाऱ्या मनुष्याला उभें रहाण्यापुरती देखील जागा जर उरूं दिली नाहीं तर अशी गर्दी करण्यापासून फायदा तो काय!

परंतु अरुंद गल्ली सरळ असूनहि चालणार नाहीं. दृष्टीला एकीकडून बराच वेळ विश्रांति मिळाली तरी मन म्हणणारच 'इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः।' मनाला इतका आराम तरी कां द्यावा! म्हणून ह्या कपारींनींहि सापासारखा नागमोडी रस्ता धारण करून ह्या गूढ जागेला अधिकच निगूढ बनविलें आहे. आणि जेथें ही खडकाळ दरी संपते तेथें त्यांची ही पार्वती कन्या महादेवाचें पाणिग्रहण करण्यासाठीं सप्तपदीचा विधि करीत असावी त्याप्रमाणें उंचावरून सात उड्यांत सात कुंडें भरत खालीं उतरते.

येथपर्यंत तर येऊन पोहोंचलों, पण आतां पुढें काय?

मागले पुढले कडे साद घालीत विचारते झाले, 'पुढें काय!'

आतां एक तर ह्या कड्यांवरच डोकें फोडून घ्यायचें; नाहीं तर पुढें चालायचें. ह्या कड्यांनींच जर परम रहस्य लपवून ठेवलें असेल तर त्यांचाहि वध घेतला पाहिजे. ठरलें. साधक वीरांनीं खडक फोडायला सुरुवात केली. पुष्कळ जागा झाली. उबारा, शांतता आणि प्रकाश तिन्ही मिळालीं. रोज उगवणारा आणि बुद्धीला चालना देणारा चैतन्य सूर्य प्रभातींचे थोडे तरी 'रश्मिसमूह' टाकल्याशिवाय रहायचा नाहीं. खालचें प्रवाहित जीवन, समोर चढणारा प्रकाश, वर पसरलेलें अनंत आकाश आणि गुहेंतील अखंड शांतता! आणखी काय हवें! साधकांनीं ध्यान धरलें. सगळें कांहीं त्यजून ते येथें आले होते पण एका गोष्टीच्या

त्याग करायचा ते विसरले होते. चुकून म्हणा, आसक्तीमुळें म्हणा किंवा कारुण्य-प्रेरित होऊन म्हणा, येतांना त्यांनीं प्रमार्थी पण स्नेहार्द्र असें मन बरोबर आणलें होतें. आणि मन म्हणजे महान् जादूगार. त्याच्या स्मरणरूपी पोतडींत तसेंच विस्मरणरूपी भुयारांत किती तरी गोष्टी भरलेल्या असतात. गुहेंतील आकाश आणि अवकाश दिसतांच त्यानें विश्वामित्राप्रमाणें एक सुप्रसिद्ध सृष्टि पहातां पहातां निर्माण करण्यास सुरुवात केली. हां हां म्हणतां त्या गुहेंत निरनिराळ्या वर्णांचे राजपुत्र आले. त्यांना अस्वस्थ करून सोडणाऱ्या राजकन्या उतरल्या. हत्ती, घोडे, दासदासी सगळें कांहीं तयार झालें. आणि 'आम्हीं तर तुमच्याच जातीचे' असें म्हणत म्हणत अगदीं हक्कानें झाडांवरील वानरेंहि आलीं. नाना देशींचे वीर पुरुष आणि वकील नजराणे घेऊन आले. चारण आणि दूत शुभाशुभ समाचार घेऊन आगमन करते झाले!

आणि 'तुमच्या साधनेंत आमची मदतच होईल' असें आश्वासन देणाऱ्या भिन्नभिन्न जातककथाहि तयार झाल्या.

पूर्वपरिचित सृष्टि अशा अकल्पित वैविध्यानें कल्पना-देह धारण करून उभी ठाकल्यावर मग पूर्वाश्रमींची रसिकता आणि कलाकौशल्य थोडेंच विसावा घेणार?

लोण्यासारखा मऊ चिखल तयार झाला. भाताच्या कुसांनी तो मजबूत आणि गुळगुळीत बनविला गेला. समुद्रांतील शिंपले भरभरून रंग आणला गेला. खारीच्या झुबकेदार शेपट्यांचे लहानमोठे कुंचले तयार झाले. हळूहळू गुहेच्या छतावर कमळें फुलूं लागलीं. त्या कासारीं कलहंस विहार करूं लागले. मतंगज ताडांचीं पानें तोडून हत्तिणींना वारा घालते झाले.

आणि मग मूर्तिकारांचे हात स्वस्थ कसे बसतील? ते म्हणाले, 'आम्ही कोरून कोरून या दगडांचें अगदीं मेण करून टाकूं.' चेहऱ्यावर ज्या भावना व्यक्त झाल्या पाहिजेत, त्या ह्या निर्जीव दगडांना दाखवाव्याच लागतील. जड आणि चेतन हा भेदच चुकीचा आहे.

जिवंत माणसें अगदीं दगडाप्रमाणें अचल राहून ध्यान करण्यासाठीं म्हणून येथें आलीं आणि त्यांनीं शेवटीं या अचलेश्वराच्या पोटांत शिरून जड दगडांतून अगदीं जितीजागतीं माणसें निर्माण केलीं — विधात्यानें निर्माण केलेल्या माणसां-पेक्षा भव्य आणि म्हणूनच दिव्य!

प्रति ब्रह्मदेवासारखे हे कलाधर कालाच्या पोटांत गडप झाले. परंतु त्यांच्या त्या कलाकृति मात्र कालाशीं झगडत एखादा हात, एखादा कान, एखादा पाय यांचें बलिदान देऊन अजूनहि येथें विराजमान आहेत. काय ही विधीची लीला !

या गुहांतून प्रसृत झालेला हा कलाविलास येथल्या निर्वाणकामी साधूंच्या साधनेंत साधक ठरला असेल कीं बाधक ? कोणी प्रणयी राजा आपल्या प्रमद्वरा राणीला मदिरेचा प्याला घेण्याचा आग्रह करीत आहे आणि ती मानेनें नको म्हणत पण हातानें जवळ करीत आहे असें दृश्य कोणत्या समाधि-मार्गाला अनुकूल ठरलें असावें ? कोणी राजकन्या मरणाच्या पंथाला लागली आहे आणि तिची दासी खिन्न मनानें तिची अखेरची शुश्रूषा करीत आहे, अशीं करुण वातावरणांतलीं चित्रें पाहून साधकांना वैराग्य सिद्ध होईल काय ? किंवा ते मृत्युंजय बनतील काय ?

एखाद्या दुःसाध्य रोगावर औषध मिळेनासें झालें म्हणजे आजकालचे धन्वंतरी आणि जीवक त्याच रोगाची लस काढून ती तेजाबांत घालून मारून टाकतात; आणि मग ती मेलेली लस – रोगजंतूचे मुडदे – शरिरांत घालून तोच रोग सौम्य स्वरूपांत रोग्याच्या शरिरांत निर्माण करतात. लस निर्विष केलेली असल्यामुळें त्यापासून प्राणघातक रोग उत्पन्न होऊं शकत नाहींत. शरिरांत अशा प्रकारें अगदीं सौम्य रीतीनें रोग उत्पन्न केला म्हणजे शरिरांतील नैसर्गिक शक्ति त्याचा प्रतिकार करायला सुरुवात करते. आणि तें विषम युद्ध शरिरांतल्या प्राणशक्तीच्या आटोक्यांतलें असल्यामुळें ती हळूहळू रोगावर विजय मिळविते. दुसऱ्या रीतीनें म्हणावयाचें झालें तर रोगाचा होणारा परिणाम सहन करण्या-इतकें शरीर खडतर बनतें आणि अखेर ही क्षमता इतकी वाढते कीं, रोगाचे जिवंत जंतु जरी शरिरावर हल्ला करायला आले तरी त्यांचा कांहींच प्रभाव पडत नाहीं.

विषयवासना मारून टाकावयाची असेल तर पहिल्यानें विकारी परिस्थिती-पासून स्वतःच दूर राहिलें पाहिजे. पण येवढ्यानें भागत नाहीं. पुष्कळ वेळां प्रत्यक्ष सहवासापेक्षां विरहावस्थेंत होणारें ध्यान अधिक आकर्षक, अधिक काव्यमय आणि तितकेंच अधिक बाधक व भयावह असतें. आतां तें टाळण्यासाठीं विषयांचा प्रत्यक्ष सहवास करणें म्हणजे साधकानें आध्यात्मिक आत्महत्याच करणें होय.

अशा स्थितींत आपण ज्या जगाचा त्याग करून आलों त्याचें केवळ प्रतिबिंब आपल्या आसपास पसरवून दिलें तर प्रापंचिक वातावरणाचें प्रत्यक्ष

दर्शन टळेल आणिं विरहामुळें होणारें विकृत ध्यानहि थांबेल. चित्रस्थ दुनिया खऱ्या दुनियेचा परिचय टिकवूं शकत असली तरी ती नेहमींकरितां बांधून ठेऊं शकत नाहीं. रोज हें सगळें पहात राह्यचें आणि हें सगळें नश्वर आहे, दुःखपूर्ण आहे, ह्याचा उपशमच केवळ मंगलमय आहे अशी मनाची दृढ समजूत करीत राह्यचें अशी एखादी साधना तर ह्या भिक्षूंनीं योजिली नसेल ना ? ही साधना परिणामीं लाभदायक ठरली किंवा नाहीं ह्याचा अनुभव जर ते आपल्यामागें ठेवून गेले असते तर किती चांगलें झालें असतें ?

ह्या गुहा एकाच व्यक्तीनें, एकाच टोळीनें किंवा एकाच संघानें एकदम तयार केल्या असें नाहीं. इसवी सनापूर्वी दोनशें वर्षांच्या सुमारास येथल्या कांहीं गुहा खोदण्यांत आल्या. त्यापूर्वी येथें साधूंच्या किती पिढ्या होऊन गेल्या तें समजण्यास आतां मार्ग नाहीं. ह्या गुहा आतां वापर न होतां पडलेल्या आहेत, तशाच त्या प्राचीन काळांतहि ओस पडल्या असल्या तर त्यांत कांहीं नवल नाहीं. कांहीं काळानंतर पुनः दुसरी पिढी आली. त्या पिढीनें दुसऱ्या पांच-सात गुहा तयार केल्या. त्यांनाहि उतरती कळा लागली. असा हा भरती-ओहोटीचा क्रम जवळ जवळ हजार वर्षें चालला. विंध्याद्रीच्या कडेवर विराजमान झालेल्या ह्या गुहा आज खेटून बसलेच्या बहिणींसारख्या वाटतात. पण कालानुक्रमें पहातां मधल्या गुहा बाजूच्या गुहांच्या खरोखर आजीबाई आहेत.

आणि ह्या गुहांतलीं चित्रें चित्रकारांच्या कोणत्या पिढीचीं प्रतिबिंबें आहेत तें तरी कुणाला सांगतां येणार ?

चित्रकलेचे जे कांहीं नमुने आज शिल्लक आहेत, त्यांवरून पहातां ह्या सगळ्यांचा कुंचला एकच आहे. शैलींत थोडा थोडा फरक वाटतो, पण त्यांतहि तीन-चारांपेक्षां अधिक प्रकार नाहींत. ह्या गुहांची सुरुवात कधीं झाली तें तेथल्या शिलालेखांवरून कळतें. परंतु गुहांतल्या चित्रणांची सुरुवात कधीं झाली त्याचा कसलाच पत्ता लागत नाहीं. परंतु जी चित्रशैली अजिंठ्यांत आहे तीच ग्वाल्हेर संस्थानांतल्या 'वाघ' गुहेंत आहे. तीच शैली लंकाद्वीपांत सिगीरी ( श्रीगिरी ) येथेंहि प्रकट झाली आहे. आणि तिचीच एक वसाहत मध्य-आशियांतील तिबेटी मंदिरांत जाऊन वसली आहे. दुनियेंत कौशल्य नेहमीं दुर्लभच असायचें. एका ठिकाणीं साधना होण्याचाच उशीर कीं तिचे पडसाद जगाच्या अगदीं दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन पोहोंचावयाचे. तलावांत एखादा

दगड टाकून पहा. तेथें जी तरंगमाला निर्माण होते ती आपलीं वर्तुळें विस्तृत करीत करीत अगदीं तलावाच्या कांठापर्यंत जाऊन भिडते. बोधिवृक्षाखालीं बसून केलेला संकल्प आणि त्यांत सांपडलेला मार्ग जर अडीच हजार वर्षें आणि पंचवीस हजार मैल दूर जाऊन पोहोंचूं शकतो तर आजिंठ्याच्या लेण्यांत विकसित झालेली चित्रकला दक्षिणेकडील दीपद्वीप (लंका) व्यापून साऱ्या जंबुद्वीपांत पसरावी यांत आश्चर्य तें कोणतें ?

अजिंठ्याची चित्रकला स्थलकालाचा पट चिरून थेट येथपर्यंत टिकून राहिली. परंतु तेथल्या साधनेच्या चित्कलेचें काय झालें ? ती अधिक सूक्ष्म असल्यामुळें अधिक स्थायी, जवळ जवळ अमर व्हायला हवी होती. कदाचित् ह्या गुहांत तसे साधनासंग्राम आणि तशीं 'मार' युद्धें झालींच नसावींत. येथें उपासक येऊन रहाण्याऐवजीं अनुकरण करणारे विस्तारप्रिय पुजारीच येऊन बसले असावेत. मला वाटतें, कदाचित् आजिंठा ही उपासकांची तपोभूमि नसावी, तशीच ती पुजाऱ्यांची उत्सवभूमीहि नसावी. सर्व विद्याकलासंपन्न, कुशल विद्वान् आणि अध्यापनधुरीण योगी येथें रहात असले पाहिजेत. आणि आजिंठा हें एक ऐहिक आणि पारलौकिक विद्येचें विद्यापीठ असलें पाहिजे. एरवीं अव्याहत चालणाऱ्या परंपरेशिवाय एक हजार वर्षें ह्या गुहा कशा बरें गाजत राहिल्या असत्या ?

पण हें सगळें अखेर गेलें कोठें ? हजार वर्षांची ही परंपरा नामशेष झाली एवढेंहि आज म्हणतां येत नाहीं. कारण त्या परंपरेचें नांव देखील आज कोठें ऐकायला मिळत नाहीं !

ज्यांनीं ही गुहा खोदली त्यांनीं आपला संकल्प येथें नोंदून ठेवला आहे : ज्ञानाच्या उपासनेसाठीं ह्या गुहा तयार करण्यांत आल्या. या लयन-दानाच्या पुण्यप्रतापानें दात्यांच्या मातापितरांपासून ते थेट विश्वाच्या अशेष सत्त्वांपर्यंत सर्वांचें कल्याण होवो, सर्वांना उच्च गति मिळो !'

किती उदात्त आहे हा संकल्प ! येथें जाति नाहीं, वर्ण नाहीं; पंथ नाहीं, देश नाहीं; स्त्रीपुरुष असा भेद नाहीं तर मग आपपरभाव तरी कोठून असणार !

ज्यांनीं हें धर्मकार्य सुरू केलें त्यांना कल्पना तरी असेल काय कीं हें सारें अनंत काळपर्यंत टिकणारें नाहीं ? येथली ती सगळी साधना गेली कुठें ! तिचा नाश कशामुळें झाला ? आंतून कीड लागल्याशिवाय बाहेरून नष्ट

होणें सोपें नसतें. विजयनगर साम्राज्य घ्या, किंवा आपलें मराठ्यांचें हिंदवी स्वराज्य घ्या, आंतून कुजल्याशिवाय कांहीं नष्ट झालेलें नाहीं. ह्या बौद्ध प्रयोगाचा अंत कसा झाला तें कोण सांगूं शकेल? सगळ्याच इतिहास-संशोधकांपुढें हा प्रश्न उभा आहे. कोणालाच त्याचें उत्तर सांपडलेलें नाहीं. ह्या अजिंठ्याच्या लेण्यासंबंधीं इतिहासहि अधिक सांगूं शकत नाहीं. परंतु ह्या गुहा मात्र प्राचीन काळच्या सामाजिक इतिहासावर भरपूर प्रकाश पाडूं शकतात. अगदीं कोंपऱ्यांत-अंधारांत हीं चित्रें पडून राहिलीं म्हणूनच त्यांच्यांत भूतकालावर प्रकाश टाकण्याची शक्ति आली.

'शाकुंतलां'तला विरही दुष्यंत आपल्या मनाचें समाधान करण्यासाठीं शकुंतलेचें लावण्य रेखांकित करीत असे. 'मेघदूतां'तील यक्षपत्नी आपल्या 'शापेनास्तंगमितमहिमा' भर्त्याचें भावगम्य चित्र आलेखीत असे. उषेला तिच्या चित्रलेखा सखीनें निरनिराळ्या राजपुत्रांचीं चित्रें काढून दाखविलीं. कारण उषेच्या स्वप्नांत दिसलेला राजपुत्र कोणता तें नक्की ठरवायचें होतें. 'अनिरुद्धा'चें चित्र पहातांच उषा लाजली. 'उत्तररामचरितां'त श्रीराम सीतादेवीला वनवासांतलीं रम्य चित्रें दाखवून तिची पूर्वस्मृति ताजी करतात आणि तीं चित्रें पाहून सीतेला आपण खरोखरच पुन्हां वनवासास गेलों आहोंत असें वाटूं लागते, असें वर्णन आहे. हे सर्व प्रसंग वाचतांना मला वाटे कीं, आपल्या पूर्वजांना नुसत्या कल्पनेनें इतकीं हुबेहूब चित्रें काढतांच येत नसावींत! कवींना अतिशयोक्ति सहज करतां येते. रामविजय, पांडवप्रताप वगैरे पोथ्यांतून छापलेलीं चित्रें आणि आपल्या देवळांतल्या भिंतीवरील देवदेवींचीं चित्रें पाहून माझा वरील अभिप्राय दृढ बनला होता. आपल्या मूर्ति आणि रजपूत शैलीचीं चित्रें पाहून देखील हा अभिप्राय बदलावासें वाटलें नव्हतें. परंतु अजिंठ्याचीं चित्रें पाहून मात्र खात्री पटली कीं, आमच्या देशांतील चित्रकारांना आपल्या चित्रांत फक्त प्राणच काय तो फुंकतां येत नव्हता. बाकी अगदीं हुबेहुब चेहरे, सूक्ष्म गति, सूक्ष्म भाव-प्रदर्शन, निरनिराळ्यालोकांचे हावभाव, राजमहालांची, बगीच्यांचीं आणि जंगलांचीं अगदीं खरींखुरीं दृश्यें ते सहज निर्माण करूं शकत असत. हत्ती, गाय, वासरें, पशुपक्षी उठावदार रीतीनें तयार करून ते अशी बहार करून सोडीत कीं, त्यांत तन्मय झालेल्या मनुष्यास सांगावें लागे कीं, 'अरे बाबा, तीं केवळ चित्रें आहेत. त्यांत पागल होण्यासारखें काय आहे?'

खानदेशच्या गॅझेटियरमध्यें गुहेगुहेंतल्या प्रत्येक चित्रांतील प्रसंगाचें आणि व्यक्तीचें इतकें सविस्तर वर्णन दिलेलें आहे कीं तें वाचीत असतां अजिंठ्याच्या भिंतीवरचें सारें महाभारत पुन्हां नजरेसमोर नाचूं लागतें. शाक्य मुनी, बोधिसत्त्व, शुद्धोधन राजा, माता माया, मावशी महाप्रजापति, गोपा यशोधरा आणि छोटा राहुल सगळे तेथें आहेत. पुलिकेषीच्या दरबारीं इराणी वकील आपल्या रिसाल्या-सहित आलेला आहे. छदंत हत्ती आपल्याच सोंडेनें आपले सहाहि दांत उपटून लोभी पारध्याला अर्पण करीत आहे आणि ते दांत पाहून पूर्वजन्मीं त्याची पत्नी असलेली राणी पश्चात्तापानें होरपळून निघाली आहे. एका ठिकाणीं क्रोधानें अंध झालेला राजा आपल्या पायाशीं वेलीप्रमाणें वांकलेल्या दासीला शिक्षा फर्मावीत आहे; तर दुसरीकडे इच्छाभोजन मिळाल्यामुळें भिकारी संतुष्ट झालेला आहे. हिंदुस्थानचा प्रजाकीय इतिहास जेव्हां कधीं तयार होईल तेव्हां त्या काळचें सामाजिक चित्र रेखाटण्यासाठीं या गुहांतील चित्रांचा उपयोग केला जाईल. अजिंठ्यांतले हे निरनिराळे प्रसंग पहात असतां आपण एक गोष्ट विसरून जातों कीं, चित्रकारानें हे शेंकडों प्रसंग कसे खुबीनें एकमेकांत मिसळून टाकले आहेत. एका चित्राची पार्श्वभूमि दुसऱ्या चित्राची पुरोभूमि म्हणून उपयोगांत आणली गेली आहे. डोळ्यांना कोठेंच असंगत असें वाटत नाहीं. ज्याप्रमाणें महाभारतकाराला युद्धाचीं वर्णनें आणि सात्त्विक संवाद, स्त्रियांचीं नांवें आणि तीर्थांचीं वर्णनें, मुत्सद्द्यांची मसलत आणि कमळें चोरणाऱ्या ऋषींचा विनोद ह्या सगळ्यांची संसृष्टि करतां येते त्याचप्रमाणें या गुहेंतील अंधकारांत तत्कालीन जीवनावर प्रकाश पाडणारे चित्रकार जीवनाचें साकल्यपूर्वक दर्शन करूं शकत होते. भारतरचना, भारतीयांची नगररचना आणि गिरिगव्हरां-तील ही बौद्धकालीन चित्ररचना हा सर्व एकाच संस्कृति-मानसाचा विलास आहे.

प्राचीन संस्कृतीचे असे अवशेष मिळाले आहेत; परंतु त्यांचें करायचें काय याविषयीं मोठा मतभेद आहे. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, जुनें जें कांहीं तुटलें फुटलें असेल, उडून गेलें असेल, त्याची दुरुस्ती करून त्याला अगदीं पहिल्यासारखें बनवावें. मूर्तींचा एखादा हात तुटला असेल तर एखाद्या मूर्तीच्या 'सर्जना'ला बोलावून अगदीं तसा हात जोडून द्यावा. सीमेंटची अगदीं बेमालूम मलमपट्टी करावी आणि कांहीं खोड म्हणून राहूं देऊं नये.

लाहोरच्या संग्रहालयांत एका मूर्तीची अशा प्रकारची सर्जरी फारच कौशल्यानें केली आहे. भिन्न भिन्न काळीं आणि निरनिराळ्या ठिकाणीं सांपडलेले मूर्तीचे कित्येक अवयव एकाच मूर्तीचे असले पाहिजेत असें अनुमान चालवून आणि ते सगळे एकत्र करून छिन्नभिन्न झालेली एक अतिप्राचीन सुंदर मूर्ति अखंड बनविण्यांत आलेली आहे. त्या मूर्तीनें आपणांला अशा प्रकारें जीवदान देणाऱ्या सर्जनला आभारपूर्वक म्हटलें असेल कीं, 'या उपकाराची फेड मी कशी करूं ? मरून तुझ्या पोटीं यावें असें वाटतें.' पोटीं दगड जन्माला येणें त्या मूर्तिकाराला कितपत आंवडलें असतें हा प्रश्न निराळा !

आम्ही 'आबू'वर गेलों होतों तेव्हां दिसलें कीं, तेथल्या देलवाड्याच्या मंदिरांत कांहीं मोडतोड झाली कीं जयपुरी किंवा जोधपुरी संगमरवरी दगड मागवून कसलेल्या कारागिरांकडून ताबडतोब बेमालूम दुरुस्ती करून घेण्यांत येत असे. तेथें खास याच कामासाठीं पिढ्यान् पिढ्या काम करणारे कारागीर कायमचे ठेवले आहेत.

परंतु इतकी काळजी नि इतकें कौशल्य सगळीकडेच पाह्यला मिळत नाहीं. काठेवाडांत पालिठाण्याजवळील 'शत्रुंजा' पर्वतावर जैन लोकांच्या मंदिराचें एक मोठें बन आहे. तेथल्या मंदिरांतल्या एखाद्या मूर्तीचें नाक किंवा कान मोडला म्हणजे संगमरवरी मूर्तीला देखील सीमेंटचें नाक-कान जोडून देतात आणि तेंहि इतकें बेडौल कीं, आपल्या लावण्यमय कृतीची ही विडंबना पाहून मूळ मूर्तिकाराला जीव नकोसा व्हावा. नव्या पिढीच्या हातून होणाऱ्या अशा प्रकारच्या बेअकली सुधारणेंत किती धोका आहे हें पाहून जगांतील पुढाऱ्यांनीं असें ठरविलें आहे कीं, प्राचीन वस्तूंचें नूतनीकरण न करतां किंवा अपूर्णतेची पूर्ति न करतां जें आहे त्याचेंच संरक्षण करणें योग्य ! त्याच न्यायानें अजिंठ्यांतील उरलेल्या चित्रकलेचें हल्लीं फारच काळजीपूर्वक संरक्षण करण्यांत आलेलें आहे. दुभंगलेलीं चित्रें नव्या कारागिरांकरवीं चांगलीं करून घेण्याचा जर कोणी प्रयत्न करील तर त्याला 'हजाम' ठरवून हांकून लावण्यांत येईल.

अजिंठ्याच्या चित्रांचें केवळ संरक्षण करणें हेंच योग्य आहे. परंतु तेथें जाणाऱ्या चित्रकारांनीं आपल्या अनुकृतींत पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांत कांहींच अनुचित नाहीं. मात्र भ्रम उत्पन्न होऊं नये म्हणून आपण तशी सुधारणा केली आहे असा स्पष्ट उल्लेख त्यांनीं केला पाहिजे.

यद् यद् साधु न चित्रें स्यात् क्रियते तत्तदन्यथा ।
न्यूनं संपूर्णतां याति शिल्पीभावप्रसादतः ॥

अजिंठ्याची चित्रकला जोंपर्यंत आधुनिकांच्या दृष्टिआड होती तोंपर्यंत ती खूप सुरक्षित होती. लेण्यांत आराम करणाऱ्या वाघानें भिंतीवर पंजा घासला तर त्याचे ओरखडे अगदीं खालच्या भागावरच उठत. कदाचित् भिकारीच आसऱ्यासाठीं येथें रहात असावेत ! वटवाघळांनीं घरटीं बांधून किंवा मलोत्सर्ग करून चित्रें बिघडविलीं असतीं तर तीं युक्तिपूर्वक धुवून काढून पहिल्यासारखीं करतां आलीं असतीं. पण एखादा गांजेकस बैरागी आंत धुनी पेटवून बसला कीं, मग धुरानें सारींच चित्रें मातीमोल व्हायचीं. पावसाळ्यांतल्या आर्द्र हवेमुळें ओलसर झालेल्या चित्रांचा लेप धुनीच्या उष्णतेनें लवकर वाळून जायचा. आणि मग त्याचे पापुद्रे सुटून हळूहळू गळूं लागायचे. अशा प्रकारचें नुकसान येथें बरेंच झालें आहे. कांहीं ठिकाणीं अर्धदग्ध युरोपियन चित्रकारांनीं चित्रांवर वॉर्निश चोपडून त्यांना काळेंकुट्ट करून टाकलें आहे. युरोपियन प्रवाश्यांनीं तर सुरी चालवून सबंधच्या सबंध चित्रें जशीं हातीं आलीं तशीं लांबवलीं असें म्हणतात. आणि आपल्या देशांतील कित्येक असंस्कारी लोकांनी ह्या चित्रांवर आपलीं नांवें आपल्या दिव्य हस्ताक्षरांत कोरून अमर केलीं आहेत ! अमर चित्रकलेचा अशा प्रकारें नाश करणारे हे नाशकर्मी दुर्जन कोण होते तें नांवावरून ओळखतां येईल. अनंत काळपावेतों लोकांनीं आपणांस शिव्याशाप द्यावेत अशी सोय त्यांनीं करून ठेवली आहे असेंच म्हणावें लागेल, दुसरें काय !

नव्या दिल्लीला व्हॉइसरायच्या महालाजवळ एक सरकारी संग्रहालय आहे. तें मीं नुकतेंच पाहून आलों. हिंदी सरकारच्या गोऱ्या अंमलदारांनीं मध्य आशियांतून पुष्कळच महत्त्वाच्या वस्तु लुटून आणून येथें ठेवल्या आहेत. पुष्कळसा माल तर विलायतला पोहोंचला आहे. परंतु येथल्या पैशानें आणि येथेंच रक्त सांडवून केलेल्या युद्धांतल्या लुटीचा थोडासा भाग येथें देऊन सरकारनें भलेपणा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. या संग्रहस्थानांत मध्य आशियांतील मोठमोठ्या मंदिरांतल्या भिंतींवरचे लेख फोडून आणून त्यावरची चित्रें अगदीं मूळ चित्राप्रमाणें बसवून दिलीं आहेत. लोभाच्या आधीनें झालेला मनुष्य कोणतें पाप करणार नाहीं ? ‘ मध्य आशियांत केव्हां तरी यांचा नाश

होणारच होता. आणि सुधारलेलीं माणसें तेथपर्यंत जाऊन या अप्रतिम कलाकृति पहाणें शक्य नव्हतें. म्हणून आम्हीं त्या तेथून येथें घेऊन आलों ' असें ते आपलें समर्थन करतात.

ज्यांनीं या कलाकृति निर्माण केल्या ते लोक आणि त्यांचे वंशज तर जंगली होते. त्यांच्यांत लूट करण्याची बुद्धि किंवा शक्ति कोठून असणार ? ज्या पक्षाकडे तोफा-बंदुका आहेत त्यांना न्यायनीतीची काय चाड ?

एक प्रश्न नेहमीं मनांत उठतो. हीं सगळीं चित्रें येथें रहाणाऱ्या कलाकार बौद्धभिक्षूंनीं स्वतः काढलीं होतीं कीं धनाढ्यांनीं आणि गुणाढ्यांनीं या गुहा तयार करून दिल्यावर एखाद्या चित्रकार संघानें संघसेवा म्हणून या सगळ्या भिंती रंगवून दिल्या होत्या ? किंवा असेंहि असेल कीं, एखाद्या राजानें एखाद्या चित्रकार मंडळाचा अपमान केला असेल म्हणून चिडून जाऊन त्यांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन वनवास पत्करला असेल. आणि मग मोठमोठ्या चक्रवर्ति सम्राटांनाहि ईर्षा उत्पन्न होईल अशीं चित्रें तयार केलीं असतील !

द्रव्यलोभानें किंवा कीर्तीच्या मागें लागून केलेल्या कामापेक्षां धर्मासाठीं आणि शाश्वत कल्याणासाठीं केलेलीं कामें नेहमीं अप्रतिम ठरायचींच !

हीं लेणीं तयार करायला हजार वर्षें लागलीं. पण त्यांचा इतिहास सांपडत नाहीं. त्याचें रहस्य शोधण्यांत आणखी हजार वर्षें घालविलीं तरी त्याचें काय ? ' सा रम्या नगरी महान् स नृपतिः ' असें म्हणून एका विरागी राजानें काळाला नमस्कार केला; परंतु काळाच्या साम्राज्याचा विसर पाडणाऱ्या या कलेला वंदन करणें हेंच अजिंठ्याच्या लेण्यांत बसल्या बसल्या अधिक स्वाभाविक आणि उचित वाटतें.

राजपुतान्यांत एक म्हण आहे कीं, चीतडां भीतडां अने गीतडां ( चित्रें, भिंती आणि गीतें ) या तिहींमुळें नांव अजरामर होतें. अजिंठ्याच्या लेण्यांत भिंतीवर चित्रें आहेत. फक्त येथें येऊन गीतें गाणाऱ्या कवींचीच उणीव आहे.

महाराष्ट्रांत अशीं किती तरी कलात्मक सौंदर्य-स्थानें आहेत. पण त्यांचीं गीतें गाणारे कवि ? ?

९-२-'३७

# घृष्णेश्वर

६

: १ :

इलापुरे रम्यविशालकेऽस्मिन्। समुल्लसन्तं च जगद्वरेण्यम्॥
वन्दे महोदारतरस्वभावम्। घृष्णेश्वराख्यं शरणं प्रपद्ये॥

ज्यांच्या स्मरणमात्रानें साता जन्मांचीं पापें नष्ट होतात अशीं बारा ज्योतिर्लिंगें आपल्या देशांत आहेत. ज्याप्रमाणें चार धामांची यात्रा करणें म्हणजे सारा देश पाहून घेण्यासारखें आहे, त्याप्रमाणें या खेपेस मीं जीं ज्योतिर्लिंगें पाहून घेतलीं त्यांत साऱ्या शैव भारताचें दर्शन मला घडलें.

मला वाटतें कीं, या बारा ज्योतिर्लिंगांचें केवळ स्मरण केल्यानें अथवा त्यांचीं नांवें असलेले ज्योतिर्लिंग-स्तोत्राचे चार श्लोक पाठ केल्यानें मात्र भूगोलाचा एक धडा पाठ केल्याचें पुण्य लाभतें; परंतु जर कुणी पायीं यात्रा करून या बारा ज्योतिर्लिंगांचें दर्शन करील आणि नंतर त्या साऱ्या यात्रेच्या अनुभवांचें स्मरण करील तर सातच काय पण सातशें जन्म केलेलीं पापें सुद्धां पहातां पहातां जळून भस्म होतील. स्मरणा-स्मरणांतहि फरक असतो. ज्याचें दर्शनच घडलें नाहीं, त्याचें स्मरण मनांत कितीसें खोलवर घर करूं शकणार? आणि ज्या जीवनांत उत्कटताच नाहीं, व्यापकता नाहीं, तें निष्पाप कसें काय बनूं शकणार?

हीं बारा ज्योतिर्लिंगें पुढीलप्रमाणें आहेत: थेट हिमालयांत केदारनाथ आहे; तेथून खालीं उतरतां बनारसला काशीविश्वेश्वर. तेथून उज्जैनला गेल्यास महाकाळेश्वराचें दर्शन होईल आणि नर्मदाकिनारीं पोहोंचल्यास ओंकारनाथ अमलेश्वर भेटेल; त्याच्या दक्षिणेस नाशकाहून अठरा मैल दूर पेशव्यांनीं ज्याचें महत्त्व वाढवलें तें त्र्यंबकेश्वर विराजमान आहे. तेथून पुढें भीमेच्या किनाऱ्यावर

भीमाशंकराची पूजा होते. काठेवाडच्या किनाऱ्यावर सोरटी सोमनाथाचें मंदिर होतें तें तर नष्ट झालें आहे, पण त्याच्याऐवजीं एक नवें मंदिर जें अगदीं जमिनीच्या आंत बनविलें गेलें आहे, त्याच्या दर्शनानें संतोष मानून घ्यावा लागतो. निजामाच्या राज्यांत गेलें तर आपल्याला बाकीच्या तीन ज्योतिर्लिंगांचें दर्शन होतें. वेरूळच्याजवळ घृष्णेश्वर, शैल पर्वतावर मल्लिकार्जुन आणि परळीजवळ श्रीवैजनाथ. दारुकावनांत नागेश आहे. जर हाच औंढ्या नागनाथ असेल तर त्याची गणना देखील निजामच्या राज्यांतच करावी लागेल. आणि शेवटीं जेथें लंका व भारतभूमि यांच्या दरम्यान सेतु बांधला गेला आहे त्याच्याजवळ रामेश्वर महादेव आहे.

याखेरीज नेपाळांत असलेला पशुपतिनाथ केदारनाथचेंच अंग मानलें जातें. कारवार जिल्ह्यांतील गोकर्ण महाबळेश्वराचें शिवलिंग हें केवळ ज्योतिर्लिंग नसून प्रत्यक्ष महादेवाचें हृदयलिंग आहे. त्याचे चार तुकडे रावणानें कारवार जिल्ह्यांत इतस्ततः फेकलेले आहेत. मद्रास प्रांतांत कांची, चिदंबरम् वगैरे पंचतत्त्वात्मक शिवलिंगेंहि प्रसिद्ध आहेत.

अशा प्रकारें बारा ज्योतिर्लिंगांच्या यात्रेंत फक्त पूर्वभारत सोडून बाकीच्या साऱ्या भारताचें दर्शन घडतें.

या ज्योतिर्लिंगांचा अर्थ काय ? भारतीय विद्येचे महापंडित बाबू भगवानदास म्हणतात कीं, जेव्हां माणसाला एखादा असा दगड मिळतो कीं, तो पृथ्वीवरला नसून आकाशांतून पडलेला असतो, तेव्हां तो त्याची ज्योतिर्लिंग म्हणून पूजा करतो. आकाशांतून जेव्हां उल्कापात होतो तेव्हां जळता दगड कधीं कधीं पृथ्वीपर्यंत येऊन पोहोंचतो.

: २ :

वर निर्देशिलेल्या ज्योतिर्लिंगांत ज्याची गणना होते असें ज्योतिर्लिंग अलीकडेच मीं वेरूळला पाहिलें. त्याच्या नांवाच्या बाबतींत थोडासा भ्रम आहे. स्तोत्रांत तें 'घृष्णेश्वर' या नांवानें प्रसिद्ध आहे. परंतु संस्कृतमध्यें 'घृष्ण' असा शब्दच मिळत नाहीं. 'धृष्ण' शब्द प्रकाशाचा किरण या अर्थानें वापरला जातो. जर 'घृष' म्हणजे घासणें, पॉलिश करणें, चकचकीत करणें या उपपत्तीतून घृष्णेश्वराचा अर्थ बसविला तर हें लिंग दगड घासूनघासून चकचकीत करून बनविण्यांत

आलें आहे असा अर्थ लावतां येईल. परंतु घृष्णेश्वराचें सध्यांचें लिंग तर साध्या दगडाचें आणि कांहींसें खडबडीत आहे. 'धृष्ण'चा अर्थ आहे प्रकाशाचा किरण. त्यावरून जर धृष्णेश्वर नांव घेतलें तर ज्योतिर्लिंगाशीं तें नांव चांगलें जुळतें. 'घ' व 'ध' लिहिण्याच्या पद्धतींत इतकी थोडी तफावत आहे कीं, कोणतें नांव खरें हें ठरविणें फार कठीण आहे.

असो; वेरूळजवळील प्रख्यात ज्योतिर्लिंग आम्ही अलीकडेच पाहून आलों. मग तें 'घृष्णेश्वर' असो कीं 'धृष्णेश्वर'.

मुंबई-नागपूर रेल्वेफांट्याच्या दरम्यान मनमाड स्टेशनापासून निजामाची रेल्वे सुरू होते. तेथून आम्ही औरंगाबादला गेलों. त्या रेल्वेवर निजामाचे ' हाली रुपये ' चालतात. औरंगाबादहून वेरूळ जवळ जवळ ३२ मैल आहे. तेथलीं बौद्ध, शैव व जैन लेणीं जगप्रसिद्ध आहेत. आम्ही तीं पहायला गेलों होतों. तेथें छोट्याशा टेकाडावर घृष्णेश्वराचें मंदिर आहे. २१ वर्षांपूर्वीं एकदां मी हें मंदिर पाहिलें होतें. त्या वेळीं तें आजच्यापेक्षां अधिक नवें वाटत होतें. या प्रदेशांत न मिळणारा असा लाल दगड कुणास ठाऊक कुठून तरी आणून हें सारें मंदिर बांधलें गेलें आहे ! पावसानें चढलेल्या शेवाळामुळे कांहीं ठिकाणीं मूळचा लाल रंग झांकला गेला आहे. जर हें शेवाळ घासून काढून टाकलें गेलें तर आज देखील हा दगड नवाच्या नवाच दिसेल ग्रांत शंका नाहीं. टेकडावर असल्यामुळें हें मंदिर दुरूनहि दृष्टीस पडतें व विशेष शोभिवंत दिसतें. त्याच्या बाजूस मशिदींसारख्या दोन इमारती दिसतात, परंतु चिंचेच्या झाडांच्या विस्तारामागें त्या झांकल्या गेल्या आहेत. या दोन्ही मशिदी हिंदु व मुसलमान स्थापत्याच्या सुंदर मिश्रणाचे साधे नमुने म्हणून खरोखर पहाण्यासारख्या आहे.

मंदिराच्या आसपास एक लहानशी भिंत आहे. त्यांतून आंत शिरल्यावर आपल्याला आढळून येतें कीं, एका काळीं या मंदिरामागें भक्तांनीं आपल्या भक्तीची मेहनत चांगल्याच प्रमाणांत खर्च केलेली आहे. दगडाची फरसबंदी, मंदिराच्या आजूबाजूचा चवुतरा हें सर्व एके काळीं सुंदर असेल. या मंदिराचें शिखर असाधारण सुंदर आहे आणि त्यावर कोरलेल्या मूर्ति मूर्तिकलेचे सुंदर नमुने म्हणतां येतील. आपल्या देशांत मूर्तीच्या खालीं किंवा तिच्या आजूबाजूस तिचें नांव लिहिण्याचा रिवाज नाहीं. ज्यांनीं पुराणें वाचलीं आहेत त्यांना कोणतीहि मूर्ति ओळखण्यास किंवा त्यांतील प्रसंग निश्चित करण्यास वेळ लागत

नाहीं. मूर्तिविधानांत व मूर्तीचें ध्यान करण्याच्या नियमांत मूर्ति ओळखण्याची रीत दर्शविलेली आहे, तरी देखील कांहीं कांहीं ठिकाणीं लोक मूर्तीच्या आसपास एखादें नांव लिहून ठेवतात किंवा वाटोळ्या वाटोळ्या अक्षरांत कोरून ठेवतात. येथें गोपुरावर ज्या मूर्ति आहेत त्या कोरतांना जेथें जागा सांपडली तेथें मूर्तिकारांनीं स्वतःच नांवें खोदलेलीं आहेत. हे मूर्तिकार फार सामर्थ्यवान् असल्याचा पुरावा या मूर्तिच आपल्याला पुरवतात. परंतु मूर्तींचीं नांवें मात्र अशुद्ध लिहिलीं गेलीं आहेत. 'मत्स्य'चें 'मछ' आणि 'बुद्ध'चें 'बुद' लिहिलेलें आहे. यावरून अनुमान निघूं शकतें कीं, हें गोपुर बनवलें गेलें त्या वेळचे कारागीर, मंदिर बनविणारे शिल्पकार आणि मंदिराच्या पूजेचा ठेका घेणारे पुजारी सर्वजण संस्कृतचा परिचय नसलेले – कमीत कमी अशा बाबतींत बेदरकार तरी असावेत.

हें मंदिर ज्या गांवीं आहे त्याचें नांव आहे वेरूळ. प्राचीन शिलालेखांत त्याचें नांव एलापूर अथवा एलापुरी असें सांपडतें. छत्रपति शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी या वेरूळचे पाटील होते. त्यांनीं येथल्या जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार करविला होता. जेव्हां औरंगजेब आपल्या मार्गांतून मराठ्यांचा कांटा काढण्यासाठीं दक्षिणेंत येऊन राहिला त्या वेळीं त्यानें हें मंदिर मोडून टाकलें. सध्यांचें मंदिर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनीं पुन्हां बांधविलें असें सांगतात. परंतु शिलालेखांवरून स्पष्ट दिसून येतें कीं, अहिल्याबाईनें नव्हे तर मल्हारराव होळकरांची ज्येष्ठ पत्नी गोमतीबाई हिनें या मंदिराचा जीर्णोद्धार करविला आहे.

मंदिराच्या गोपुराची मनमोहक आकृति ही तर त्याची विशेषता खरीच, परंतु मंदिराच्या आंत प्रवेश केल्यावर उघड्या मंडपांत जे टेके लावलेले आहेत त्यांवरील चित्रें पाहिल्यावर म्हणावें लागतें कीं, हीं चित्रें देखील या मंदिराची एक विशेषताच मानली पाहिजे. जेथें नजर फिरवावी तेथें शिकारीचीं नि शिकारीचींच चित्रें दृष्टीस पडतात. एका ठिकाणीं एक शिकारी एका लांब बांबूच्या दोन टोंकांस दोन जनावरांचे मुडदे टांगून त्याची कावड बनवून आपल्या खांद्यावर घेऊन जात असलेला दिसतो. दुसऱ्या ठिकाणीं एक शिकारी आणि त्याचे कुत्रे जनावरांना सतावीत आहेत. एका ठिकाणीं एक शिकारी हातांत बंदूक घेऊन एका वाघावर नेम धरून उभा आहे तर दुसऱ्या ठिकाणीं धनुष्यांतून बाणांचा वर्षाव करीत आहे.

मंदिरांत अशा प्रकारचीं शिकारीचीं लौकिक चित्रें पाहून अनेक प्रकारचे विचार मनांत आले. जेथें हजारों वर्षें अहिंसेच्या उद्घोष झाला अशा जैन व बौद्ध गुंफा इतक्या जवळ असतांना हें शिवमंदिर बनविणाऱ्या राजपुरुषाला येथें पशुहत्येचें स्मारक खोदतांना कांहींच संकोच कसा वाटला नाहीं ? अथवा हा घृष्णेश्वर एखाद्या शिकारी जातीचा कुळदेव तर नसेल ना ?

शिव-पार्वतीनें एकदां भिल्ल व भिल्लिणीचा अवतार घेतला होता अशी पुराणांत कथा आहे. किरातार्जुनीय काव्यांत हा प्रसंग गाइलेला आहे. त्या किरातांचें स्मरण करून तर हें मंदिर बनविलें नसेल ? परंतु एका शिपायाच्या हातांत बंदूक दिली आहे आणि बुद्धाचें नांव 'बुद' कोरण्यांत आलें आहे याचें स्मरण झालें कीं वाटतें, कीं येथें कोरलेला शिकारीचा प्रसंग पौराणिक नसून एखाद्या मध्ययुगीन शौकीन राजाच्या मृगया-पराक्रमाचें स्मारक आहे.

एकवीस वर्षांपूर्वी जेव्हां या स्थानाचें दर्शन घेतलें होतें तेव्हां आम्ही अहिल्यादेवींचें स्मरण करीत परत फिरलों होतों. या खेपेस अधिक माहिती मिळाल्यामुळें तो पुण्यसंबंध रद्द करावा लागला याचें दुःख झालें.

परंतु या मंदिराजवळच एक अतिशय सुंदर व सुघड कुंड प्रथमच पाहून आम्ही प्रसन्न झालों. कुंड फार प्राचीन आहे असें ऐकलें. त्याची रचना इतकी प्रमाणशुद्ध आहे कीं, तें पहातांच एखादें रत्न पाहिल्यानें व्हावा इतका आनंद होतो. कुंडाच्या माहात्म्याविषयीं सांगतात कीं, प्राचीन काळीं एका राजाचें कोड या तलावांत स्नान केल्यानें नाहींसें झालें होतें. आज या कुंडाचें पाणी इतकें घाणेरडें आहे कीं, त्यांत एखादा राजाच काय, पण एखादा ऋषि देखील स्नान करील तर त्याला कोड झाल्यावांचून रहाणार नाहीं ! पाण्यावर जमलेल्या शेवाळ्याचा थर इतका दाट आहे कीं, तो हातानें कितीहि दूर केला तरी पुन्हां जशाचा तसाच येऊन पसरतो. आम्ही गेलों होतों त्या वेळीं एक सज्जन यात्रेकरू मृत्यूनंतरचा नरकवास टाळण्यासाठीं या कुंडांत स्नान करण्याची तयारी करीत होता आणि किनाऱ्यावर बसून पायानें शेवाळ दूर करण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होता. आम्ही जेव्हां त्याच्या या संकल्पाविषयीं तिरस्कारयुक्त आश्चर्य व्यक्त केलें तेव्हां त्या बिचाऱ्याचा संकल्प शिथिल झाला आणि त्या शेवाळाला अभयदान देण्याचें पुण्य प्राप्त करूनच त्यानें संतोष मानून घेतला.

हें पाणी जितकें गलिच्छ होतें तितकाच त्यावर दाटलेला शेवाळाचा थर असाधारण सुंदर होता याकडे माझें लक्ष विशेष गेलें. हा एक प्रकारचा अकीकाचा दगड आहे, कीं ज्यांची चमक उडून गेली आहे असा पाचूचा एक चौरस तुकडा आहे हें मनाशीं ठरवीत मी तेथें उभा राहिलों. ज्याप्रमाणें अकीकाच्या दगडांत एखादी रेषा मधेंच येऊन त्याचें सौंदर्य वाढविते, तशा प्रकारच्या रेषा या शेवाळाच्या सौंदर्यांत भर टाकीत होत्या. जर सोबत मित्रमंडळी नसती तर एक कर्मठ बौद्ध बनून मांडी मोडून या शेवाळलेल्या कुंडाच्या कांठीं मी ध्यानस्थ बसलों असतों.

परंतु या वेळीं तसें कांहीं करण्याचा प्रसंग नसल्यामुळें एका कोपऱ्यांत पारिजातकाच्या झाडांचा एक समुदाय आम्हांला आमंत्रण देत होता त्याचें आतिथ्य स्वीकारून आम्ही बाहेर पडलों.

मी अशा प्रकारचीं अनेक तळीं व कुंडें पाहिलीं आहेत. सिरोहीजवळील ब्रह्मकुंडहि पाहिलें आहे आणि गोकर्णाचें कोटितीर्थहि बघितलें आहे. बनारसच्या मणिकर्णिका घाटावर बांधलेलें चक्रपुष्करणी तीर्थ पाहिलें आहे. आम्हीं लहानपणीं पंढरपुरांत एका लहानशा कुंडांत एक दगडाची नाव तरतांना पाहिली असल्याचेंहि आठवतें. गोव्यांत तर आपल्या प्रत्येक मंदिरासमोर एक मजेदार पुष्करिणी असतेच. तेथें तिला 'तळी' म्हणतात. 'तळी'च्या आसपासच्या केळी व माडांच्या झाडांमुळें तिची शोभा हजार पटींनीं वाढते. पण आपल्या साधेपणानें व प्रमाणबद्धतेनें या कुंडानें माझ्या मनावर पाडलेली छाप कधींच पुसली जाणार नाहीं.

काश्मीरमध्यें झेलम नदीच्या उगमापाशीं जहांगीर बादशहानें जो अष्टकोनी तलाव बांधला आहे त्याचें हें कुंड पहातांच स्मरण व्हावें इतकें तें प्रमाणशुद्ध आहे. फरक इतकाच कीं, या तलावामध्यें मरकतमणि आहे तर वेरीनागच्या तलावांत जणु काय नीलम जडविलेला आहे.

घृष्णेश्वर महादेवाला वंदन करून आम्ही वेरूळचीं लेणीं पहायला गेलों. या घृष्णेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार जरी अहिल्याबाईनीं केला नसला, तरी हें कुंड अहिल्याबाईनींच बनविलेलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२२१०

## १. औरंगजेब

एकवीस वर्षांपूर्वी जेव्हां दौलताबादचा किल्ला व वेरूळचीं लेणी पहायला गेलों होतों त्या वेळीं आलमगिराचें औरंगाबाद येथून अगदीं जवळ असूनहि पाहूं शकलों नव्हतों याची मनाला चुटपुट लागून राहिली होती. मोगल वैभवाला ज्याच्या कारकिर्दीत उतरती कळा लागली त्या बादशहाची कबर औरंगाबादमध्येंच आहे अशी कांहींशी माझी कल्पना होती. आणि म्हणूनच एकदां औरंगाबाद पाहिलेंच पाहिजे असा संकल्प मनांत दृढ झाला होता. मागाहून कळलें कीं, औरंगजेबाची कबर तेथें नसून खुलदाबादला आहे. औरंगाबादला आहे तो औरंगजेबाच्या बीबीचा मकबरा, जो आग्र्याच्या ताजमहालाचीच एक लहानशी प्रतिकृति आहे.

औरंगजेबाविषयीं मला नेहमींच एक विशेष आकर्षण वाटत आलें आहे. आम्ही महाराष्ट्रीय औरंगजेबाविरुद्ध प्राणपणानें लढलों आहोंत. औरंगजेबानें स्वतःच कबूल केलें कीं, जेथें हिंदुस्थानांतील अनेक बडीं बडीं राज्यें धुळीस मिळविणें त्याला साध्य झालें तेथें या डोंगरांतल्या उंदरांनीं त्याच्यादेखत एका नव्या चैतन्ययुक्त राज्याची उभारणी केली ! ! शिवाजीच्या कारकीर्दीत त्याचा बंदोबस्त करण्याचा औरंगजेबानें कसून प्रयत्न केला. आपल्या दरबारांत सन्माननीय पाहुणा म्हणून बोलावून त्याला कैदेंत टाकल्यानंतर आतां शिवाजीचा पुरा बीमोड झाला असें त्यानें मानलें होतें. परंतु तेथून बेमालूमपणें सुटका करून घेऊन आणि घालविलेले किल्ले परत मिळवून शिवाजीनें आपली व आपल्या मराठमोळ्या जनतेची चांगलीच ओळख औरंगजेबाला करून दिली होती. या अनुभवानंतर औरंगजेबानें विडाच उचलला कीं, ही नवी शक्ति दाबून टाकीन तेव्हांच स्वस्थ बसेन.

केवळ संकल्पशक्तीच्या दृष्टीनें पाहूं जातां, औरंगजेबाच्या तोलाचे फारच थोडे सम्राट् जगाच्या सिंहासनावर विराजमान झाले असतील. औरंगजेबानें आपल्या उतारवयांत वीस वर्षेंपर्यंत दिल्लीची फौज व दिल्लीचा खजाना दक्षिणेंत ओतून मराठ्यांशीं युद्ध चालविलें. संभाजीचा तर त्यानें क्रूरपणें वध केलाच होता. राजाराम थेट दक्षिणेकडे चंदीचंदेरीच्या किल्ल्यांत झुल्फिकारखानाच्या वेढ्यामुळें कैद होऊन पडला होता. शिवाजीचे सर्वोत्कृष्ट कारभारी संभाजीच्या आंधळ्या क्रोधाला बळी पडून स्वर्गवासी झाले होते. बाकी उरलेले बिनअनुभवी लोक सुचेल तसें लढत होते. त्यांतच शिवाजीच्या शिकवणुकीचा लोप झाल्यामुळें स्वार्थ, ईर्षा, जहागीरनिष्ठा व फितुरी यांचा जुना रोग महाराष्ट्रांत चांगलाच पसरला होता. आणि इतकें असूनहि महाराष्ट्रानें एकोणीस वर्षें दिल्लीश्वराशीं टक्कर दिली. आणि शेवटीं आलमगिरानें आपला देह महाराष्ट्रांतच ठेवला. औरंगजेबाच्या अत्याचारांचा पुरावा महाराष्ट्रांत हवा तेवढा मिळतो, तरी सुद्धां औरंगजेबाविषयीं मला विशेष आकर्षण वाटतें.

महाराष्ट्रांत जन्म घेतल्यानें जर कुणी महाराष्ट्रीय होत असेल, तर महाराष्ट्रांत मरण पावल्यानें औरंगजेब महाराष्ट्रीय बनला ही माझी भावना मला कशी पुसून टाकतां येईल ? आपल्या आयुष्याचीं शेवटलीं एकोणीस वर्षें ज्यानें महाराष्ट्रांत घालविलीं आणि आज देखील जो महाराष्ट्रांतच आपली अंतिम निद्रा घेत पहुडला आहे तो माझ्या दृष्टीनें महाराष्ट्रीयच आहे.

आणि औरंगाबाद ? ती तर माझ्या दृष्टीनें महाराष्ट्राची दिल्ली आहे. महमद तुघलकानें उत्तरेची दिल्ली दौलताबादच्या आसपास हलविण्याचा वेडा प्रयत्न केला, पण औरंगजेबानें औरंगाबादेंत १९ वर्षें ठाणें मांडून, त्या दौलताबादपाशींच खऱ्या अर्थानें दिल्ली वसवली.

## २. बीबीचा रोजा

असें सांगतात कीं, औरंगजेबानें ताजमहालाच्याच धर्तीवर एक मकबरा बांधून आपल्या गुरूला विचारलें कीं, “ या स्थानीं कोणाचें दफन करण्यांत यावें ? ” गुरूनें निखालसपणें सांगितलें कीं, “ तूं आहेस, तुझी राणी आहे व मी आहें. आपल्यापैकीं ज्याला प्रथम मृत्यु येईल त्याचा हा मकबरा होईल. ” बादशहाच्या बेगमेनें घाई करून या मकबऱ्याचा कब्जा घेतला आणि त्यामुळें ‘ बीबीचा रोजा ’ या नांवानें तो ओळखला जातो.

औरंगाबादेस पोहोंचतांच आम्ही हा मकबरा पहायला जाणार होतों, पण तें शक्य झालें नाहीं. परिणामीं माझी एक काव्यमय इच्छा पुरी झाली. साऱ्या दिवसाचा कार्यक्रम जवळ जवळ पुरा करून रात्रीं आम्ही हा मकबरा पहाण्यासाठीं निघालों. चांदणें आपला चांदीचा प्रकाश उधळत होतें. आम्ही मकबऱ्यापाशीं पोहोंचलों तेव्हां दरवाजे बंद झाले होते. आंत प्रवेश करण्याची अनुमति मिळण्याचा संभव नव्हता. परंतु रखवालदार सज्जन मनुष्य होता. त्यानें नियमाचेंहि पालन केलें आणि आम्हांलाहि कांहींसा संतोष देण्याचा मार्ग काढला. मोठ्या फाटकाची दिंडी त्यानें उघडली आणि बाहेरूनच मकबऱ्याचें दर्शन घेण्यास आम्हांस सुचविलें. जेव्हां जेव्हां असें चंद्रिकाधवल दर्शन घडतें तेव्हां सर वॉल्टर स्कॉटच्या या ओळी आठवल्यावांचून रहात नाहींत आणि पुन्हां पुन्हां त्या उद्धृत केल्यावांचून रहावत नाहीं :

If thou wouldst view fair Melrose aright
Go visit it by the pale moonlight.

रात्रीं सर्व अस्पष्ट अस्पष्ट दिसत असल्यामुळें कल्पनेला अधिक वाव मिळणें स्वाभाविक होतें. पडदानशीन रमणीविषयीं ज्याप्रमाणें कल्पनाच करावयाची असते, त्याप्रमाणें या स्थापत्य-रमणीविषयीं फक्त कल्पना लढवून आम्ही परत फिरलों. पण एवढ्यानें संतोष थोडाच होणार होता ? दोन दिवसांनीं आम्ही पुन्हां तेथें गेलों आणि भर दुपारीं त्या सौंदर्यमूर्तीचें दर्शन घेतलें. दुरून घेतलें, जवळून घेतलें, त्याच्या माथ्यावर चढून त्याच्या आसपास पाहिलें, जवळच्या मिनारावर चढून तो सारा मकबरा नखशिखान्त पाहून घेतला, तेव्हां कुठें मनाचें थोडें समाधान झालें. थोड्याच दिवसांपूर्वी व्हॉइसरॉय तेथें येऊन गेलेला असल्यामुळें आमच्या सद्भाग्यानें वरच्या घुमटावरील सुकलेलें काळें शेवाळ खरवडून काढण्यांत आलें होतें, त्यामुळें आग्र्याच्या ताजमहालचें स्मरण अधिक सहजपणें होत होतें.

ज्यानें आग्र्याचा ताजमहाल ध्यानपूर्वक पाहिला आहे त्याची हा मकबरा पाहून थोडीशी निराशाच होईल. मनावर पहिली छाप पडली ती ही कीं, उंचीच्या मानानें त्याची रुंदी किंचित् कमीच आहे. एखाद्या शिपायाला 'अटेन्शन' – होश्यार – म्हणून उभा केला कीं, त्याचे खांदे जसे कृत्रिम व आंखडल्यासारखे वाटतात, तसेंच या इमारतीचे खांब वाटले आणि कांहींसा विरस झाला. औरंगाबादहून

परत फिरल्यानंतर आठ दिवसांनीं हें लिहितांना जेव्हां ताजच्या फोटोशीं या मकबऱ्याचा फोटो ताडून पाहिला तेव्हां ध्यानांत आलें कीं, ताजची इमारत अष्टकोनी आहे, तर हा मकबरा चौकोनी आहे आणि म्हणूनच तो कांहींसा ताबुतासारखा वाटतो. ताजच्या चबुतऱ्यावर जाण्याचा रस्ता भिंतीनें झांकला गेला आहे तर येथें दोन बाजूंच्या जिन्यांमध्यें पाण्याचा प्रवाह खेळविण्याची सोय केलेली आहे. ताजचे मिनार थोडेसे निमुळते ( tapering ) आहेत तर येथले अगदीं वरपर्यंत सरळ जातात. परिणामतः ताजच्या कारागिरींत नाजूकपणा अधिक जाणवतो. ताजच्या कपाळावर व गालांवर कुराणांतील वचनें चितारलेलीं आहेत त्यांचा अभावहि येथें जाणवतो. असा भेद असूनहि औरंगाबादचा हा रोजा मोंगल कारागिरीची एक प्रातिनिधिक व मनोहर कृति आहे याविषयीं शंका नाहीं. आंतली जाळी, वरच्या गॅलरींतून पहाण्याची सोय, प्रकाशाची सौम्यता. सारेंच शांत खिन्नता उत्पन्न करतें आणि कलेच्या आनंदांत विरहाचा विषाद कालवतें. मिनाऱ्यावरून दूरवरचें पाहून घेतल्यानंतर खालीं उतरतांना त्याच्या पायऱ्या मोजल्या त्या फक्त १२० होत्या.

औरंगाबादेंत एक जुनी मशीद आहे. दक्षिणेचा प्रख्यात राज्यव्यवस्थापक मलिक अंबर यानें ती बांधविली होती असें म्हणतात. हें सारें शहर प्रथम मलिक अंबरानें १६१० त वसविलें होतें आणि त्याचें फतेहनगर असें नांव ठेवलें होतें. त्याआधीं येथें खडकी म्हणून एक गांव होतें. औरंगजेबानें दक्षिणेची सुभेदारी हातीं येतांच स्वतःला रहाण्यासाठीं हें स्थान पसंत केलें आणि त्याला आपलें नांव दिलें. औरंगजेबाच्या मरणानंतर आसफझानें आपला तळ येथें ठोकला आणि अशा प्रकारें निजामाच्या गादीची मूळ स्थापना येथेंच झाली. आज देखील औरंगाबाद निजाम राज्याचें एक महत्त्वाचें शहर आहे.

## ३. पाणीबाबाचा धबधबा

बीबीचा रोजा पहायला जातांना दोन्ही वेळीं आम्ही औरंगाबादचा एक कृत्रिम धबधबा पाहून आलों. एका बगिच्याच्या एका कोपऱ्यांत एक छोटासा चौरस बुरूज उभा आहे. जणुं कांहीं एखाद्या पहारेकऱ्याचा वॉच-टॉवर ( Watchtower ). या बुरुजांतून पाण्याचा एक धबधबा अखंड वहात असतो. इतकें पाणी या टॉवरमधून कसें काय निघत असेल याचें लोकांना आश्चर्य वाटत आलें आहे. या पाण्याच्या प्रवाहाच्या मदतीनें धान्य दळण्याची चक्की

क्रमांक ...

चालविण्याची सोयहि येथें करण्यांत आली आहे. तोहि लोकांच्या आकर्षणाचा एक विषय होऊन बसला आहे. हिमालयांत गांवोगांवीं ज्यांनें असल्या पाणचक्क्या पाहिल्या आहेत त्याला यांत खास नवलाईचें असें कांहीं वाटणार नाहीं, पण येथल्या लोकांना त्याची मौज वाटेल खरी. या पाण्याच्या धबधब्याच्या आसपासचा हौद, बगीचा आणि त्यांत असलेल्या सुंदर इमारती हें सर्व औरंगाबादचें एक भूषण मानतां येईल. या बागेचा इतिहास आम्हांला पुढीलप्रमाणें सांगण्यांत आला :

त्या तिथें तो जो वृद्ध वृक्ष दिसत आहे त्याच्याखालीं जुन्या काळीं एक सत्त्वशाली फकीर बसत असे. दुरून पाणी आणून येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना तो प्रेमानें पाणी पाजत असे आणि वरून आशीर्वादहि देत असे. असें हें परोपकारी जीवन जेव्हां संपुष्टांत आलें, त्या वेळीं त्या फकिराचा शिष्यसमुदाय मोठा झालेला होता. त्या लोकांनीं मिळून विचार केला कीं, ‘ पाणीबाबाचें येथें एक चांगलेंसें स्मारक केलें पाहिजे. ’ त्या वेळच्या स्वदेशी इंजिनियरांनीं आपलें डोकें लढविलें आणि जवळच्या पहाडावरील एका जलाशयांतून ते पाणी बांधून घेऊन आले. पाण्याचा तो बंद कालवा जमिनींतून वरखालीं चढत उतरत जेव्हां शहरांत येऊन पोहोंचला तेव्हां आपल्या देशांत त्या काळीं तयार होणाऱ्या मातीच्या, भाजून पक्क्या केलेल्या नळाद्वारां तें पाणी या बगिच्यांत आणून टॉवरमध्यें चढविण्यांत आलें आणि तेथून खालच्या हौदांत पाण्याचा धबधबा सोडला गेला. तेव्हांपासून हें पाणी वहातच आहे आणि पाणीबाबाप्रमाणेंच माणसाला आणि वनस्पतिसृष्टीला आशीर्वाद देत आहे. पाणीबाबासाठीं याहून अधिक सुंदर स्मारक कोणी सुचवूं शकेल काय ?

## ४. खुलदाबाद

औरंगजेब बादशहाचा जनाजा अहमदनगरहून औरंगाबादेस आणण्याऐवजीं खुलदाबादेस कां घेऊन गेले असतील ? खुलदाबाद तर दौलताबाद आणि वेरूळ यांच्या दरम्यान एक लहानसें खेडेगांव आहे. औरंगजेबानें स्वतःच अशा प्रकारची कांहीं सूचना करून ठेवली असेल. आणि जर त्याच्या गुरूचें अवसान त्याआधीं खुलदाबादेंत झालें असेल तर मग दुसरें कारण शोधण्याची आवश्यकताच नाहीं. येथें औरंगजेबाच्या गुरूची कबर चांगली आहे आणि त्याची प्रतिष्ठाहि बादशहाच्या गुरूला साजेशीच आहे. पण औरंगजेबाची कबर तर

मूर्तिमंत साधेपणाच आहे. अलीकडेच निजामानें त्या कबरीच्या आसपास संगमरवरी जाळी उभी केली आहे खरी, पण तेवढ्यानें औरंगजेबाच्या कबरीच्या साधेपणाला बाधा येत नाहीं.

आतां सम्राट् या नात्यानें बाबर, हुमायून, जहांगीर आणि अकबराहूनाहि ज्याची महत्ता अधिक आणि ज्यानें कलाकोविद शहाजहानची गादी पचविली, त्याची कबर तर या सर्व बादशहांच्या रोजांकरितां अनेक पटींनीं वैभवशाली असली पाहिजे आणि त्यांत कलेची तर परमावधि झाली पाहिजे. परंतु अशा प्रकारें आकार किंवा विस्तार वाढल्यानें मोठेंपण येत नसतें. औरंगजेबानें विचार केला असेल कीं, 'मोठ्यांत मोठी मशीद बांधून, अथवा साऱ्या दुनियेंतील कारागिरांना दहा-वीस वर्षें वेठीस धरून, फार फार तर माझ्या वैभवाचा ठसा मी माझ्यामागें ठेऊं शकेन. लोकांना माझी रसिकताच पहावयाची असेल, तर दिल्लीच्या किल्ल्यांत माझ्या खाजगी मशिदींत मीं ती ओतलीच आहे. दक्षिणच्या लोकांना जर माझ्या अभिरुचीची कल्पना द्यावयाची असेल, तर औरंगाबादमध्यें एक मकबरा मीं उभा केलाच आहे. पण माझ्या कबरीद्वारां मला माझें वैभव व्यक्त करावयाचें नसून, माझें व्यक्तित्वच प्रकट करावयाचें आहे. माझे पूर्वज जहांगीर होते तर मीं आलमगीर बनलों आहें. याहून विशेष काय करणें शक्य आहे ? ज्या साधेपणांत मीं माझें सारें जीवन व्यतीत केलें, तो साधेपणाच मीं माझ्या मागें कां ठेवून जाऊं नये ? असें कोणतें वैभव आहे कीं, जें या साधेपणाहून वरचढ ठरूं शकेल ! म्हणूनच दिल्ली, आग्रा किंवा औरंगाबाद सोडून त्यानें आपल्या अंतिम विश्रामासाठीं एक लहानसें खेडेगांवच पसंत केलें आणि आपल्या कबरीवर संगमरवरी किंवा रेशमी आच्छादन न चढवितां केवळ एक रैहान ( सब्जा ) चें रोपटें लावण्याची सूचना देऊन ठेवली.

म्हणूनच अकबराच्या किंवा शहाजहानच्या समाधीपेक्षां औरंगजेबाची ही समाधि अधिक लक्ष वेधणारी आणि अधिक बोधप्रद आहे. एका साम्राज्याचा विस्तार करण्यासाठीं व शेवटपर्यंत तें टिकवण्यासाठीं त्यानें आमरण परिश्रम केले, आपल्या तंबूचे सोन्याचे कळस कापून घेऊन जाणाऱ्या मराठ्यांचा नायनाट करण्यासाठीं त्यानें आपली सारी शक्ति पणास लावली, परंतु शेवटीं आयुष्याची दोरी संपली किंवा तुटली, तेव्हां त्या साऱ्या गोष्टी विसरून जाऊन अलिप्तपणें एका खेड्यांत साध्यांत साधी कबर त्यानें स्वतःसाठीं पसंत केली !

या महाराष्ट्रीय बादशहांत अनेक प्रकारच्या खुब्या होत्या. जीवनांत तसेंच मरणांतहि त्याला अद्वितीय रहावयाचें होतें आणि त्याची ही इच्छा सफळहि झाली खरी.

त्याच्या शेजारींच त्याचा एक मुलगा, त्याची सून आणि गुरुकन्या जवळ जवळ निजलेले आहेत. आणि या सर्वांना असे एकत्र आराम करतांना आणि कयामतच्या दिवसाची वाट बघत बसलेले पाहून या सर्वांचे परस्पर संबंध किती उत्कट आणि प्रेमळ असतील याची कल्पना येते. तें वैभव गेलें, ती राजखटपट निवली, त्या जमान्यांतील हजार हेवेदावेहि आतां उरले नाहींत. राहिली आहे ती फक्त माणसामाणसामधील हार्दिक संबंधाची स्मृति, जी येथल्या संगमरवराच्या कोमलतेंतून व्यक्त होत आहे.

त्यांच्या निद्रेंत भंग न पडो.

१७–९–’४०

# सह्याद्रीचे घाट

८

सातार्‍याहून सावंतवाडी

: १ :

महाराष्ट्राची राजधानी सातारा. तेथें माझा जन्म झाला. लहानपणीं सातार्‍यानजीक मीं दोन लहान लहान पहाड पाहिले होते. एक जरंडा. तेथें हनुमान विराजत आहेत. दुसरा सज्जनगड. तेथें छत्रपति शिवाजी महाराजांचे गुरु समर्थ रामदास यांची समाधि आहे. त्या काळीं मी इतका लहान होतों कीं, मला लंगोटीहि मिळालेली नव्हती. तरीहि घरच्या महादू गड्याचा हात धरून सज्जनगडावर चढून गेलों होतों, एवढें आठवतें. आणि हा डोंगर चढण्याआधीं उरमोडी नदी ओलांडली होती, हेंहि आठवतें. 'उरमोडी' म्हणजे छाती तोडणारी. हा अर्थ लक्षांत असल्यामुळेंच नदीचें नांव लक्षांत आहे. या डोंगरी नद्यांना जेव्हां पूर येतो तेव्हां मोठमोठ्या पोहणारांचीहि छाती फुटते. पावसाळा संपला कीं पाण्याचा प्रवाह शुष्क होतो. आणि मग नदीच्या छातीवर फक्त लहानमोठे फत्तर तेवढे उरतात !

यानंतर ज्या डोंगराशीं माझा परिचय झाला तो बेळगांवहून आमच्या बेळगुंदी गांवास जातांना लागणार्‍या बोकनूरच्या डोंगराशीं.

माझ्या बालमनानें ठरवून टाकलें होतें कीं, डोंगर दोन प्रकारचे असतात. एक शिरोमुंडण केलेल्या संन्याशासारखे. त्यांच्यावर एकहि वृक्ष दृष्टीस पडत नाहीं. दुसरे जटाधारी बाबांसारखे. त्यांच्या शिरावर व शरिरावरहि पहावें तेथें लहानमोठीं झाडें उगवलेलींच असतात आणि त्यांच्या पायथ्याशीं वाळलेलीं पानें मर्मरध्वनि करीत असतात.

मोठेपणीं मी हैदराबादला ( सिंध ) गेलों होतों, तेव्हां तेथें कालिमातेच्या मंदिरापाशीं एक बोडका डोंगर पाहिला. तेथील लोक त्याला 'गंजाटक्कर' म्हणत.

'गंजा' म्हणजे डोक्याचें मुंडण केलेला. हें नांव ऐकतांच मला बालपणींचे दिवस आठवले आणि महाराष्ट्रांतील कित्येक बोडके डोंगर नजरेसमोर उभे राहिले.

बोकनूरचा डोंगर जटाधारी होता. जेथें झाडें उगवत नव्हतीं तेथें चांगलें गवत उगवे. तें जनावरांना मोठें पौष्टिक मानलें जाई.

एके दिवशीं माझ्याच वयाच्या एका गड्याबरोबर बोकनूरच्या डोंगराची सहल करण्यास गेलों. तेथें एक भलें मोठें केतकी-वन होतें. त्यांत येण्या-जाण्यासाठीं जनावरांनीं वाटा बनविल्या होत्या. आम्ही आंत शिरलों. जणुं अंधाऱ्या विवरांत खूप फिरलों. पाण्याचे झरेहि पाहिले. थकून गेल्यानंतर दिशा आठवीत तेथून बाहेर पडलों.

घरीं येतांच आम्हीं सांगितलें, " केतकी-वनांत मोठी मौज वाटली. " हें ऐकतांच गांवांतील लोक आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, " जिवंत परत आलास ही देवाची दया ! अरे, त्या वनांत तर वाघ रहातात. आम्हां मोठ्या-मोठ्या माणसांना देखील त्या वनांत पाऊल टाकायची हिंमत नाहीं होत. त्या वनांत गेल्यामुळें किती कुत्रे आणि वांसरें वाघाचीं भक्ष्य होऊन गेलीं आहेत. सुऱ्याहि किती मूर्ख कीं तुला त्या वनांत घेऊन गेला ! त्यानं वाघाच्या गोष्टी कधीं ऐकल्या नाहींत वाटतं ? "

कांहींहि असो, त्या दिवशीं उभ्या गांवांत आमच्या वनप्रवेशाच्या पराक्रमाच्याच गोष्टी चालल्या होत्या. नकळत मी एक वीर झालों होतों.

त्या काळीं बेळगांवांत ब्रिटिश फौज असे. दरवर्षी फौजेंतले लोक बेळगुंदीस येऊन महिना दोन महिने रहात. बेळगुंदीच्या टेकडीवर तोफा ठेवून तेथून बोकनूरच्या डोंगरापर्यंत तोफेचे गोळे फेकले जात. त्या जंगलांत जाण्याची लोकांना परवानगी नव्हती.

कधीं कधीं मामाच्या घोडीवर स्वार होऊन मी आसपासच्या डोंगरभागांत फिरून येई. मोकळ्या मैदानांत आणि डोंगरांत हिंडण्यांत मोठी मौज वाटे.

पहाडांची खरी भव्यता आणि त्यांत सहल करण्याचा पुरेपूर आनंद आम्हांला सर्वांत आधीं आंबोली घाटांत मिळाला. बेळगांवहून ६२–६३ मैलां-वर सावंतवाडी संस्थान होतें. तेथें जातांना आंबोली घाट लागतो. आंबोली-हून सावंतवाडीपर्यंत जवळ जवळ अडीच हजार फुटांचा उतार आहे. हा सारा प्रदेश मोठमोठ्या झाडांनीं भरलेला आहे. जागोजाग पाण्याचे प्रपात आणि

रानकिड्यांचा किर्र् आवाज हें येथील सह्याद्रीचें दृश्य ! या रस्त्यानें बैलगाडींतून सामान घेऊन आम्ही जात असूं. मधूनमधून पायीं प्रवासहि केलेला आहे. हिंवाळ्यांत पहावें तिकडे धुक्याचा क्षीरसागर नजरेस पडे. या साऱ्या प्रदेशांत रात्रीच्या वेळीं आकाशांतील ताऱ्यांसारखे काजवे चमकत असतात. अशा पहाडावर एखाद्या उंच जागीं छोटीशी झोपडी बांधून रहाणाऱ्या लोकांचा मला नेहमीं हेवा वाटे. या लोकांचा जीवनक्रम किती विषम आणि संकटमय असतो याची मला कल्पना नव्हती. फक्त इतक्या उंचीवरून खालच्या प्रदेशाचा विस्तार गरुड नजरेनें पहाण्यास त्यांना मिळतो एवढ्यानेंच माझ्या काव्यात्म्याला त्यांचा हेवा वाटे. जवळून हिरव्या-हिरव्यागार वाटणाऱ्या टेकड्या दुरून निळ्या व जांभळ्या कां होतात यांचा विचार मी नेहमीं करीत असे.

आंबोली घाटांत प्रवास करतांना मीं अनेकदां एक लोककथा ऐकली होती.

ब्रिटिश सरकारनें आपल्या एका गोऱ्या अंमलदाराला आदेश दिला कीं, " रामघाटाचा रस्ता मोठा विकट आहे. गाडीचे आंस लांकडानें बांधून गाड्या वरून खालीं ओढत न्याव्या लागतात आणि एकेका गाडीला सहा-आठ बैल लावून वर न्याव्या लागतात. हें सारें टाळून ज्यायोगें प्रवासांत धोका रहाणार नाहीं असा दुसरा रस्ता तयार करा." गोऱ्या अंमलदारानें प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण रस्ता तयार होऊं शकला नाहीं. इतक्यांत तेथील एका लांकूडतोड्यानें साहेबबहादुरांना म्हटलें, " मी देतों तुम्हांला रस्ता दाखवून. हा सारा मुलूख माझ्या परिचयाचा आहे." त्यानें तसा रस्ता दाखवून दिला. तेव्हां साहेबबहादुरांनीं त्याला पुरेसा पैसा दिला आणि असला खुबीदार रस्ता शोधून काढण्याचें श्रेय आपणासच मिळावें म्हणून त्याला ठारहि करून टाकलें.

अशा लोककथा जागोजाग ऐकायला मिळतात, म्हणून त्यांवर विश्वास बसत नाहीं.

आंबोली घाटानंतर तिनई घाटाची पाळी. हा घाट बेळगांवहून मार्मागोव्यास जातांना वाटेवर लागतो.

आंबोलीचा घाट आम्ही बैलगाडींत बसून तीन दिवसांत ओलांडीत असूं. तिनई घाट वेस्टर्न इंडियन पोर्तुगीज रेल्वेमध्यें बसून आम्हांला मोठ्या मजेंत पहातां येत असे.

सर्वच दृष्टींनीं तिनई घाटाचें सौंदर्य अप्रतिम आहे. सारा घाट ओलांडतांना जवळ जवळ एकवीस बोगद्यांतून गाडी जाते. रस्त्यांत एक नितांतरमणीय धबधबा लागतो. त्याचें नांव दूधसागर. एखाद्या पर्वतकन्येनें न्हाणेंधुणें करून आपले केस वाळविण्यासाठीं पाठीवर सोडावेत, त्याप्रमाणें या धबधब्याचें दृश्य एकावर एक अशा तीन ठिकाणीं सौंदर्याचे नवेनवे प्रयोग करतें. एके ठिकाणीं पुढें आलेल्या खडकामुळें पाणी दुभंगलेलें आहे. वाटतें कीं कोणी पहाडी वीर आपल्या गळ्यांत घातलेला फुलांचा हार संकोचानें काढून ठेवीत आहे. तिनई घाटाचें खरें सौंदर्य कॅसलरॉकपासून सुरू होतें आणि जणुं या सौंदर्याचें आगळेंपण आपणांस पहातां यावें यासाठींच रेल्वे-रस्ता वळणें घेत घेत जातो. एकाच हिरव्या रंगांत किती असंख्य प्रकार होऊं शकतात हें दाखविण्यासाठींच प्रकृतिमातेनें येथें आपल्या वनस्पतिसृष्टीची विविधता आंथरली आहे.

जेथें जंगल असतें तेथें लहानमोठे पक्षी असतातच, पण जेव्हां जेव्हां मी तिनई घाटांतून आलों आहें तेव्हां तेव्हां जंगलाचें सौंदर्य येथील पक्ष्यांनीं असाधारण वाढविलें असल्याचें माझ्या अनुभवास आलें आहे.

जेथें पहाडाचें सौंदर्य संपतें तेथें काजूचीं, नारळीचीं आणि केळीचीं झाडें आपलीं स्वागतकारी पानें पसरून बोलावूं लागतात. येथील साऱ्या जंगली प्रदेशांत रहाण्याचा खरोखर माणसाला अधिकारच नाहीं. देवानें येथें रहाण्याचा परवाना तऱ्हेतऱ्हेच्या सापांना दिलेला आहे. काळे, पिवळे, हिरवे, तऱ्हेतऱ्हेचे साप आपल्या कातडीवर खुबीदार आकृत्या धारण करून कोठें कोठें दर्शन देतात.

वास्तवसृष्टींत साप व जंगली जनावरें आणि कल्पनासृष्टींत देवचार, भुतें यांची वस्ती येथें मोठी दाट आहे. देवचार म्हणजे येथील खास कोटींतील भुतें. या दुर्दैवी योनींतील प्राण्यांच्या कथा तेथील लोकांच्या तोंडून ऐकतांना भीतीनें अंगावर शहारे उभे रहातात, आणि तेथील लोक या साऱ्या कथा मोठ्या आवडीनें एकमेकांस कशा सांगतात, आणि या काल्पनिक सृष्टीला पिढ्यान् पिढ्या जिवंत कसें ठेवतात याचें आश्चर्य वाटूं लागतें.

तिनई घाटाचें सौंदर्य खंडाळ्याच्या घाटाहून कमी आहे असें मला वाटत नाहीं. कित्येक बाबतींत तें वरचढच असेल. या प्रदेशांत पाऊस बेसुमार पडतो. त्यामुळें येथील जंगलें आणि वनस्पतिसृष्टि बेहद्द वाढलीं आहेत. आणि इतकीं परिपुष्ट जंगलें जेव्हां हात उंचावून पावसास बोलावतात तेव्हां त्यांचा मान

राखण्यासाठीं आकाशांतील ढग येथें जास्तच पाऊस पाडतात. जंगलें व पाऊस 'परस्परं भावयन्तः' बिचाऱ्या माणसाला हैराण करीत रहातात. या प्रदेशांतील रेल्वेघर कितीहि छोटें असो, पण रेलगाडी छपराखालींच उभी राहूं शकते. आकाशांत पाऊस नसतो तेव्हां पांढरे ढग आपला खेळ खेळत असतात.

येथील लोकांची भाषा आणि बोलण्याची चाल या घाटाच्या सौंदर्यांत भरच टाकतात.

कोंकणीसारख्या मधुर भाषेचा वारसा मिळालेला असूनहि येथील लोकांचें त्यानें समाधान झालेलें नाहीं. जणुं हातहि ईश्वरानें बोलण्यासाठींच दिलेले आहेत असें मानून येथील लोक बोलतांना जोरजोरानें हातवारे करीत असतात. आणि अशा प्रकारें आपल्या मनांतील गोष्ट तुमच्या मनावर ठोकून ठोकून ठसवीत असतात.

याच कारणामुळें असेल कदाचित्, तिनई घाटाची शोभा माझ्या नजरेंत व हृदयांत खोलवर ठसलेली आहे !

: २ :

आमच्याकडल्या सह्याद्रीच्या घाटांत आंबोली घाटानंतर आठवण होते ती तिनई घाटाची आणि त्यानंतर आरबैल घाटाची. बेळगांव-धारवाडहून कारवार-कुमठ्यास जाण्यासाठीं आरबैल घाट उतरावा लागतो. या रस्त्यावर हल्याळ आणि यल्लापूरचीं दाट जंगलें आहेत. खरें म्हणजे निसर्गानें हा प्रदेश हत्ती आणि वनमहिष यांना विहार करण्यासाठीं निर्माण केला. सर्व प्राण्यांचा शत्रु आणि जीवसृष्टीचा दुष्मन म्हणजे माणूस. त्यानें हा सर्व प्रदेश त्यांच्याकडून हिरावून घेऊन आपला बनविला आहे. आणि त्याला त्याची किंमतहि द्यावी लागते. जंगलांचा शत्रु मनुष्य. त्याला दीर्घकाल सजा करण्यासाठीं निसर्गानें डांस आणि मलेरिया निर्माण केले आहेत. मलेरियानें पछाडलेला मनुष्य इतका हीन आणि रंक होऊन जातो कीं, त्याचें जिणें मरणाहूनहि वाईट होतें.

पण हत्ती आणि वनमहिष, मच्छर आणि मलेरिया – सर्वांचा पराभव करून आपलें राज्य चालविण्याचा-वाढविण्याचा निश्चय माणसापाशीं असतो. ॲटमबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्ब यांचीं नांवें ऐकून मनुष्यप्राणी ज्याप्रमाणें भयभीत होतो त्याचप्रमाणें डी. डी. टी.चें नांव ऐकून डांस आणि मलेरियाचे

जंतु भयग्रस्त झालेले आहेत. ॲटमबॉम्ब बनविण्याचें मनुष्यप्राणी कदाचित् बंद करील; पण कीटकसृष्टीचा संहार करणारें डी. डी. टी. बंद होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. कीटकसृष्टींतील प्राणी म्हणत असतील कीं, जगांत सर्वश्रेष्ठ भगवान् आणि भगवानाहूनहि श्रेष्ठ आहे हा सर्वसंहारकारी मानव !

आरबैल घाटांतून खालीं उतरतांना अघनाशिनी नदीचें दर्शन अनेक वेळां घडतें. ही सर्पिणी उंचवळीहून निघते आणि गोकर्ण-महाबळेश्वरानजीक समुद्रास मिळण्याआधीं एखाद्या वृत्तपत्रप्रतिनिधीच्या जागीं आपली नेमणूक झालेली आहे अशा अभिनिवेशानें आख्ख्या जगांतल्या बातम्या काढण्यासाठीं इकडेतिकडे फिरत असते.

याहूनहि दक्षिणेकडे जाऊन एकदां मीं अगुम्बा घाटाचें दर्शन घेतलें होतें. मंगळूरहून उत्तरेकडे कारकलला गेलों होतों. एके काळीं हा प्रदेश हैदर-अल्लीच्या व टिपूच्या हातीं होता. त्यांनीं बांधविलेलें एक मारुतीचें देऊळ पाहून मी अगुम्बा घाटावर पोहोंचलों. तेथील दृश्यहि सौंदर्याच्या दृष्टीनें अत्यंत आकर्षक आहे. येथील लोकांनीं मला म्हटलें, “ निसर्ग-सौंदर्याचें आकंठ पान करा; पण तेथील निसर्गाचें पाणी पिण्याची चूक करूं नका ! ” पाणी इतकें वाईट आहे कीं, एक पेला पाणी प्यालें कीं, इथला ताप सहा महिनेपर्यंत तुमची पाठ सोडणार नाहीं. अगुम्बा घाटाहून तीरथल्लीमार्गे मी धारवाडकडे गेलों होतों.

त्याहूनहि दक्षिणेस गेलें कीं सह्याद्रि संपतो नि मलयगिरि सुरू होतो. मधल्या घाटास पालघाट म्हणतात. पूर्वेची रेल्वे पालघाटमार्गें पश्चिमेस येते आणि त्या रेल्वेला दोन फाटे फुटून एक उत्तरेकडे मंगळूरपर्यंत आणि दुसरी दक्षिणेकडे केरळमध्यें आपणांस पोहोंचविते.

सह्याद्रीचे असलेच दोन घाट मीं उत्तरेकडे पाहिले आहेत. त्यांपैकीं खंडाळा घाटाविषयीं लिहिलेंच आहे. पुण्याहून लोणावळ्यावरून आपण मुंबईस जातों, तेव्हां खंडाळा घाट लागतो. येथील पहाडाचा अठ्ठावीस वेळां छेद करून रेल्वे कर्जतपर्यंत पोहोंचते. खंडाळ्याहून खालीं जातांच एकीकडे उल्हास नदीचा उगम आहे, तर दुसरीकडे पाताळगंगेचा. अनेक प्रपातांमुळें येथील दृश्य पावसाळ्यांत निनादित असतें. एक प्रपात तर सह्याद्रीच्या शिखरावरून उडी घेत एकामागून एक सात वेळां सुंदर प्रपात बनवून उल्हास नदीला जाऊन मिळतो. या प्रपाताचें नांव मीं ‘सातकूद’ असें ठेविलें आहे.

दुसऱ्या एका प्रपाताची तन्वंगी धारा वरून खालपर्यंत थेट पोहोंचते. पावसाळ्यांत हा प्रपात आहे कीं पावसाचीच धार आहे हेंहि कळत नाहीं. एके ठिकाणीं तर दोन बोगद्यांच्या मध्यें खिडकीपाशीं जातांच दोन्हीकडून दोन प्रपात बाहेर पडतांना पाहून मोठें आश्चर्य वाटतें कीं, ही निसर्गाची कृति आहे कीं माणसानें ही रचली आहे ?

खंडाळा घाटावर नेहमीं नजर ठेवण्याचें काम शिवाजीनें बांधलेला राजमाचीचा किल्ला करीत असतो. हा किल्ला इतक्या उंचीवर आहे कीं, गरुड पक्ष्यालाहि इतक्या उंचीवर आपलें घरटें बांधण्याची हिंमत व्हायची नाहीं. दुसरा घाट कसारा घाट म्हणून प्रसिद्ध आहे. मुंबईहून मध्यभारताकडे जाणाऱ्या लोकांना कसारा, इगतपुरी आणि नाशिक हा सारा प्रदेश आणि येथील सह्याद्रीचीं चित्रविचित्र शिखरें माहीतच आहेत. हीं शिखरें जेव्हां दृष्टीस पडतात तेव्हां भूस्तरशास्त्राचे एके काळीं वाचलेले सारे अध्याय आठवतात !

मी सह्याद्रीचा बालक आहें. सह्याद्रीच्या एका मुलीच्या – कृष्णेच्या – किनारीं माझा जन्म झाला आहे. सह्याद्रीच्या अनेक कन्यांचें स्तन्यपान मीं केलेलें आहे. पूर्वेकडे जाणाऱ्या कन्यांनीं पूर्वसागराशीं लग्न केलेलें आहे. पश्चिमेकडे उड्या घेणाऱ्या सह्याद्रि-कन्यकांनीं पश्चिमसागरास माळ घातलेली आहे. या कन्यांचीं भक्तिस्तोत्रें मीं 'जीवनलीला' या पुस्तकांत गायिलीं आहेत. आतां त्यांच्या पित्याची – सह्याद्रीची – मानसपूजा करीत आहें. सात कुल पर्वतांत सर्वश्रेष्ठ स्थान सह्याद्रीचेंच आहे. ज्येष्ठ स्थान अरवलीचें असो किंवा दुसऱ्या एखाद्या पर्वताचें असो, सह्याद्रीची प्रतिष्ठा अबाधितच राहील. जगांतील लोक गौरीशंकर किंवा एव्हरेस्ट या हिमालयीन शिखराकडे ज्या आदरदृष्टीनें पहातात, तसेंच आम्ही महाराष्ट्रीय लोक सह्याद्रीच्या कळसाबाईकडे भक्तिभावानें पहात असतों.

# आपला गोवा

१

: १ :

पंचवीस वर्षांनंतर गोव्याच्या या पुण्यभूमीचें आज मीं दर्शन घेतलें. माझ्या पूर्वजांची कर्मभूमि म्हणून तर ती माझी पुण्यभूमि आहेच; परंतु भारतीय इतिहासांतहि गोव्याचें महत्त्व अपूर्व आहे. सनातनी क्षत्रिय आणि जैन यांनीं त्याची असाधारण भरभराट केली होती. ब्राह्मणांनीं येथें येऊन आपल्या तपाचा चमत्कार दाखविला होता. परशुराम आणि श्रीकृष्ण येथील रमणीय डोंगरांत आणि पवित्र नद्यांच्या सुंदर प्रवाहांत क्रीडा करते झाले.

पण आज ख्रिस्ती लोकांच्या एका वेळच्या धर्मांधतेचा एक अवशेष म्हणून गोव्याकडे आमचें लक्ष जातें. गोमंतकांत ख्रिस्ती आणि मुसलमान आपापसांत खूप लढले आणि हिंदु लोकांनींहि आपल्या धर्मरक्षणासाठीं पुरेसें बलिदान दिलें. स्वतःच्या दुर्बलतेमुळें त्यांना ख्रिस्ती राज्यसत्ता स्वीकारावी लागली. तथापि पराभूत आणि दुर्बल प्रजा देखील आपल्या सस्कृतीचें कसें रक्षण करूं शकते, याचें प्रत्यंतर येथल्या हिंदु जातीनें दिलें.

निरनिराळ्या जातींच्या, वेगवेगळ्या धर्मांच्या आणि भिन्न भिन्न संस्कृतींच्या लोकांशीं वागण्याची कला ज्यांना शिकावीशी वाटत नाहीं, त्यांना इतिहास बळजबरीनें तो पाठ शिकवीत असतो व अनेकांत एकता प्रस्थापित करण्याचा समन्वयकारी जीवनसिद्धान्त त्यांना पटवून देतो.

गोमंतकांत असेंच झालें आहे.

दक्षिण हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यामध्यें हा गोव्याचा लहानसा प्रदेश आहे. सह्याद्रीचीं शिखरें आणि पश्चिमसमुद्राच्या लाटा ह्या गोमंतकाच्या नैसर्गिक सीमा होत. या प्रदेशावर पोर्तुगालच्या कॅथॉलिकपंथीय लोकांचें आज चार-साडेचारशें वर्षें अधिराज्य आहे

विजयनगरच्या वैभवशाली साम्राज्याचा उदय झाला व विनाशहि झाला. मराठ्यांचें हिंदवी राज्य स्थापन झालें आणि छिन्नभिन्नहि झालें. तसेंच इंग्रजांनीं आपल्या वखारींनीं प्रारंभ करून आपलें साम्राज्य आसेतुहिमाचल विस्तारलें व हळूहळू ते घालवीतहि आहेत. परंतु गोव्यांतली पोर्तुगीज सत्ता अजूनपर्यंत अबाधित आहे !

फ्रेंचांनीं या देशांत दरबारी राजनीति चालविली. इंग्रजांनीं व्यापारी राजकारण चालवून स्वतःचा पुष्कळसा फायदा करून घेतला. परंतु पोर्तुगीज लोकांनीं धर्म आणि संस्कृतीच्या दृष्टीनें येथील प्रजाजनांना आपल्यांत विलीन करण्याची जी राजनीति आजतागायत चालविली आहे ती जितकी आश्चर्यजनक, तितकीच अभ्यसनीय आहे. जोंपर्यंत चाललें तोंपर्यंत त्यांनीं ह्या देशांत एकमेव ख्रिस्ती धर्म प्रचलित करण्याचा प्रयत्न केला. अमुक भागांत मंदिर किंवा मशीद रहातां कामा नये, असेहि नियम केले व ते कठोरपणें बजावले. आज देखील गोव्यामध्यें प्राथमिक शाळांतून पोर्तुगीज 'रीडरें' चालतात आणि तद्द्वारा मुलांना असें शिकविण्यांत येतें कीं, 'आमचा स्वदेश पोर्तुगाल होय.'

कधीं एखादा राष्ट्रीय वृत्तीचा नवयुवक जेव्हां गुरुजींना विचारतो कीं, "तर मग आपण या परदेशांत कधीं आलों ?" तेव्हां ते ख्रिस्ती-विद्या-गुरु निरुत्तर होतात नि रागावतात. गोमंतकाची आजची जवळ जवळ अर्धी लोकसंख्या ख्रिस्ती आहे, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. आश्चर्य पुढेंच आहे व तें हें कीं, जवळ जवळ अर्ध्याहून अधिक जनता निग्रहपूर्वक कट्टर हिंदुच राहिली आहे. अशा स्थितींत तेथें हिंदु-ख्रिस्ती भांडण असणें ही स्वाभाविकच गोष्ट होय. राज्यकर्त्यांच्या मनांत ख्रिस्तेतरांना कांहींच स्थान नाहीं.

१९१० सालीं पोर्तुगालमध्यें राज्यक्रांति झाली, धर्माविषयीं उदासीन असें लोकसत्ताक स्थापन झालें व तेव्हांपासून गोव्याच्या हिंदूंच्या धार्मिक छळाचा जवळ जवळ अंत झाला. पोर्तुगालमध्यें प्रजासत्ताक स्थापन होतांच गोव्याला स्वायत्तता प्राप्त झाली खरी, पण ती पचविण्याइतकी शक्ति, बुद्धि किंवा जाणीव गोव्याच्या सामान्य जनतेंत नव्हती. संघटनेचें नांव नव्हतें. राजकीय कार्यासाठीं संस्था स्थापल्या पाहिजेत, तदर्थ द्रव्य जमविलें पाहिजे, वेगवेगळ्या समाजांत हार्दिक स्नेहभाव वाढविला पाहिजे, आपल्या हक्कांची खबरदारी घेऊन प्रसंगीं राजसत्तेशीं एकोप्यानें व प्रजाकीय पद्धतीनें लढलें पाहिजे — ह्या आणि अशा गोष्टी तेथील रहिवाश्यांना बिलकूल माहीत नव्हत्या.

खुद्द पोर्तुगालमध्येंच रिपब्लिकचा अंत झाला व हुकूमशाही बळावली व गोव्यांतहि ' जैसे थे ' झालें.

पोर्तुगाल सरकार केवळ स्वतःच्या हिताचा विचार करील तरी देखील येथील परिस्थिति सुधारण्यासारखी आहे; पण पुष्कळ दृष्टींनीं सध्यां तर तेथें अंधेरनगरीच आहे.

गोव्याची जनता भारतवासीच आहे. आपण एकाच समाजाचे घटक आहोंत, आपले सामाजिक, आर्थिक आणि व्यापारविषयक हितसंबंध समानच काय किंबहुना एकच आहेत, असें असून देखील गोव्यांतील राज्य अलग आहे. गोव्याचे रहिवासी लोक आपल्याच काळजाचा तुकडा असूनहि एक भिन्न राष्ट्राची प्रजा आहे. इंग्रज सरकार आणि पोर्तुगाल यांच्यांत फक्त मैत्रीचा संबंध आहे. जी स्थिति पॉंडेचरी व चंद्रनगर यांची आहे, तीच स्थिति गोव्याची आहे. दीव व दमण हीं इतकीं लहान आहेत कीं, त्यांच्याविषयीं येथें अलग विचारच करावयास नको.

गोव्याच्या राजकीय आंदोलनांत आपण कांहींच भाग घेऊं शकत नाहीं. उलट आमच्या स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांचा प्रत्यक्ष लाभहि गोव्याला मिळूं शकत नाहीं. तथापि असें असलें तरीहि परस्परांच्या सुखदुःखाविषयीं आपण उदासीनहि कसें रहावें ? गोव्याची स्थिति आम्हांला परिचित असणें अपरिहार्य आहे.

: २ :

गोमंतकाची निसर्गशोभा अनुपम आहे. उत्तरेचें काश्मीर आणि दक्षिणेकडील केरळ येथील सगळी शोभा एकत्र आणून जणुं काय निसर्गानें गोमंतक नटविलें. आगगाडीनें जातांना घाटाची वन्यशोभा, डोंगर पोखरून तयार केलेले बोगदे आणि सदाहि ऋतूंत हिरव्या दिसणाऱ्या वृक्षराजी चित्तवेधक तर आहेतच, परंतु काळी नदीनें बनविलेला दूधसागराचा धबधबा तर नुसता उन्मादकारी आहे. गिरसप्प्याचा धबधबा कदाचित् जगांत सगळ्यांत मोठा असेल, नायगऱ्याचा अधिक भीषण असेल, पण दूधसागर सर्वांपेक्षां जास्त मोहक आणि सौंदर्यमूर्ति आहे. गोव्याला नद्या आणि खाड्या यांचा जणुं चक्रव्यूह बनला आहे. एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जावयाचें

असेल तर भरतीओहोटी पाहून आपण जलमार्गानें सहज जाऊं शकतों, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. रेलगाड्या आणि मोटारी यांच्या प्रवेशामुळें जेथें जेथें लोखंडी पूल आणि वज्रलेप सडका बनल्या आहेत, तेथें जरा वेगळी स्थिति आहे हें खरें; तरीहि गोव्यांत जिकडे पहावें तिकडे पाण्याचा गोवा स्वतःच्या सुंदरतेनें आपल्या चित्तास पुलकित करतो.

नारळ, सुपारी, केळी, काजू, कोकमें ( रातांबे ) इत्यादि वृक्षांची शोभा इतकी घनदाट व गंभीर आहे कीं, जणुं काय ह्या वृक्षराजींच्या परवानगी-शिवाय माणूस वसाहतच करूं शकला नसता. ह्या वृक्षांतून हिंदूंचीं देवळें आणि ख्रिस्त्यांच्या इगरजा आपलीं डोकीं वर काढतांना जेव्हां दिसतात, तेव्हां तर सौंदर्याची परिसीमा होते आणि तोंडावाटे चटकन् उद्‌गार निघतो कीं, ‘ खरोखर ही देवभूमि आहे ! ’

लोकांतून जुनें शिक्षण जरी नाहींसें होत चाललें आहे, तरी पण साहित्याची हौस मात्र कमी झाली नाहीं. संगीताविषयीं गोवा विख्यात आहेच. नृत्यकला आणि कलाकुसर आजतागायतहि अबाधित राहिल्या आहेत. गोव्यांत जेव्हां जागृतीचें युग येईल, तेव्हां तो आपल्या संस्कारसमृद्धीमुळें महाराष्ट्रांतच काय, अवघ्या मुंबई इलाख्यांतहि अग्रेसर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु गोव्याची विशेष शक्ति त्याला आपल्या आजपर्यंच्या विपत्तींतूनच प्राप्त व्हावयाची आहे.

तेथील बरीचशी जनता कॅथॉलिकपंथीय ख्रिस्ती आहे. ख्रिस्ती गृहस्थाचें नांव घेतांच आपल्या डोळ्यासमोर कोट-पाटलोण व हॅट-बूटवाली व्यक्ति उभी रहाते. परंतु येथील हजारोंच काय पण लाखों ख्रिस्ती असे आहेत कीं, जे कमरेंतील करगोटा आणि रंगीत रुमालाची लंगोटी याशिवाय दुसरें कांहीं वापरीतच नाहींत. समुद्रकिनाऱ्यावरील दमट हवेंत अधिक कपडे वापरण्याची गरजच वाटत नाहीं. हे लोक शेती करतात, नारळ-सुपारीच्या बागा करतात, काजूची दारू गाळतात व रविवारीं प्रार्थनागृहांत जातात. ख्रिस्ती होऊन यांना शेंकडों वर्षें झालीं तरी लग्नाच्या वेळीं आपली जातगोत विचारांत घेणारे लोक देखील यांच्यांत आढळतात. ब्राह्मण ख्रिस्ती शक्य तोंवर भंडारी ख्रिस्त्याकडे आपली मुलगी देणार नाहीं. एकादशीला उपवास

करणारे आणि लग्नप्रसंगीं महादेवाला नारळ वहाणारे ख्रिस्ती देखील मीं माझ्या लहानपणीं पाहिले आहेत.

आतां त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झाला आहे. कांहीं ख्रिस्ती पोर्तुगाल आणि फ्रान्समध्यें वस्तीला गेले आहेत. पोर्तुगीज आफ्रिकेंतहि गोव्याचे पुष्कळ ख्रिस्ती आढळतात. अमेरिका आणि रशियांत देखील या लोकांनीं प्रतिष्ठा मिळविली आहे, असें ऐकतों. पोर्तुगाल देशाला आपली मायभूमि आणि पोर्तुगीज भाषेला आपली मायबोली मानण्यांत ते आपला गौरव समजत होते. आज देखील गोमंतकांत असे पुष्कळ ख्रिस्ती आहेत कीं, जे घरीं पोर्तुगीज बोलतील किंवा इंग्रजी.

गेल्या कांहीं वर्षांपासून यांच्यांत राष्ट्रीयतेची भावना उत्पन्न होऊं लागली आहे. आतां ते हिंदुस्थानला स्वदेश मानतात. ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांना स्वराज्यासाठीं प्रयत्न करतांना पाहून गोव्यांतील लोकांचीहि स्वराज्यकामना जागी झाली आहे. हिंदु आणि ख्रिस्ती एक झाल्यानेंच स्वराज्याची आशा सफल होऊं शकेल, एवढें त्यांना कळतें. पण हें ऐक्य कसें प्रस्थापित करतां येईल, याचा ते अजूनहि निश्चय करूं शकले नाहींत. पाद्र्यांनीं तर ख्रिस्त्यांना हिंदूंपासून अलग ठेवण्याचा भरपूर प्रयत्न केला. आतां त्यांचा प्रभाव थोडासा कमी होऊं लागला आहे ही गोष्ट खरी.

गोव्यांतील हिंदु आणि ख्रिश्चन यांना एक करणारीं तत्त्वें असंख्य आहेत. धर्म भिन्न असले तरी त्यांचें रक्त एक आहे. रहाणींत थोडाफार फरक असला तरी संस्कृति वेगळी नाहीं. सामाजिक जीवनांतील वेगळेपणा जरी आड येत असला तरी सार्वजनिक जीवन व सामान्य व्यवहार हे परस्परांना अनुकूलच आहेत.

आणि सगळ्यांत मोठें समान बंधन तर सांगावयाचें राहिलेंच. तें म्हणजे उभयसामान्य अशी ह्यांची प्रिय आणि मधुर कोंकणी भाषा. हिंदुस्थानांतील कोणत्याहि भाषेपेक्षां कोंकणीची माधुरी खासच कमी नाहीं. कोंकणी संस्कारी भाषा आहे. तिचें अर्थवाहित्व असाधारण आहे. उपमा-रूपकादि अर्थालंकारांनीं ती परिपूर्ण आहे. कोंकणी भाषेंत नुसतें ' सकाळ झाली ' असें म्हणणार नाहींत, तर ' पहाट फुलली ' असेंच कोणी म्हणेल.

कोंकणी आणि मराठी ह्या दोन भाषा भिन्न असूनहि परस्परांना इतक्या जवळ आहेत कीं, त्या दोन्हीहि एका कुटुंबांतील नाहींत, असें जर कोणीं म्हटलें तर त्यावर कोणाचा विश्वास बसणार नाहीं.

आश्चर्याची गोष्ट ही कीं, या उत्तर हिंदुस्थानांत हिंदीची जी हालत आहे तीच गोमंतकांत कोंकणीची आहे. गोव्याचे हिंदु कोंकणी लिहितात ते नागरी लिपींत आणि ख्रिस्ती लोक लिहितात रोमन लिपींत. हिंदूंच्या कोंकणी भाषेंत मराठी व संस्कृत शब्द जास्त असल्यामुळें ती स्वदेशी भासते. ख्रिस्त्यांच्या कोंकणी भाषेंत दिवसेंदिवस पोर्तुगीज भाषेंतील शब्द वाढत चालले असल्यामुळें अशिक्षित ख्रिस्त्यांना ती दुर्बोध होत चालली आहे. जे लोक गोवा सोडून दक्षिणेंत कर्नाटकांत जाऊन राहिले आहेत, त्यांच्या भाषेंत कानडी शब्द घुसले आहेत. इतकेंच नव्हे तर कोंकणी भाषा कानडी लिपींत लिहिणें व छापणें त्यांना सोयीचें वाटतें.

गोमंतकांतील हिंदूंत एक लहानसा पक्ष आहे, जो मराठी भाषेला कोंकणीची प्रतिस्पर्धी मानतो. मराठीच्या अध्ययनांत त्याला कोंकणीचा नाश दिसतो. कोंकणीनंतर जर शिकण्यासारखी कोणती भाषा असेल तर ती राष्ट्रभाषा हिंदी आहे, असें तो मानतो. दुसरा एक पक्ष आहे, तो कोंकणीला एक भाषा म्हणून प्रतिष्ठित करूं इच्छीत नाहीं. त्याचें म्हणणें असें कीं, कोंकणी ही मराठीचीच एक छोटीशी शाखा आहे. तिचें स्वतंत्र साहित्य नाहीं किंवा व्यापक सामाजिक प्रचलनहि नाहीं. ज्या प्रदेशांत ती प्रचलित आहे, तेथेंहि तिच्यांत इतके भेद आहेत कीं त्यांचें संघटन होणें कठीण. लोकव्यवहार कोंकणींत खुशाल चालो, पण आमची मायबोली तर मराठीच. इंग्लंडच्या प्रत्येक परगण्याची बोली निरनिराळी आहे, परंतु सुसंस्कृत लोक लिहिण्यावाचण्यांत आणि सार्वजनिक व्यवहारांत स्टँडर्ड-टंकशाळी इंग्रजीचाच उपयोग करतात; तसा आम्हांला गोव्यांत मराठीचा प्रचार केला पाहिजे. महाराष्ट्रांतील मराठीवाल्यांनीं आजपर्यंत कोंकणी भाषा बोलणाऱ्यांची निंदा केली नसती आणि तिला गांवढळ म्हणून हेटाळलें नसतें, तर मराठी-विरोधी असा कट्टर कोंकणी पक्ष निर्माण झालाच नसता. मराठीवाले आतां थोडेसे निवळले आहेत. ते उघड उघड कोंकणीची चेष्टा करीत नाहींत; पण तिच्याबद्दल त्यांचा तुच्छ भाव अद्याप समूळ नष्ट झाला नाहीं. गोव्यांतील हिंदु लोक आपला मराठीचा अभ्यास जीव तोडून वाढवीत आहेत. सरकार

एक कवडीचीहि मदत करीत नाहीं. साधेल तेथें उलट विरोधच करतें. बाहेरील स्थितींतहि महाराष्ट्रीयांची सहानुभूति नाममात्र आहे. आणि अशा परिस्थितींत गोव्यांतील हिंदु जागोजागीं मराठी शाळा चालवीत आहेत. ह्या शाळेंतील मुलें आपापसांत कोंकणी बोलतात, मराठीचें अध्ययन करतात. राजभाषा पोर्तुगीज असल्यामुळें ती त्यांना शिकावीच लागते. व्यवहार-व्यापार म्हणतो इंग्रजी शीक आणि जे उत्साही तरुण उच्च शिक्षण घेतात त्यांना ह्या सर्वांव्यतिरिक्त इटालियन, स्पॅनिश किंवा फ्रेंच, जर्मन भाषा शिकावी लागते. अशा लोकांशीं राष्ट्रभाषाप्रचाराच्या गोष्टी करणें सोपें नाहीं. तरी पण हिंदीसाठीं तेथें अनुकूल वातावरण तयार होऊं शकलें आहे. दोन-तीन दिवस अहोरात्र प्रयत्न करूनहि काम तें किती होणार ? तरी ज्या ख्रिस्ती गृहस्थांना मी भेटूं शकलों, त्यांनीं इतकें तर कबूल केलें कीं, कोंकणी भाषा नागरी लिपींत लिहिल्यानें तिचा प्रचार वाढेल. कोंकणींत जे पोर्तुगीज शब्द रूढ झाले आहेत, त्यांचा बहिष्कार करण्याचा प्रयत्न करूं नये, ही गोष्ट तेथील हिंदूंनीं मान्य केली आहे आणि हिंदूंच्या कोंकणींत जे मराठी शब्द येतात, ते शिकणें आपलें कर्तव्य आहे, हें ख्रिस्त्यांना पटूं लागलें आहे.

अशा प्रकारें गोमंतकांत कोंकणीला एकीकडून मराठीमुळें आणि दुसरीकडून पोर्तुगीज भाषेच्या अपरिहार्य अध्ययनामुळें दोमुखी प्रगति करावी लागते. गोव्याची जनता मराठी सोडूं शकत नाहीं. पोर्तुगीज त्यांना शिकावीच लागते. परंतु जातिजातींतील ऐक्यासाठीं दोन्हीहि समाजांनीं पारस्परिक अविश्वास, मत्सर, द्वेष यांचा त्याग करून करून कोंकणीचाच विकास केला पाहिजे.

गोव्याचे ख्रिस्ती मुंबईपासून मंगळूरपर्यंत पसरले आहेत. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानचा पश्चिम किनारा व आफ्रिकेचा पूर्व किनाराहि त्यांचा आहे. हिंदी स्वराज्याचा प्रश्न त्यांच्या वैयक्तिक दृष्टीनेंहि जसा महत्त्वाचा आहे तसा गोव्याच्या राजनैतिक प्रगतीचा प्रश्नहि आपल्याला तितकाच निकडीचा आहे. तेथील हिंदु आणि ख्रिस्ती जेव्हां एक होतील तेव्हां त्यांचा भाग्यसूर्य उदय पावेल. एखाददुसऱ्याला उपदेश करून हें काम होणार नाहीं. आपापल्यापरी हार्दिक संघटन करण्याचा प्रयत्न व एकमेकांविषयीं मनांत आदरभाव बाळगण्यानेंच हें काम सुकर होईल. पण जर गोमंतकांतील ख्रिस्ती उत्तर हिंदुस्थानांतील मुसलमानांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करतील आणि गोव्यांतील हिंदु जर

जातीयतेच्या भावनेनें मार्ग अडवतील, तर तेथील राजकीय प्रश्न ब्रिटिश हिंदु-स्थानांतील प्रश्नापेक्षां हजारों पटींनीं अधिक गुंतागुंतीचा बनेल. आम्हांस असा विश्वास वाटतो कीं, ब्रिटिश हिंदुस्थानच्या ५० वर्षांच्या इतिहासावरून गोव्याची जनता धडा घेईल आणि काँग्रेसच्या पद्धतीनें आपलें कार्य चालवून आपला उद्धार शक्य तितक्या लवकर करून घेईल.

गोमंतकांत आज अरेरावीचें राज्य आहे. सरकारला जर असें वाटलें कीं, अमुक चळवळ, मग ती कितीहि शुद्ध असो, राज्यविरोधी आहे, तर ती चळवळ करणाऱ्या व्यक्तीला सरकार कैद करून आफ्रिकेच्याच एखाद्या वसाहतींत वाटेल तितके दिवस हद्दपार करूं शकतें. अशा अनिष्ट परिस्थितींत तेथील जनता मन मोकळें करून बोलूं शकत नाहीं. अशा दडपशाहीच्या कायद्यामुळें राजसत्ता आणि जनता दोहींचें चारित्र्य बिघडतें. पण स्वातंत्र्यलालसा कदापि मरणें शक्य नाहीं. जेव्हां स्वातंत्र्यसूर्याचा उदय होईल तेव्हां अमुक राज्य पोर्तुगीज आहे म्हणून आपण आपले किरण तेथें पाठवितां कामा नये अशा-सारखा 'स्वधर्म' भगवान् श्रीसूर्यनारायण मानणार नाहीं – आजपर्यंत तसा त्यानें मानलेला नाहीं.

## पंढरी :

१०

**पंढरीचे वाटे बाभळीचे कांटे। सखा माझा भेटे पांडुरंग ॥**

पंढरपूरला जाऊन यावें आणि तेथें विठ्ठलाचें दर्शन घ्यावें, असें ज्याला कधींच वाटलें नाहीं, असा एक तरी महाराष्ट्रीय असेल का? अगदीं बाल्यकाळापासून पुंडलिकाच्या आणि नामदेवाच्या, ज्ञानदेवाच्या आणि गोऱ्या कुंभाराच्या गोष्टी ऐकत होतों. चोखामेळा आणि जनाबाई यांच्या अभंगांनीं पवित्र झालेलें पंढरपुराचें वातावरण आपणांला केव्हां पहावयाला मिळेल, असें लहानपणापासून आम्हांला वाटत असे. पण पंढरपूर म्हणतांच जें चित्र डोळ्यांपुढें येई, तें तुकाराममहाराजांचें. पंढरीसंबंधाचा ओढा जर कोणी मनामध्यें दृढ केला असेल तर तो तुकारामांच्या अभंगांनीं.

पुष्कळ वर्षांची ही उत्कंठा जेव्हां तृप्त होण्याची संधि आली, तेव्हां मला तर आपण नव्याच जगांत जातों आहोंत असें वाटूं लागलें. जतहून बैलगाडींत बसून आम्ही पंढरपूरला गेलों. बैलगाडींत बसून किंवा पायीं प्रवास करण्यांत जो आनंद वाटतो, जो अनुभव मिळतो आणि जी स्वतंत्रता असते, ती आगगाडीनें प्रवास करण्यांत मिळत नाहीं.

पंढरपूरच्या वाटेवर कुठल्याशा गांवीं संध्याकाळीं एका धर्मशाळेंत आम्ही उतरलों होतों. तेथेंच एक वारकरी येऊन उतरला. अंधार होत आला होता. हातपाय धुवून येऊन त्यानें धर्मशाळेंत एका कोपऱ्यांत आपलें सामान लावलें आणि आपल्या बोचक्यांतून दशम्यांचे थोडे तुकडे काढून त्यानें ते एका वाटींत घातले आणि त्यावर पाणी ओतून ती वाटी एका कोपऱ्यांत ठेवून दिली. हे तुकडे पाण्यानें चांगले मऊ झाल्यानंतर मगच ते त्याला खाणें शक्य होतें. कारण तोंडांत फारच थोडे दांत उरले होते. म्हाताऱ्याचें वागणें अत्यंत प्रेमळ, निःस्पृह आणि

संस्कारी होतें. दशम्यांचे वाळके तुकडे भिजत ठेवून देऊन त्यानें आपली पोथी उघडली आणि नित्यपाठाचे अभंग वाचण्यास सुरुवात केली. लहानपणापासून अभंग ऐकण्याची मला गोडी असे. मराठीमध्यें अभंग व ओवी या वृत्तांत जें साहित्य आहे, तेंच धर्मपरायण महाराष्ट्राचें अमूल्य धन आहे. हीं दोन्ही वृत्तें अत्यंत सोपीं पण वक्तृत्वपूर्ण आहेत. वाटेल तो रस या वृत्तांतून आळवितां येतो.

त्या वारकऱ्यानें तुकारामचरित्राचे अभंग सुरू केले आणि सद्‌गदित होऊन तो ते वाचूं लागला. त्या अभंगांतील भाव, वासरानें गायीचें दूध प्यावें त्याप्रमाणें मी ग्रहण करीत होतों. वारकऱ्याचा भक्तिभाव अगदीं बावनकशी होता. जेव्हां तुकाराम सदेह स्वर्गाला गेला हा भाग आला, तेव्हां म्हाताऱ्याच्यानें अभंग बोलवेनात. त्याचा गळा दाटून आला. डोळे आसवांनीं डबडब भरले आणि बराच काळ तो स्तब्ध बसला. मध्येंच एकदां हुंदका आल्याचाहि भास होई.

अशा रीतीनें संध्याकाळचा नित्यपाठ संपल्यानंतर त्यानें शरिराला त्याचा कर दिला आणि पंढरीला जाण्याची शक्ति आपल्या पायांत अजून आहे, याची धन्यता मानून तो झोपीं गेला. पण त्याच संध्याकाळीं त्यानें माझें हृदय खऱ्या भक्तीला जागें केलें. (याच प्रसंगाविषयीं यापूर्वीं कोठें तरी लिहिल्याचें स्मरतें म्हणून येथें विस्तार करीत नाहीं.) या वारकऱ्यासारख्या लोकांनींच महाराष्ट्राची भूमि पावन केली आहे. खुद्द पंढरपूर म्हणजे पवित्रांतील पवित्र भूमि. तेथील प्रत्येक खडा आणि धोंडा संतांच्या चरणानें पुनीत झालेला. पंढरींतील प्रत्येक वस्तु सुंदर आहे, पवित्र आहे, हितकर आहे, असें मानण्याची प्रथमपासूनची मनाची तयारी होती. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा बसलेले आंधळे, पांगळे, कुष्ठरोगी आणि इतर दुर्दैवी लोक देखील जणूं एका नव्याच दुनियेंतील लोक आहेत, असें त्या वेळच्या माझ्या नजरेला भासत होतें.

मुक्कामावर जाऊन सामान वगैरे ठाकठीक लावून आम्ही चंद्रभागेवर आंघोळीला गेलों. तेथें आम्हीं प्रथम जें मंदिर पाहिलें तें पुंडलिकाचें होतें. एक म्हातारी त्या मंदिरांत मोठ्यानें गात होती :

**कां रे पुंड्या मातलासी। उभें केलें विठ्ठलासी ॥**

महाराष्ट्रांतील लोकांना मातापित्यांचीं अनन्यभावें सेवा करणाऱ्या पुंडलिकाची कथा नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. मी देखील सकाळीं उठल्याबरोबर

वडिलांच्या आणि मातोश्रींच्या पायां पडत असें. त्यांची सेवा करण्याची एकादी संधि मिळाली म्हणजे मला आनंद वाटत असें. तेव्हां स्वाभाविकपणें पुंडलिकाविषयीं माझ्या मनांत सविशेष आदर होता.

पुंडलिकाला कृतार्थ करण्यासाठीं भगवान् विष्णु त्याचेजवळ गेले आणि तेथेंच त्यानें भगवंतांस एका विटेवर उभें रहावयास लाविलें. त्या वेळीं रखुमाई भगवंताच्या बरोबर आली नसेल; यामुळेंच पंढरपुरांत विठोबाच्या मंदिरांत रखुमाईची मूर्ति नाहीं. रुक्मिणीचें मंदिर तेथें निराळेंच आहे. पंढरपुरांत राधेला 'राई' म्हणतात. राई रखुमाई वारकऱ्यांच्या माता होत. चंद्रभागेच्या वाळवंटावर जेथें पहावें तेथें भजनच चाललें होतें. तेथें वर्णाश्रमाला आणि कर्मकांडाला महत्त्व नाहीं. पंढरपूर म्हणजे भक्तीचें माहेरघर, सर्व संतांचें धाम.

आम्ही चंद्रभागेंत स्नान करून विठ्ठलाच्या दर्शनाला गेलों. पुरोहित-बडवे बरोबर असल्यामुळें वाटेंतील प्रत्येक स्थानाचें माहात्म्य चटचट कळत असे. रस्त्यामधें एक ताक-पीठ विठोबा होता, असें मला स्मरण आहे. या विठोबापुढें एक मोठें लाकडाचें भांडें असे. लोक त्यामध्यें लाह्यापीठ आणि ताक घालीत असत.

विठ्ठलाच्या मंदिरांत कोण मनस्वी गर्दी! कोणी गात आहे, कोणी वाचत आहे, कोणी एक मोठ्यानें 'विठ्ठलाऽऽ' म्हणून आरोळी ठोकत आहे. मंदिरांतील एकेका भक्तांना पहातांना त्यांच्या निष्ठेविषयीं आदर उत्पन्न होई. पण या सर्वांचा एकत्र विचार करतां फारसें बरें वाटलें नाहीं. हे सर्व मिळून अंगांत आल्याप्रमाणें असा कांहीं कोलाहल करीत होते कीं, त्यापेक्षां भाजीबाजार कितीतरी चांगला! मी जरी लहान होतों तरी भक्तीच्या उमाळ्याचें प्रदर्शन करणाऱ्या लोकांचा दंभ मला समजत असे.

सरकारी अंमलदाराचा वशिला सर्वत्र असतो. येथेंहि प्रतिष्ठेच्या वशिल्यानें आम्ही एका खासगी दरवाज्यानें मंदिरांत शिरलों आणि कसलीहि चेंगराचेंगरी न होतां सुखानें दर्शन करून परत आलों. पहिलें दर्शन घाईघाईनेंच करावयाचें असतें. या मंदिराच्या प्रत्येक खांबाशीं एखाददुसरी आख्यायिका चिकटलेली आहे. हा गरुड-स्तंभ; या येथें तुकाराम महाराज उभे रहात असत; गोरा कुंभार येथें बसत असे; या ओट्यावर नामदेव कपाळ फोडून घेणार होता; वगैरे वगैरे माहिती आम्हांस मिळाली. मंदिराच्या बाहेर पितळेच्या पत्र्याची एक पायरी आहे, तिला 'नामदेवाची पायरी' म्हणतात. 'नामदेवाची फरशी, जशी कांहीं जडावाची आरशी'

ही ओळ मीं लहानपणीं ऐकली होती. नामदेव म्हणे या पायरीखालींच समाधिस्थ झालेले आहेत.

रुखमाईचें दर्शन करून आम्ही गोपाळपूरला गेलों. रस्त्यांत जेथें श्रीकृष्णांनीं दहीं घुसळून लोणी काढलें होतें तें स्थान आलें. तेथील एका पुजाऱ्यानें आम्हांला मोठ्यानें हांक मारून सांगितलें, "लवकर या. लवकर या. थोड्याच लाह्या उरल्या आहेत." एका पितळी ताटांत लाह्यांचे दहा-पंधरा दाणे पडलेले होते. पुरोहित म्हणाला, "श्रीकृष्णानें बरोबरच्या बाळगोपाळांबरोबर येथें न्याहारी केली होती. त्या वेळच्या या लाह्या आहेत. तुम्ही कसे अगदीं वेळेवर आलांत! एवढ्याच लाह्या उरल्या आहेत." आम्हीं दोन पैसे देऊन लाह्याचे चार दाणे घेतले आणि पुढें चाललों. गोपाळपूरला एक शिळा आहे. या शिळेवर गाईला उभी करून श्रीकृष्णानें तिचें दूध काढून तें प्राशन केलें होतें. श्रीकृष्णाचीं पावलें, त्या गाईचीं चार पावलें आणि त्याची वाटी, या सर्वांचीं चिन्हें शिळेवर वरींच खोल उमटलीं आहेत. या नदींतून कोणताहि धोंडा बाहेर काढा, त्याच्यावर बाळगोपाळांचीं पावलें उमटलेलीं दिसावयाचींच!

नदीच्या पात्रांत अगदीं मध्यावर एक लहानसें मंदिर होतें. होडींत बसून आम्ही दर्शनासाठीं तिकडे गेलों. अर्धा प्रवाह आम्हीं ओलांडला असेल, इतक्यांत मीं होडीवाल्याला म्हणालों, "येथें पाण्यांत बुडी मारून तळचा एक धोंडा काढून दाखव पाहूं." त्यानें तसें करून एक धोंडा काढला आणि केवढें आश्चर्य! त्याचेवर देखील लहान मुलाचे पाय उमटल्यासारखीं चिन्हें स्पष्ट दिसून आलीं.

येथून आम्ही जनाबाईची जागा पहावयास गेलों. जनाबाई ही नामदेवाच्या घरची दासी. बिचारीला नात्यागोत्याचें जवळचें कोणी नव्हतें. म्हणून विठोबा स्वतः तिच्याबरोबर दळावयाला बसत. आठ आठ दिवसांनीं तिला न्हाऊं घालीत आणि तिची वेणीफणी करीत. एका रात्रीं विठोबा जनाबाईचे घरींच निजले होते. जनाबाईचे वेळची एक वाकळ (गोधडी) आज देखील तेथें पहावयास मिळते. लोकांनीं त्या वाकळीला तेलाचे हात लावून लावून चामड्यासारखी केली आहे.

परत येतांना त्या लाह्यावाल्या भटजीजवळ आम्ही पुन्हां गेलों. या वेळीं त्याच्या ताटांत चांगल्या दोन मुठी भरून लाह्या पडल्या होत्या. मीं त्याला विचारलें, "आतां इतक्या लाह्या कोठून आल्या?" पण तो कसचा उत्तर देतो!

चंद्रभागेच्या कांठीं एक लहानसें कुंड आहे. तेथें तुकारामांनीं आपल्या अभंगाच्या वह्या धोंडे बांधून पाण्यांत बुडविल्या होत्या आणि देवावर संकट घालून ते तेथें उपवासी राहिले होते. शेवटीं विठोबाला आपल्या भक्ताचें समाधान करण्यासाठीं वह्या धोंड्यासहित कोऱ्याच्या कोऱ्या पाण्यावर तरत्या कराव्या लागल्या होत्या. या गोष्टीची खात्री करून घ्यावयाची असेल तर आज देखील प्रचीति घेणें शक्य आहे. दोन पैसे दिले म्हणजे एक मनुष्य धोंड्याची बनविलेली एक लहानशी होडी " पुंडलीक वरदे हारी विठ्ठल " असें म्हणून कुंडाच्या पाण्यांत सोडून देतो आणि ती नौका त्या पाण्यांत मोठ्या डौलानें तरूं लागते ! ती होडी अशा रीतीनें तरत असलेली मीं माझ्या स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिली आहे. मी त्या मनुष्याला म्हणालों, " हीच दगडाची होडी समोरच्या नदीच्या मुख्य पात्रांत सोडून दाखव. तेथें जर ती बुडाली तर आमची खात्री होईल कीं या कुंडाच्या माहात्म्यानेंच ही दगडी नौका येथें तरते. " त्यानें माझें ऐकलें नाहीं कारण मीं लहान होतों.

संध्याकाळीं लवकर जेवून आम्हीं विठोबाची पूजा पहावयास गेलों. विठोबाच्या मूर्तीचें रसभरित वर्णन संतवार्णीत इतकें कांहीं वाचलें होतें अथवा ऐकलें होतें कीं, साक्षात् विठोबाची मूर्ति पाहिल्यानंतर देखील ती बेढब आहे, कुरूप आहे, असें स्वतःशीं देखील कबूल करावयास मन तयार होईना. 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी' आणि 'पाऊलें साजिरीं' वर्णनाप्रमाणें नाहींत असें मानण्याची नास्तिकता मला तरी सोपी नव्हती.

हिंवाळ्याचे दिवस होते म्हणून विठोबांनीं गरम पाण्याची आंघोळ केली. घागरी भरून भरून त्यांना दुग्ध-स्नान घातलें, मग दधि-स्नान, लोण्याचा एक मोठासा गोळा पुजाऱ्यानें मूर्तीच्या तोंडावर थापून दिला. मग एक लोटाभर मध घेऊन मूर्तीला मधु-स्नान घातलें. मग आली पाळी घृत-स्नानाची. शेवटीं एक पेलाभर कस्तुरीचें पाणी डोक्यावर ओतलें गेलें. कस्तुरी हा उष्ण पदार्थ आहे. कस्तुरी-स्नान घातलें म्हणजे पंचामृताची थंडी बाधत नाहीं; पडसें वगैरे होत नाहीं. कस्तुरीची उष्णता बाधूं नये म्हणून, तिचा उतार म्हणून चन्दनाच्या पाण्याचा एक लोटा मूर्तीच्या डोक्यावर ओतण्यांत आला. शेवटीं पुन्हां उष्णोदक आणि शुद्धोदक घेऊन स्नान आटपलें. सारें शरीर पुसून घेऊन विठोबा रेशीम-कांठी धोतरजोडा नेसावयास तयार झाले. विठोबाच्या धोतराच्या निऱ्या अगदीं व्यवस्थित

असावयास पाहिजेत. विठोबाचा तो नीटनेटकेपणा पाहून आमचेसारख्या भक्ताची दृष्टि निवून जात असे. मग विठोबानें जरकसी जामा अंगांत घातला. त्याचेवर आपल्या जुन्या थाटाचा अंगरखा चढविला गेला. त्यानंतर विठोबाच्या डोक्यावर पगडी बांधण्याची क्रिया सुरू झाली. विठोबा तैयार पगडी किंवा पागोटें घालीत नसतात, पण डोक्यावरच बांधून घेतात. त्यांत तब्बल अर्धा तास गेला. आतां विठोबा चांगले रसिक दिसूं लागले. पण थंडीचे दिवसांत ओव्हर कोटावांचून कसें चालेल ? आणि ओव्हरकोट तर परदेशी प्रकार. आधुनिक तर खराच. तेव्हां आंत कापूस भरलेली अस्तरदार रेशमी गोधडी सर्वांत वर पांघरण्यास दिली गेली. त्यामुळें झालें असें कीं, विठोबाच्या उंचीच्या हिशेबानें पहातां मूर्तीचा घेरावाच अधिक झाला. विठोबाच्या कपाळावर कस्तुरीची टिळा केला होता. त्यानंतर नैवेद्य दाखविण्यांत आला. त्या वेळीं दरवाजे बंद केले होते. भुकेलेल्या आशाळभूत लोकांनीं पाहिलें तर विठोबाला नजर लागावयाची आणि खाल्लेलें पचावयाचें नाहीं. बडव्यांची कृपा म्हणून विठोबाला तांबुल मात्र आमच्या देखतच देण्यांत आला.

आतां विठोबाची शयनगृहांत जाण्याची वेळ झाली. आमच्या उजव्या बाजूला शयनगृह उत्तम प्रकारें सजविलें होतें. पण विठोबांनीं आपल्या स्थलावरून शयनगृहांत जावें कसें ? याचा उपाय म्हणून विठोबाच्या पायांपासून शयनगृहांतील पलंगापर्यंत एक पायघडीवजा कापड ताणण्यांत आलें. त्या कापडावर विठोबाचीं पावलें तांबड्या रंगानें छापलीं होतीं.

आमचे पुरोहित म्हणाले, " आतां कलिकाळाचा महिमा वाढला, नाहीं-तर पूर्वी शयनगृहांत तयार करून ठेवलेल्या पानपट्ट्या सकाळपर्यंत नाहींशा होत आणि पलंगाजवळील पिकदाणीमध्यें खाल्लेला पानांचा तांबडालाल तांबूल पडलेला असे. भक्तलोक तो तांबूल घेऊन खात. "

दुसऱ्या दिवशीं पहांटे चार वाजतां आम्हीं काकड-आरती पहावयास गेलों. त्या वेळीं देखील लोकांची गर्दी कमी नव्हती. कार्तिक महिन्यांत आणि माघ महिन्यांत अरुणोदयापूर्वी स्नान करण्याचें पुण्य विशेष आहे आणि काकड-आरतीच्या वेळेला दर्शन करणें ही तर पुण्याची पराकाष्ठा झाली. या दोहोंपैकीं एकहि लाभ आम्हीं सोडला नाहीं.

चांगली दक्षिणा देणाऱ्यांना आणि अर्थात् मोठा वशिला असलेल्यांनाहि पंचामृताचें उत्तम तीर्थ मिळत असे. आमच्या मुक्कामावर एक खासा लोटा भरून जें तीर्थ येई, त्याचेबरोबर.दशम्या आणि पुऱ्या खाणें हा आमचा आनंदाचा व्यवसाय असे.

पंढरपुरांत एकच वस्तु मला फार आवडली. तेथें उच्चनीच भाव दिसून येत नाहीं. सर्वच संत आणि सर्वच समान. ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, चोखामेळा, तुकाराम वगैरे संतांच्या उपदेशाचें हें फळ आहे. पंढरपूरविषयीं मीं जें लिहिलें आहे, तें लहानपणीं पाहिलेल्या गोष्टींचें जसें स्मरण आज आहे तसेंच लिहिलें आहे. त्याला चाळीस-पंचेचाळीस वर्षें झालीं असतील. त्यानंतर पंढरपूरला जाण्याचा योगच आला नाहीं. परवां गोकर्णाला जाऊन आलों, तेव्हां पाहिलें कीं, लहानपणचे संस्कार आणि आतांचे संस्कार यांत बरेंच अंतर पडलेलें होतें. मात्र पाहिलेलीं स्थानें बहुतेक जशींच्या तशींच होतीं.

विठोबाच्या मूर्तीचें वर्णन वांचून कोणीहि असें समजूं नये कीं पूजेची चेष्टा करण्याचा माझा उद्देश आहे. माझ्या मनांत त्या वेळीं अत्यंत उत्कट भक्ति होती. घरच्या देवांची पूजा करण्यांत मीं अगदीं तल्लीन होऊन जात असें. देवळांत जाऊन देखील पूजा करावयास मला मिळाली तर धन्यधन्य वाटे. पण त्या वेळीं देखील पूजेचा सर्व प्रकार मला कांहींसा चेष्टेसारखाच भासला होता. आणि आज ज्या वेळीं पाहिलेल्या गोष्टींचें चित्र डोळ्यापुढें आणतों तेव्हां कसेंसेंच वाटतें. पूजेमध्यें खर्च आणि थाटमाट पुष्कळ असे; पण पुजाऱ्यांना सौंदर्याची कल्पना असेल, अशी शंका देखील ते येऊं देत नव्हते. ख्रिस्ती देवळांत जो गांभीर्याचा देखावा केला जातो तोहि आपल्या देवळांत नसतो. पण येथें मला स्वतःच्या विचारांचा प्रचार करावयाचा नाहीं किंवा समाजाला उपदेशहि द्यावयाचा नाहीं. फक्त लहानपणचीं संस्मरणेंच द्यावयाचीं आहेत.

# कृष्णेचीं संस्मरणें

११

: १ :

एकादशीचा दिवस होता. गाडींत बसून आम्ही माहुलीला निघालों. सातार्‍याहून माहुली चांगलीच दूर आहे. रस्त्यांत उजव्या बाजूस श्रीशाहू महाराजांच्या इमानदार कुत्र्याची समाधि लागते. रस्त्यावरून आमच्याप्रमाणेंच पुष्कळांनीं गाड्या माहुलीकडे भरधांव सोडल्या होत्या. शेवटीं आम्ही नदीकांठीं पोहोंचलों. तेथें या कांठापासून त्या कांठापर्यंत लोखंडाचा दोरखंड उंचावर ताणून बांधला होता. माझ्या बालदृष्टीला भव्य भासणारी एक नौका त्या दोरखंडाला सांखळीनें बांधलेली होती.

तीरावरील गोटे कसे गुळगुळीत, काळे आणि थंडगार! एक हातांत घेतला तोंच दुसर्‍यावर नजर पडे, तो अधिक चांगला वाटे. इतक्यांत तिसर्‍या भिजलेल्या गोट्यावर उदी रंगाच्या रेघा दिसत. म्हणून तो घेण्याची इच्छा होई. त्या दिवशीं मला कृष्णेचें पहिलें दर्शन घडलें. कृष्णामाईनें मला पहिल्या भेटींतच ओळखलें. कृष्णेला मीं ओळखावें इतका मोठा मी त्या वेळीं झालोंच नव्हतों. मूल आईला ओळखूं लागतें त्यापूर्वींच आईनें त्याला आपलेसें केलेलें असतें. नागव्यानें आम्ही मुलें पाण्यांत मनसोक्त डुंबलों, उड्या मारल्या, पाणी उडवलें, नौकेवर चढून पाण्यांत उड्या मारल्या, कडकडून भूक लागेस्तोवर कृष्णेंत यथेच्छ जलविहार केला.

ज्याप्रमाणें नदीचें हें माझें पहिलेंवहिलेंच दर्शन होतें, त्याचप्रमाणें आंघोळ केल्यावर खार्‍या शेंगदाण्यांची न्याहारी केली तो स्वाद त्या प्रकारचा पहिलाच होता. यात्रेच्या वेळीं मोरपिसांचा टोप घालणारे ‘वासुदेव’ भीक मागण्यास आले होते. टाळांच्या साथीवर गाइलेलें त्यांचें मधुर भजनहि त्याच दिवशीं

पहिल्या प्रथम ऐकलें. कृष्णामाईच्या मंदिरांत थोडा वेळ आराम करून आम्ही घरीं परतलों.

सह्याद्रीच्या अरण्यांत महाबळेश्वराजवळ उगम पावून साताऱ्यापर्यंत धांवत येण्यास कृष्णेला फारसा वेळ लागत नाहीं. पण तितक्यांतच वेण्या कृष्णेला भेटण्यास येते. माहुलीला जें माहात्म्य लाभलें आहे तें या संगमामुळेंच. दोन मुली एकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून खेळायल्या निघाल्या आहेत असें हें दृश्य, कांहीं नाहीं तरी पस्तीस वर्षें, हृदयांत कोरलेलें आहे.

कृष्णेचें कुटुंब भलें मोठें आहे. कितीतरी लहानमोठ्या नद्या तिला येऊन मिळतात. गोदावरीप्रमाणेंच कृष्णेलाहि 'महाराष्ट्रमाता' म्हणता येईल. ज्या काळीं आजची मराठी भाषा प्रचलित नव्हती, त्या काळचा सारा महाराष्ट्र कृष्णेनेंच व्यापून टाकला आहे.

: २ :

'नरसोबाच्या वाडी'ला जात असतांना गाडी नावेवर चढवून आम्हीं कृष्णा पार केली होती, तें कृष्णेचें दुसरें दर्शन. एका बाजूला उंच दरड आणि दुसऱ्या बाजूला दूरवर पसरलेला गाळाचा विस्तार व त्यांत होणारीं वांगीं, चिबडें, काकड्या, कलिंगडें, टरबुजें यांचे अमृतमळे. कृष्णाकांठचीं तीं वांगीं ज्यानें एकदां चाखलीं, त्याला स्वर्गांत सुद्धां त्यांची वासना होईल. सतत एक-दोन महिने सारखीं वांगींच खात राहिलों तरीहि तृप्ति होणार नाहीं, मग वीट येणें तर दूरच राहिलें.

: ३ :

सांगलीजवळ कृष्णाकांठींच 'संस्थानी महाराष्ट्रा'चें राजवैभव मीं पहिल्या-प्रथम पाहिलें. ते सुंदर व्यवस्थित बांधलेले विशाल घाट, घाटदार व चकचकीत घागरी भरभरून पाणी घरीं घेऊन जाणाऱ्या मराठमोळ्या स्त्रिया, पाण्यांत धडाम्‌दिशी उड्या मारून कांठावरच्या लोकांना भिजवून टाकण्याची हौस बाळगणारे आखाडेबाज, क्षुद्र घंटिकांच्या तालबद्ध आवाजानें आपलें आगमन सुचविणारे पहाडासारखे हत्ती, आणि 'कर्र्र्' असा एकश्रुति आवाज करून रसपानाचें आमंत्रण देणारीं उसाचीं गुऱ्हाळें. कृष्णाबाईचें हें तिसरें दर्शन!

मला चांगलेसें पोहतां येत नव्हतें तरीसुद्धां एक मोठी घागर उलटी टाकून तिच्या आधारें तरंगत वहात जाण्यासाठीं म्हणून मी एकदां नदींत

उतरलों. पण एका ठिकाणीं चिखलांत असा कांहीं सांपडलों कीं एक पाय वर काढूं जातां दुसरा अधिकच खोल रुते. आणि तो चिखल तरी कसला ? जणुं काळेंभोर लोणीच ! मला वाटलें कीं आतां आपला जंगमपणा जाऊन शीर्षासन करणाऱ्या झाडाप्रमाणें आपण येथें स्थावर होणार ! त्या दिवशीं माझी जी पांचावर धारण बसली होती तिचा अजून विसर पडला नाहीं.

: ४ :

चिंचली स्टेशनावर आम्हांला नेहमीं कृष्णानदीचें पाणी प्यावयास मिळे. आमच्या परिचयाचे एक गृहस्थ तेथें स्टेशनमास्तर होते. आम्हांला मोठ्या मायेनें ते एखादा लोटा पाणी मागवून देत. तहान असो वा नसो, आमचे वडील मोठ्या भक्तीनें आम्हां सर्वांना पाणी पिण्यास सांगत. कृष्णा आहे महाराष्ट्राची आराध्यदेवता. तिचा एक थेंब जरी पोटांत गेला तरी आपण पावन होऊं. कृष्णेचा एक थेंब देखील ज्याच्या पोटांत गेला आहे तो आपलें महाराष्ट्रीय-पण कधीहि विसरणार नाहीं. श्रीसमर्थ व शिवाजी महाराज, शाहू व बाजीराव, घोरपडे व पटवर्धन, नाना फडणवीस व रामशास्त्री – थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्राचें साधुत्व व वीरत्व, महाराष्ट्राची न्यायनिष्ठा व मुत्सद्दीपणा, धर्म व सदाचार, देशसेवा व विद्यासेवा, स्वतंत्रता व उदारता सारें कांहीं कृष्णेच्या वत्सल कुटुंबांत वाढलें आहे. देहू व आळंदीचें पाणी कृष्णेलाच येऊन मिळतें; पंढरपूरची चंद्रभागा सुद्धां भीमा नांव धारण करून कृष्णेंतच विलीन होतें. ‘ गंगास्नान आणि तुंगापान ’ या म्हणींत जिचा गौरव स्वीकारला गेला आहे, ती तुंगभद्रा कर्नाटकाच्या प्राचीन वैभवाच्या स्मरणासहित कृष्णेंतच मिसळून जाते. खरें सांगायचें म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण ( आंध्र ) या तीन देशांचें ऐक्य साधण्यासाठींच कृष्णा वहात आहे. हे तीनहि प्रांत कृष्णेचें दूध प्याले आहेत. कृष्णेला प्रांतीयता ठाऊक नाहीं.

: ५ :

कॉलेजचे दिवस. मोठ्या आशेनें पुण्याहून वडील बंधूंना भेटण्यासाठीं घरीं गेलों. पण मी पोहोंचण्यापूर्वींच ते इहलोक सोडून गेले होते. त्यांच्या अस्थि कृष्णानदीच्या पवित्र जलांत विसर्जित करण्याचें माझ्या नशिबीं आलें. बेळगांव-हून मी कुडचीला गेलों. सायंकाळची वेळ होती. आगगाडीच्या पुलाखालीं

कृष्णेची पूजा केली. वडील बंधूंच्या अस्थि कृष्णासमर्पण केल्या. स्नान केलें आणि आसनमांडी घालून जीवन-मरणाचा विचार करीत बसलों.

कृष्णेच्या पाण्यांत कितीतरी महाराष्ट्र-वीरांचें व महाराष्ट्र-शत्रूंचें रक्त मिसळलें असेल! पावसाळी उन्मादांत कितीतरी शेतकऱ्यांना आणि त्यांच्या गुराढोरांना कृष्णेनें जलसमाधि दिली असेल! पण कृष्णेला त्याचें काय होय! मदमत्त हत्तींनीं तिच्या पाण्यांत विहार केला काय किंवा वीतराग साधूंनीं तिच्या कांठीं तपस्या केली काय – तिला दोन्ही सारखेंच. माझ्या बंधूंच्या अस्थि आणि खडे होऊन पडलेल्या पहाडांच्या अस्थि यांत कृष्णेला भेद कोठून वाटणार? माहुलीस असतांना मला आपल्या खांद्यावर उभें करून पाण्यांत उड्या मारण्यास उत्तेजन देणाऱ्या वडील बंधूच्या अस्थि माझ्या हस्तें त्याच कृष्णेच्या पाण्यांत विसर्जन करणें माझ्या वांट्याला आलें! किती अतर्क्य ही जीवनलीला!

: ६ :

या कृष्णेच्या उदरांत माझा दुसरा एक भाऊ देखील निजलेला आहे. ब्रह्मचारी अनंतबुवा मरढेकर हे, आमचें परस्पर हार्दिक प्रेम पहातां मला सख्ख्या धाकट्या भावासारखे होते, आणि देशसेवेच्या व्रताच्या बाबतींत ते माझे आदरणीय वडील बंधु शोभते. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि गोसेवा असें त्रिविध कार्य करतां करतां त्यांनीं आपला देह ठेवला. माझ्याबरोबर त्यांनीं गंगोत्रीची व अमरनाथची यात्रा केली होती. पण कृष्णाकांठीं येऊनच ते अमर झाले. भक्तीच्या उमाळ्यांत ते देहभान विसरून जात आणि अनेकदां ठेचाळत हें हिमालयाच्या प्रवासांत माझ्या पुष्कळदां नजरेस आलें होतें. मी अनेकदां त्यांना याबद्दल रागें भरत असें, पण ते जुमानीत नसत. ते आपले श्रीसमर्थांच्या प्रासादिक वाणीच्या सात्त्विक मस्तींतच मश्गूल असायचे. कृष्णेला सुद्धां त्यांना रागें भरावेसें वाटलें असावें. देवळाला प्रदक्षिणा घालीत असतांनाच ते वरून खालीं एका डोहांत पडले आणि स्वर्गवासी झाले. जेव्हां वाईच्या खडकाळ पटावरून वहाणाऱ्या गंगेचें मी स्मरण करतों, प्रत्येक पावसाळ्यांत कृष्णेंत शिरःस्नान करणाऱ्या देवळांच्या शिखरांचें जेव्हां दर्शन घडतें, तेव्हां कृष्णेच्या कुशींत माझाहि एक भाऊ कायमची निद्रा घेत आहे या गोष्टीचें

मला स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. आणि त्याचबरोबर अनंतबुवांच्या तपोनिष्ठ पण प्रेमसुकुमार मूर्तीचें दर्शन झाल्यावांचून रहात नाहीं.

: ७ :

सन १९२१ चें साल! भारतवर्षानें एका वर्षांत स्वराज्यसिद्धि करण्यासाठीं कंबर कसली आहे. हिंदु-मुसलमान एक झाले आहेत. तेहतीस कोटि देवांसारखे भारतवासी कोटिकोटीच्या संख्येंतच विचार करूं लागले आहेत. स्वराज्य महर्षि लोकमान्य टिळक यांचें स्मरण सदैव राखण्यासाठीं टिळक-स्वराज्य-निधि म्हणून एक कोटि रुपये गोळा करावयाचे आहेत. राष्ट्रीय सभेच्या निशाणाखालीं काम करणाऱ्या सभासदांची संख्याहि एक कोटि करावयाची आहे. आणि पट-वर्धन श्रीकृष्णाच्या सुदर्शनाप्रमाणें असणारे चरखे सुद्धां तितक्याच संख्येनें या धर्मभूमींत चालू करावयाचे आहेत. यासाठीं भारतमातेचे सुपुत्र बेझवाडा येथें गोळा झाले आहेत. श्री. अब्बाससाहेब, श्री. पुणतांबेकर, गिदवाणीजी आणि मी एकत्रच बेझवाड्याला पोहोंचलों आहोंत. अशा मंगल प्रसंगीं कृष्णांबिकेचें विराट दर्शन करण्याचें सद्भाग्य मला लाभलें. वाईला ज्या कृष्णानदीच्या कांठीं बसून संध्यावंदन केलें आणि न्यायनिष्ठ रामशास्त्र्यांच्या व राज्यकार्यधुरंधर नानांच्या गोष्टी ऐकल्या, तीच चिमुरडी कृष्णा येथें एवढी मोठी झालेली पाहून प्रथम तर डोळ्यांवर विश्वासच बसेना. कोठें ती माहुलीची लहानशी सांखळी आणि कोठें हे येथले युरोप-अमेरिकेला जोडणाऱ्या केबलां-सारखे जाडजूड दोरखंड! हजारों, लाखों लोक येथें स्नानाला येत. स्थूलकाय आंध्र बांधवांत आज भारतवर्षांतील सारेच बांधव मिसळून गेले आहेत. 'राष्ट्रीय' हिन्दीचा वाक्प्रवाह जेथें तेथें ऐकूं येत आहे. कृष्णा नदीला जशा वेण्या, वारणा, भीमा, तुंगभद्रा, येऊन मिळतात, त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांतून टोळ्याटोळ्यांनीं येऊन मिळणारा जनतेचा प्रवाह बेझवाड्यांत उतूं जाऊं लागला आहे. अशा प्रसंगीं रोज कृष्णेंत स्नान करण्याचा लाभ मिळत आहे. ज्या कृष्णेनें जन्मकाळचें दूध दिलें त्याच कृष्णेनें स्वराज्यकांक्षी भारतराष्ट्राचें गौरवशाली दर्शन घडविलें. जय कृष्णे! तुझा विजय असो, भारतवर्ष एक होवो, स्वतंत्र होवो!!

( जुलै १९२९ )

# सह्याद्रीला श्रद्धांजलि

१२

सातारा ही महाराष्ट्राची एके काळची राजधानी होती. कृष्णातीरीं वसणाऱ्या या गांवीं माझा जन्म झाला असल्यामुळें मी स्वतःला 'कृष्णापुत्र' म्हणवितों. मी नुसता कृष्णापुत्रच नाहीं; सह्याद्रीच्या मांडीवर लोळलों-खेळलों असल्यामुळें स्वतःला 'सह्यपुत्र' म्हणवून घेण्यांतहि मला धन्यता वाटते. औरंगजेबानें तिरस्कारानें शिवाजी महाराजांना 'डोंगरांतला उंदीर' म्हटलें खरें, पण आमच्या सह्याद्रीच्या डोंगरांतील उंदीर होणें ही सुद्धां महाभाग्याची गोष्ट आहे.

सह्याद्रि पश्चिमी भारताचा कणाच आहे. खंबायतपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या पश्चिमी सागराच्या लाटांचें हात उंच उभारून स्वागत करण्याचा, त्याच्याशीं हितगुज करण्याचा मान फक्त सह्याद्रीचाच आहे. आणि तो पश्चिमी सागर सुद्धां कृतज्ञतेनें दरवर्षी ग्रीष्म ऋतु संपल्यानंतर आपल्या खाऱ्या पाण्यापासून गोड्या पाण्याचे ढग बनवून सह्याद्रीवर अभिषेक करतो. निसर्गमातेचा दरसाल होणारा हा एक महोत्सवच असतो. सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांवर हे मेघ बरसूं लागतात; आणि मग आम्हां पर्वतपुत्रांना आनंदाचें भरतें येतें, बेभान् होऊन आम्ही नाचूं-बागडूं लागतों.

सह्याद्रीच्या सरिता पूर्व आणि पश्चिम अशा दोन्हीकडील सागरांना मिळून आपला निःपक्षपातीपणा सिद्ध करतात. त्या आपल्या जन्मदात्याचें मोठेपण कधींहि विसरत नाहींत. दोन्ही सागरांत आपली भावांजलि अर्पिण्याचें त्यांचें कार्य सातत्यानें चालू असतें. ज्या सरिता पूर्वगामिनी असतात त्यांना फारच दूरचा प्रवास करावा लागतो; उलट पश्चिमेकडे वाहणाऱ्या सरिता धुंद बनून उंच उंच कड्यांवरून खालीं झेप घेतात आणि बघतां बघतां मोठ्या वेगानें सागराला जाऊन मिळतात. म्हणूनच मला वाटतें पश्चिमी समुद्र इतका अधिक

खोल असावा! भारताची पूर्व-पश्चिम रुंदी मापण्याचा मानदंड असें जर हिमालयाचें वर्णन केलें तर दक्षिण भारताची उत्तर-दक्षिण उंची मापणारा मानदंड असें सह्याद्रीचें वर्णन करावें लागेल.

आमच्या देशाचें व संस्कृतीचें संपूर्ण दर्शन रामायण, महाभारत आणि भागवत या थोर ग्रंथांमुळें घडतें आणि म्हणूनच ते आपण पवित्र मानतों, शिरोधार्य मानतों. परंतु दक्षिणेकडील आम्हां दख्खनवासीयांची जीवनगाथा तुम्हांला पहावयाची असेल तर त्यासाठीं लोकगीतांची कांस धरली पाहिजे.

झाड कशानें शोभून दिसतें? त्याच्या फुलांनीं आणि फळांनीं. अगदीं त्याचप्रमाणें आमच्या पूर्वजांनीं बांधलेल्या डोंगरी किल्ल्यांमुळें सह्याद्रि सुशोभित झालेला आहे. किल्ल्यांना दुर्ग म्हणतात. खरोखर किती सार्थ नांव आहे हें, नाहीं? ज्या ठिकाणीं जाणें सोपें नाहीं ते दुर्ग. 'डोंगरांतील उंदीर' म्हणून औरंगजेबानें आमची अवहेलनाच केली आहे खरी, पण तो आम्हांला चिरडूं शकला नाहीं. दिल्लीहून शाही फौजफाटा आणि खजिना घेऊन या 'उंदरां'नाच कैंचींत पकडण्यासाठीं आमच्या राज्यांत येऊन बादशहानें ठाण दिलें. आमचे किल्ले जिंकणें त्याला कांहीं अशक्य नव्हतें. परंतु त्यांपैकीं कोणताहि किल्ला शत्रूचें व आमचें रक्त सांडल्याशिवाय आम्हीं मराठ्यांनीं सोडला नाहीं. एकहि किल्ला ताब्यांत ठेवण्याची ताकद विजयी औरंगजेबाच्या अंगांत नाहीं याची पूर्ण जाणीव आम्हांसहि होतीच. नवा किल्ला घ्यायचा पण ताब्यांत घेतलेल्यापैकीं दुसरा किल्ला हातचा जायचा. असा खेळ सतत एकोणीस वर्षें बादशाहा खेळत होता. कोणत्या मुहूर्तावर दिल्ली सोडून तो महाराष्ट्रांत आला होता कोण जाणें, पण एवढें मात्र खरें कीं तो परत दिल्लींत जाऊं शकला नाहीं! त्याच्या अस्थि महाराष्ट्राची मध्यकालीन राजधानी औरंगाबादेजवळ चिरविश्रांति घेत आहेत. मी औरंगजेबाला महाराष्ट्रीय बादशहा म्हणतों. महाराष्ट्रांत जन्म घेऊन येथील हवेंत मुक्त श्वासोच्छ्वास करणाऱ्यांची जर महाराष्ट्रीय म्हणून गणना करावयाची असेल तर माझा असा सवाल आहे कीं, एक तपाहून अधिक काल ज्यानें महाराष्ट्राचें अन्न खाल्लें, पाणी प्राशन केलें आणि अखेर देहहि येथेंच ठेवला त्याला महाराष्ट्रीय कां म्हणूं नये? आम्हा डोंगरी उंदरांच्या बिळांतच त्याचें अखेरचें विश्रांतिस्थान आहे!

सह्याद्रीमुळें महाराष्ट्राचे दोन भाग झाले आहेत, कोंकण आणि देश. या दोन विभागांची रहाणी संपूर्णपणें निरनिराळी आहे. हवामानांत फरक आहेच, पण आहारपद्धतींतहि फरक आहे. स्वभावरचनेंत सुद्धां दोन भिन्न प्रकार आढळतात. हा भेद इतक्या थराला पोहोंचला आहे कीं, केवळ स्थानभेदावरून ब्राह्मण जाति दोन वेगवेगळ्या नांवांनीं ओळखली जाते, कोंकणस्थ आणि देशस्थ. सह्याद्रीची रांग तीन-चार हजार फुटांहून अधिक उंच असली तरी पूर्वेकडून पश्चिमेकडे किंवा पश्चिमेकडून पूर्वेकडे येणें-जाणें कठीण नाहीं. आपल्या पर्वताचें नांवच सह्य आहे! उंच उंच शिखरांच्या दरम्यान जाण्यायेण्यासाठीं त्यानें घाट ठेवले आहेत. त्यांतले कांहीं थोडे अवघड आहेत, पण बाकीचे बरेचसे सोपे आहेत. कोंकणांतील महत्त्वाकांक्षी लोक बहुधा याच घाटांनीं सह्याद्रि ओलांडून देशावर जातात व आपलें नशीब काढतात. हा क्रम शेंकडों वर्षें चालू आहे. त्याचप्रमाणें देशावरचे जवानमर्द लोक याच घाटांतून खालीं उतरून कोंकणांतील बंदरांत स्वतःच्या निढळाच्या घामानें पोट भरतात. या दोघांच्या दरम्यान डोंगरांच्या आश्रयानें ज्या जाती रहातात त्यांना गरुड पक्ष्याचे वंशजच म्हटलें पाहिजे. त्यांचे युद्धकलेंतील कौशल्य श्रीकृष्णाच्या काळापासून आजपर्यंत अनेकांनीं कबूल केलें आहे. खालून येणाऱ्या शत्रूचें डोकें मोठमोठे धोंडे भिरकावून सडकण्याची खरी कला याच लोकांची. त्यांच्या मदतीनें श्रीकृष्णानें कित्येक समयीं स्वसंरक्षण केलें आहे.

लहानपणापासून आजपर्यंत या घाटांतून कित्येक वेळां मीं भ्रमंति केली आहे. कधीं पायीं तर कधीं बैलगाडींतून, कधीं मोटारनें तर कधीं रेल्वेंतून. कांहीं कांहीं ठिकाणीं आगबोटींतून केलेला प्रवासहि सह्याद्रीच्या पर्यटनासारखाच गणला जातो. लहानपणीं हे घाट चढण्या-उतरण्यांत मला फार आनंद वाटत असे. त्याचें सविस्तर वर्णन येथें करतां येणार नाहीं.

सह्याद्रींतील वनस्पति, वनौषधि आणि मोठमोठे वृक्ष यांच्या समृद्धीची बरोबरी करण्याची ईर्षा कोणत्याहि देशांतील लोकांना वाटावी. सह्याद्रीच्या प्रत्येक भागांत गवताचीं व झाडांचीं फुलें निरनिराळीं असतात. आयुर्वेदांत या फुलांच्या मधाचे निरनिराळे उपयोग सांगितले आहेत. अमुक एका रोगाला वैजनाथ डोंगरांतील मध चांगला असतो तर दुसऱ्या एखाद्या रोगाला महाबळेश्वरचा मध चांगला असें जुन्या ग्रंथांतून लिहून ठेवलें आहे

मराठी साहित्यांत सह्याद्रींतील निरनिराळ्या किल्ल्यांचीं वर्णनें आलीं आहेत. वनौषधींची माहितीहि मिळते. तेथील सापांचाहि परिचय कुणींतरी करून दिला आहे. येथील डोंगरांत ज्या गुंफा किंवा लेणीं कोरलेलीं आहेत त्यांचें रसाळ वर्णन अखिल भारतीय साहित्यांत ठिकठिकाणीं केलेलें आढळतें. सोपारा, घारापुरी, जोगेश्वरी, कान्हेरी, कार्ला, भाजा, नाशिक, लेण्याद्रि, अजंठा, वेरुळ हीं सर्व स्थानें महाराष्ट्राचीं आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचीं जराजर्जर परंतु अमर स्मारकें आहेत.

डोंगरांत जेथें सरिता उगम पावतात तेथें संस्कृतीचेहि उद्‌गम शोधण्यासाठीं साधुसंत जाऊन रहातातच. इंद्रायणीचें उगमस्थान असणारें लोणावळा, भीमानदीचें भीमाशंकर, कृष्णेसारख्या कित्येक नद्यांचें उगमस्थान असणारें महाबळेश्वर, कावेरी आणि तुंगभद्रेचें जन्मस्थान असणारें गंगामूल या सर्व ठिकाणीं सह्याद्रींतील तपस्व्यांनीं ध्यानधारणा केली आहे. त्यांचे आशीर्वाद आजहि आपल्याला मिळत असतात.

सह्याद्रीच्या परिसरांत कानडी, तेलगु आणि मराठी या तिन्ही भाषा बोलणारे रहातात. या तिन्ही भाषांचा संयुक्त इतिहास म्हणजेच सह्याद्रीचा इतिहास. आणि दक्षिणेकडील मलय पर्वत हाहि एक सह्याद्रीचा भाग आहे. त्याची जर सह्याद्रीबरोबर गणना केली तर केरळचा इतिहासहि वरच्या इतिहासांत समाविष्ट करणें जरूर आहे.

एकदां मीं कराची ते कलकत्ता असा मध्यें न थांबतां थेट विमानानें प्रवास केला आहे; आणि कराची ते मुंबई आकाशमार्गें १८ हजार फुटांवरून प्रवास करून विहंगमावलोकन केलें आहे. त्याचप्रमाणें केव्हां तरी कन्याकुमारी ते विंध्य पर्यंत आकाशांतून प्रवास करण्याचा योग आला आणि सह्याद्रीचें विहंगमावलोकन करण्याची संधि मिळाली तर मी स्वतःला धन्य समजेन. जर कधीं कोलंबो ते मुंबई असा थेट हवाई प्रवास करण्यास मिळाला तरी माझा उपरोक्त हेतु साध्य होईल. कालिदासानें रामचंद्राचा पुष्पक विमानांतला प्रवास वर्णितांना मधून मधून येणाऱ्या पवित्र स्थानांना तो वंदन करतो, असें चित्रित केलें आहे. अगदीं त्याचप्रमाणें मी हवाई मार्गानें जातांना सह्याद्रीचें डोळे भरून सानंद दर्शन घेईन. त्या माझ्या आनंदाचें वर्णन फक्त सरस्वतीच करूं शकेल. परमपिता सह्याद्रीला माझीं कोटि कोटि वंदनें !

# मराठी कवींनीं द्यावें

१३

लहानपणीं भव्यतेचें प्रथम दर्शन घडलें तें सह्याद्रीच्या घाटांतच. सावंतवाडीकडचा 'आंबोली' घाट, गोव्याकडे जातांना लागणारा दूधसागराचा 'तिनई घाट' आणि मुंबई-पुण्यामधला 'बोरघाट' या तीन घाटांपेक्षां अधिक भव्यता इतरत्र कोठें असेल अशी कल्पना देखील होत नाहीं. या तीन घाटांमध्यें पसरलेला महाराष्ट्र लहान लहान टेकड्या, वाकडीं तिकडीं शेतें, आंबराया आणि गवताचीं कुरणें यांमुळें आकर्षक वाटतो. महाराष्ट्रांत सूर्योदय आणि सूर्यास्त अशा दरबारी थाटाचा असतो कीं पहातां पहातां आपले रंग बदलवून थोड्याच वेळांत आपला खेळ संपविण्याची इतकी घाई त्यांना कां सुटावी असा विचार मनांत येऊन मन अस्वस्थ होतें. महाराष्ट्रांतील गाई-म्हशींचीं खिल्लारें, शेळ्यामेंढ्यांचे कळप, हवेंत उडणाऱ्या हरिणाच्या झुंडी एक वेळ पाहिल्यावर कांहीं केल्या तें चित्र हृदयफलकावरून पुसलें जात नाहीं.

महाराष्ट्रांतल्या पक्ष्यांचे थवे आकाशांत जेव्हां सर्पाकार उंच उडत असतात तेव्हां हें वरुणाचें लष्कर कोणता नवा प्रदेश पादाक्रान्त करण्यासाठीं सीमोल्लंघन करीत आहे, त्याबद्दल जिज्ञासा वाटूं लागते. तथापि महाराष्ट्राचें भवितव्य तर त्याच्या सह्याद्रिरूपी कड्यांशीं आणि त्याच्यावर वीरांच्या घरट्यांप्रमाणें शोभणाऱ्या किल्ल्यांशीं संलग्न झालेलें आहे हें निःसंशय !

असें असतां महाराष्ट्रांतील कवींनीं आणि भाटचारणांनीं ह्या पर्वताच्या भव्य आणि रम्य विस्ताराचें वर्णन करून आपली वाणी आजवर कां बरें पावन केली नाहीं ? ह्या अलौकिक सौन्दर्याच्या दर्शनानें रसमत्त झालेल्या आपल्या वाक्सुधेचा मादक आस्वाद घेण्यासाठीं त्यांनीं रसिक जनांना पाचारण कां केलें नाहीं ? प्राचीन कवींना धर्मजड आणि भक्तिमूढ मानणाऱ्या आधुनिक कवींनीं तरी येथल्या रम्याद्भुत वनश्रीविषयीं महाकाव्यें कोठें रचलीं आहेत ?

महाराष्ट्राच्या उत्तुंग भव्यतेचें वर्णन करण्याचें सामर्थ्यच आपणांत नाहीं असें मानून घेऊन सर्वांनीं हा विषय बाजूला ठेवला असता तर त्यांतहि औचित्य संभाळलें गेलें असें एका दृष्टीनें म्हणतां आलें असतें. परंतु कित्येक कवींनीं संस्कृत आणि इंग्रजी काव्यांचें अनुकरण करून महाराष्ट्रभूमीचें साध्या घरगुती भाषेंत वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. मग असा प्रश्न निर्माण होतो कीं, ज्याच्या भव्यतेनें बाळकडू पिऊन शिवाजी, संभाजी आणि राजारामासारखे वीर निर्माण झाले; धनाजी, बाजी, खंडो बल्लाळांसारखे राष्ट्रस्तंभ ज्या महाराष्ट्राच्या खडकांतून कोरले गेले त्याच राष्ट्रांत उत्तुंग प्रतिभा व्यक्त करणारे आणि हृदयांत महत्त्वाकांक्षेचा स्वैर नाच नाचविणारे कवि कसे निर्माण झाले नाहींत ? आणि असे लहानमोठे कवि होऊन गेले असल्यास आणि त्यांचीं तीं प्रकृतिकाव्यें खाणींतील रत्नाप्रमाणें जिकडे तिकडे विखुरलेलीं असल्यास तीं सारीं गोळा करून या ‘आनंदवनभुवना’चें यशोगान करणारीं ‘निसर्ग-काव्यें’ एका कोंदणांत बसविण्याचें कार्य आजपर्यंत कोणी कसें केलें नाहीं ?

स्कॉटलंडच्या सरोवरांचेंच उदाहरण घेऊं या. तेथल्या दऱ्याखोऱ्यांत आणि सरोवरांच्या नागमोडी किनाऱ्यावर भटकणाऱ्या कवींनीं तेथील प्रत्येक गुहा, दरेक शिखर, प्रत्येक वन आणि एकूण एक सरोवरें आपल्या कवित्वशक्तीनें अमर बनविलीं आहेत. त्या कवींचीं वर्णनें वाचून ज्यांचीं हृदयें भावार्द्र बनलीं आहेत असे असंख्य प्रवासी जगांतल्या देशांतून स्कॉटलंडला येतात आणि आपल्या हृदयांतली भक्ति आणि खिशांतील पैसे तेथें ओततात. महाराष्ट्राच्या प्रत्येक खोऱ्यांत राष्ट्रवीरांनीं आपलें ऊन ऊन रक्त सांडविलें आहे. महाराष्ट्रांत इतिहासाला आणि दंतकथांना तोटा नाहीं. महाराष्ट्रांत धर्मपरायण चारित्र्यधन संतांची उणीव नाहीं. कल्पनेलाहि कापरें भरावें आणि तिच्या शरीरावर बाभळीच्या कांट्याएवढे रोमांच उभे रहावेत अशा भूतपिशाच्चयांच्या गोष्टीहि महाराष्ट्रांत खूप प्रचलित आहेत. महाराष्ट्रांतले बिबटे, महाराष्ट्रांतले शिकारी आणि महाराष्ट्रांतले मांत्रिक ह्यांनींहि अद्‌भुत रस पुरविण्याच्या कामीं अगदीं भरपूर साहाय्य केलें आहे. असें असतांना महाराष्ट्र ‘गिरा’च तेवढी ह्या बाबतींत कंगाल कां ? आणि महाराष्ट्र गिरेला विषय सुचत नाहींत असें म्हणून डोकें खाजविण्याची आणि त्या समस्येलाच काव्यविषय बनविण्याची वेळ कां आली आहे ?

१२२१०

बाळपणीं हे तीन घाट पहात असें तेव्हां हृदय भरून येई आणि क्षणभर कृतकृत्य झाल्यासारखें वाटे. परंतु दुसऱ्याच क्षणीं असा विचार येई कीं हें सारें सौंदर्य हृदयांत ठेवूं तरी कसें ? कोणाला देऊं नि कोणाला दाखवूं ? अशी भक्तीची सांठवण करायला हृदयहि तेवढेंच भव्य बनविल्यावांचून कसें चालेल ? पण हें घडणार कसें ? योग्यापाशीं अणिमा, महिमा आदि अष्टसिद्धि असतात. पण आपण काय करावें असें होऊन जाई. आणि आतां असें वाटतें कीं, अरेरे ! सारा जन्म फुकट गेला. ही विशालता, ही दृढता आणि ही वीरता व्यक्त करण्यापुरती भाषा तरी आजवर कां कमाविली नाहीं ?

मुंबईहून पुणें आणि पुण्याहून मुंबई अशा 'दख्खनच्या राणी'च्या साहाय्यानें येरझारा करणारे महाराष्ट्रबंधू आज कांहीं कमी नाहींत. पन्नास रुपये खर्चून लोखंडी पंख लावून ह्याच प्रदेशावरून उडून जाणाऱ्या महाराष्ट्रियांची संख्याहि थोडीबहुत असेलच. परंतु सह्याद्रीच्या चेतोहर भूभागाची एक स्वतंत्र चित्रमंजूषाहि अद्याप कोणी तयार केली नाहीं. उन्हाळ्यांतला दावानल, हिवाळ्यांतलें धुकें, पावसाळ्यांतली वनश्री आणि पर्वताच्या मांडीवर निर्भयपणें खेळत मस्ती करणारे जलप्रपात ह्यांचें काव्यहि कोणी रचलें नाहीं.

भाविक लोक म्हणतात कीं, यात्राधामें सुलभ झालीं कीं यात्रेचें पुण्य क्षीण होतेंच. पण सुलभतेचा श्रमशून्य प्रवास करतां करतां काव्यवृत्ति व प्रतिभा देखील क्षीण होत असाव्यात.

मग काय सह्याद्रीच्या प्रत्येक कड्याला आणि प्रत्येक दरीला इंग्रजांनीं आपलें नांव देत रहावें ? आणि आपण केवळ इंग्रजी साहित्याकरवीं त्या माहितींत निष्णात झालों अशी प्रौढीच मिरवीत रहावें ?

हें माझें पत्र प्रसिद्ध झाल्यावर महाराष्ट्राभिमानी अनेक आधुनिक साहित्यवीर माझ्यावर अनेक चर्चात्मक लेखांचा मारा करतील आणि मी गुजरातेंत राहून गुजराती बनल्यामुळें माझ्यांत महाराष्ट्राभिमान उरलेलाच नाहीं असें म्हणून माझी कुचेष्टा करतील. परंतु मला बचावाचे लेख नको आहेत. मी जें वर मागितलें आहे तेंच मला हवें हें मी कोणत्या शब्दांत त्यांना समजावूं !

आणि जर तें तुम्ही देऊं शकत नसाल तर माझ्या वाटेस जाऊं नका ! !

( एक पत्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १२२१० दि: ...

# सांस्कृतिक भारत दर्शन

*समग्र भारताचें सांस्कृतिक दर्शन*

• •

**शैलीदार सचित्र माहितीपूर्ण पुस्तकें**

• •

**पहिला संच : रु. ४–००**

पांच पुस्तकें : प्र. पुस्तक ८० नये पैसे

१. **जागृत जगन्नाथ :** जगन्नाथपुरी

२. **क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति :** उज्जयिनी

३. **भगवान् कोणादित्य :** कोणार्क-सूर्यमंदिर

४. **त्रिभुवनेश्वर लिंगराज :** भुवनेश्वर

५. **श्रीचैतन्यलीलाधाम :** नवद्वीप

लेखक : 'आनंदयात्री'

*समग्र भारतांतील सांस्कृतिक केन्द्रांचा*
*परिचय देणारीं अशीं पन्नास पुस्तकें*
*या मालेंतून संकलित आहेत.*